अकोला । मंगळवार
दि. २४ जून २०२५
वर्ष : १९ अंक : ११४
पाने : ८ + ४

दैनिक
अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

पृथ्वी शॉ मुंबई क्रिकेट संघ सोडणार?
(पान ७ वर..)

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात?

मुंबई, दि. २३ वृत्तसंस्था

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या चार टप्प्यात होणार असल्याची चर्चा आहे. तसेच ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याची माहिती मिळत आहे.

राज्यात आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक महत्त्वाच्या शहरांत, जिल्ह्यांत पडद्यामागे प्रचंड राजकीय घडामोडी सुरु आहेत. महायुती असेल किंवा महाविकास आघाडी, प्रत्येक पक्ष कामाला लागले आहेत. निवडणुका कधीही जाहीर होऊ शकतात. त्यामुळे निवडणुकीसाठी रणनीती आखली जात आहे. यासाठी युती की आघाडीत निवडणूक लढायची? याबाबतही प्रत्येक पक्षात विचारमंथन होत आहे. त्यातून काय निर्णय घेतला जातो ते आगामी काळात

स्पष्ट होईलच. या दरम्यान आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत महत्त्वाची अपडेट समोर येत आहे. राज्यातील अनेक महापालिकांमध्ये दोन, तीन तर काही ठिकाणी ५ वर्षांपासून प्रशासनाकडून कारभार चालवला जातोय. निवडणुका न झाल्यामुळे तिथे सध्या प्रशासनाच्या अख्यत्यारित कामकाज सुरु आहे. आधी कोरोना संकट, यानंतर ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन सुप्रीम कोर्टात सुरु असलेली सुनावणी यामुळे निवडणुकांना विलंब झाला. ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर सुप्रीम कोर्टाने २०२२ आधीचं आरक्षण कायम ठेवायचा आदेश देत निवडणुका घेण्याचे आदेश सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाला दिले. त्यानंतर निवडणूक आयोग तयारीला लागलं आहे.

निवडणूक आयोग स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी तयारी करत आहे. त्यानुसार निवडणूक आयोग महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या चार टप्प्यात घेणार असल्याची माहिती समोर येत आहे. दरम्यान, या निवडणुकीत कोणता पक्ष बाजी मारतो? याबाबत उत्सुकता आहे. याआधी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला महाराष्ट्रात चांगलं यश मिळालं होतं. पण त्यानंतर सहा महिन्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला. तर महायुतीला ऐतिहासिक विजय मिळाला. यानंतर आता काही महिन्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडणार आहेत. या निवडणुकींनंतर आता महाराष्ट्राचा आता नेमका काय मूड आहे? महाराष्ट्राच्या जनता महायुती की मविआ, यापैकी कुणाला जास्त पसंत करते ते स्पष्ट होणार आहे.

लवकरच निवडणुकीचे वेळापत्रक जारी केले जाण्याची शक्यता!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या चार टप्प्यात होणार असल्याची चर्चा आहे. तसेच ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याची माहिती मिळत आहे. महापालिका आणि जिल्हा परिषदांच्या निवडणुका या वेगवेगळ्या होणार असल्याची देखील माहिती समोर येत आहे. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्रभाग रचनेचं काम सुरु आहे. निवडणूक आयोगाकडून लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचं वेळापत्रक जारी केलं जाण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोग त्यासाठीच तयारी करत आहे. असं असलं तरी निवडणूक आयोग चार टप्प्यात निवडणुका घेणार असल्याचं जाहीर करण्यात आलेलं नाही. याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा सुरु आहेत. निवडणूक आयोगाकडून याबाबत अधिकृत घोषणा केल्यानंतरही सर्व स्पष्ट होईल.

थोडक्यात

तांत्रिक बिघाडामुळे विमान मध्यातूनच दिल्लीला परतले

नवी दिल्ली : दिल्लीहून जम्मूच्या दिशेने निघालेल्या एअर इंडिया एक्सप्रेसच्या २५६४ या विमानाला सोमवारी उड्डाणानंतर काही वेळातच तांत्रिक बिघाड झाल्याने दिल्लीला परतावे लागले. यानंतर, प्रवाशांच्या सोयीसाठी पर्यायी विमान उपलब्ध करून देण्यात आले असल्याची माहिती एअर इंडिया एक्सप्रेसच्या प्रवक्त्यांनी दिली. प्रवक्त्यांनी सांगितले की, मूळ विमानात तांत्रिक अडचण आल्यामुळे दिल्ली-जम्मू विमानसेवा थांबवण्यात आली. त्याऐवजी पर्यायी विमानाद्वारे ही सेवा पूर्ण करण्यात आली. दरम्यान, रविवारी एअर इंडियाच्या तिरुवनंतपुरमदिल्ली उड्डाणासही रद्द करण्यात आले. दिल्लीहून येणाऱ्या विमानाला पक्षी धडक दिल्याने तेथे सुरक्षित लँडिंग झाले.

समाजवादी पार्टीच्या ३ आमदारांची हकालपट्टी

लखनौ : उत्तर प्रदेशमधील विरोधी पक्ष समाजवादी पार्टीने तीन आमदारांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. राकेश प्रताप सिंह, अभय सिंह आणि मनोज कुमार पांडे अशी कारवाई करण्यात आलेल्या आमदारांची नावे आहेत. यासंदर्भातील माहिती पक्षाने सोशल मीडिया एक्सवर पोस्ट करत दिली आहे. सांप्रदायिक फुटीरतावादासह शेतकरीविरोधी, महिलाविरोधी, युवकविरोधी, व्यवसायविरोधी, रोजगारविरोधी विचारसरणीला पाठिंबा दिल्यामुळे गोसाईगंजचे आमदार अभय सिंह, गौरीगंजचे आमदार राकेश प्रताप सिंह आणि उंचहारचे आ. मनोज पांडे यांच्यावर कारवाई केल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे. पोस्टमध्ये लिहिले आहे की, या लोकांना हृदयपरिवर्तनासाठी दिलेली कृपा-कालावधीची मुदत आता पूर्ण झाली आहे, उर्वरित वेळ चांगल्या वर्तनामुळे शिल्लक आहे.

इराणने इस्त्रायलवर डागली १५ बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे!

इस्रायलचा इराणच्या एविन तुरुंगावर भीषण हल्ला

तेहरान, दि. २३ वृत्तसंस्था

अमेरिकेने इराणच्या अणुप्रकल्पांवर केलेल्या हल्ल्यास २४ तास होण्याच्या आत इराणने इस्त्रायलच्या दिशेने १५ बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागले आहेत, अशी माहिती इस्त्रायली संरक्षण दलाने आज दिली. या हल्ल्यामुळे इस्त्रायलमधील अनेक शहरांमध्ये धोक्याचे भोंगे वाजू लागले आहेत.

जेरुसलेममध्ये स्फोटांचे आवाज ऐकू आले, तर उत्तर इस्त्रायलमध्ये धोक्याचे भोंगे वाजत होते. दक्षिणेकडील अश्दोद शहरात क्षेपणास्त्र हल्ल्याच्या वृत्तानंतर इस्त्रायली वैद्यकीय पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणमधून अनेक क्षेपणास्त्रे डागण्यात आल्याच्या वृत्ताला इस्त्रायली लष्कराने दुजोरा दिला आहे. 'टाइम्स ऑफ इस्त्रायल'च्या वृत्तानुसार, इराणने सुमारे १५ बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागली, त्यापैकी काही क्षेपणास्त्रांनी थेट इस्त्रायली भूभागावर आघात केला. अमेरिकेने इस्त्रायलच्या इराणविरोधी लष्करी मोहिमेत सामील होऊन फोर्डो, नतांझ आणि इस्फहान येथील इराणच्या तीन अणुप्रकल्पांवर बॉम्बहल्ले करण्यासाठी अचूक हवाई हल्ले केल्यानंतर मध्य-पूर्वेतील तणाव अभूतपूर्व पातळीवर पोहोचला आहे. (पान २ वर)

विधान भवनात बसलेले षंढ!

देशपांडेवर हक्कभंग कारवाईचा इशारा



मुंबई, दि. २३ वृत्तसंस्था

> विधीमंडळ हे महाराष्ट्राचं सर्वोच्च सभागृह आहे. या सभागृहात बसणाऱ्या सभासदांना षंढ म्हणणे हे संस्कृतीला शोभून नाही. खालच्या स्तरावर जावून आम्हालाही बोलता येऊ शकतं. हा सभागृहाचा अपमान आहे. आगामी काळात बरेच आमदार त्यांच्या वक्तव्यावर हक्कभंग आणल्याशिवाय राहणार नाहीत.
>
> **- गुलाबराव पाटील**

> संदीप देशपांडे यांचं षंढ म्हणणं योग्य आहे. कारण महाराष्ट्रात मराठीचा कायदा झाला. न्यायालयाने मराठीचे आदेश दिले. असं असताना मंत्रालयात किंवा विधान भवनात हिंदी आणि इंग्रजी बोर्ड लावणे हे आम्हाला शोभणारे निश्चित नाही.
>
> **- रामदास कदम**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांच्या वादग्रस्त वक्तव्याने महाराष्ट्रातील राजकारण तापलं आहे. विधीमंडळाच्या कार्यक्रमात मराठी फलक नसल्याने संदीप देशपांडे यांनी टीका केली. संसदेच्या अंदाज समितीला ७५ वर्षे पूर्ण झाल्याने विधान भवनात कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाला लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात मंचावर लावण्यात आलेल्या फलकावर इंग्रजी आणि हिंदी भाषेत मजकूर होता. महाराष्ट्राच्या विधान भवनात आयोजित कार्यक्रमात मंचावर लिहिलेला आशय मराठीत नसल्यामुळे अनेकांकडून संताप व्यक्त करण्यात आला. संदीप देशपांडे यांनी तर ''विधान भवनात सर्व षंढ बसले आहेत'', असं वक्तव्य केलं. त्यांच्या या वक्तव्याने वाद निर्माण झाला आहे.

हेच दुर्दैव आहे. सगळे षंढ लोकं तिथे बसले असतील तर मराठी माणसाने करायचं काय?, असं वक्तव्य संदीप देशपांडे यांनी केलं. त्यांच्या या वक्तव्यावर मंत्री गुलाबराव पाटील यांनी हक्कभंग आणण्याचा इशारा दिला. तसेच इतर मंत्री आणि नेत्यांनीदेखील इशारा दिला. पण तरीही संदीप देशपांडे आपल्या (पान २ वर)

आंतरजातीय विवाह असेल तर काय? : सर्वोच्च न्यायालयाचा सवाल

नवी दिल्ली, दि. २३ वृत्तसंस्था

एकल मातांच्या मुलांना इतर मागासवर्गीय प्रमाणपत्र मिळावे यासाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे. यावेळी न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना या प्रकरणावर आपले उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. विशेष म्हणजे, आंतरजातीय विवाह झाल्यास अशा परिस्थितीत इतर मागासवर्गीय प्रमाणपत्राबाबत काय नियम लागू होतील?, असा थेट सवाल न्यायालयाने राज्य सरकारांना विचारला आहे.

जनहित याचिकेत अशी मागणी करण्यात आली आहे की, इतर मागासवर्गीय प्रमाणपत्र देताना एकल मातांचा सामाजिक आणि जातीय आधार ग्राह्य धरावा. सध्याच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, वडील अथवा पितृकुळाच्या आधारावरच इतर मागासवर्गीय प्रमाणपत्र दिले जाते, ज्यामुळे घटस्फोटित, विधवा किंवा एकल मातांना त्यांच्या मुलांसाठी जात प्रमाणपत्र मिळवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. / समुदायासाठी, मातृकुळाच्या आधारावर प्रमाणपत्र देण्याचे आधीच आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्याचप्रमाणे इतर मागासवर्गीयसाठी सुद्धा लागू व्हावे, अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, एखाद्या (पान २ वर)

भरती प्रक्रियेकरिता पर्सेंटाईल पद्धती लागू!

एमपीएससीचा ऐतिहासिक निर्णय

नागपूर, दि. २३ वृत्तसंस्था

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण घोषणा करण्यात आलेली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांच्या पुढील परीक्षेच्या गुणांकनावर काय परिणाम होणार हे महत्त्वाचे ठरणार आहे. आयोगाने स्पर्धा परीक्षा प्रमाणेच इतर सरळ सेवा भरती प्रक्रियेसाठी आता गुणांकणाची कुठली प्रक्रिया लागू होणार यासंदर्भात परिपत्रक जाहीर केले आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून राज्यसेवा पोलीस उपनिरीक्षक अशा विविध परीक्षांसह सरळ सेवा भरती प्रक्रिया राबवली जाते. यामध्ये ग्रुप क पदांचा समावेश असतो. आयोगाने त्याच्या परिपत्रकांनुसार यापुढे स्पर्धा परीक्षेप्रमाणेच सरळसेवा भरतीप्रक्रियेकरिता किमान पर्सेंटाईल अर्हतामान लागू करण्यात आला आहे. आयोगाच्या कार्य नियमावलीतील नियम क्रमांक ८ संदर्भात दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजीच्या सुधारणेसह स्पर्धा परीक्षांप्रमाणेच सरळसेवा भरती प्रक्रियांकरीता घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षांसाठी देखील किमान पर्सेंटाईल अर्हतामान लागु करण्याचा निर्णय आयोगामार्फत घेण्यात आला आहे. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच, सदर निर्णय आयोगाकडुन यापुढे घेण्यात येणा-या चाळणी परीक्षांना लागू असेल . पर्सेंटाईल ही प्रणाली उमेदवाराच्या गुणांची तुलना इतर सर्व उमेदवारांच्या गुणांशी करते आणि त्या उमेदवाराने किती टक्के उमेदवारांपेक्षा चांगली कामगिरी केली आहे हे दर्शवते. एमपीएससी परीक्षेत, प्राथमिक आणि मुख्य परीक्षेचे गुण सामान्य करण्यासाठी पर्सेंटाइलचा वापर केला जातो, विशेषतः (पान २ वर)

'नीट' चाचणी परीक्षेत कमी गुण; मुख्याध्यापकाने घेतला लेकीचा जीव!

सांगली, दि. २३ वृत्तसंस्था

सांगली जिल्ह्यात 'नीट'च्या सराव परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे १६ वर्षीय मुलीचा तिच्या वडिलांच्या बेदम मारहाणीमुळे मृत्यू झाला आहे. या घटनेतील आरोपी वडील एका शाळेत मुख्याध्यापक आहेत. शनिवारी रात्री आटपाडी तालुक्यातील नेलकरंजी गावात ही घटना घडली असल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले.

पोलीस अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी धोंडिराम भोसले (४५) मुलीला 'नीट'च्या सराव परीक्षेत कमी गुण मिळाल्यामुळे नाराज होते. कमी गुण मिळाल्यामुळे आरोपी आणि पीडित विद्यार्थिनीमध्ये वाद झाला. त्यानंतर, आरोपीने लाकडी मुसळाने मारहाण केली. वडील मारहाण करत असताना पीडितेची आई आणि भाऊही घटनास्थळी उपस्थित होते. वडिलांनी मारहाण केल्यानंतर पीडित मुलीला सांगली येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, जिथे उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. शवविच्छेदन अहवालात असे दिसून आले आहे की, तिचा मृत्यू शरीरावर विविध ठिकाणी झालेल्या जखमांमुळे झाला आहे, असे आटपाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विनय बहिर यांनी सांगितले. मुलीच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून आरोपी वडिलाला अटक करण्यात आली आहे. धोंडीराम भोसले हे नेलकरंजी गावातच माध्यमिक विद्यालयात मुख्याध्यापक आहेत. (पान २ वर)

हिंदी सक्ती : कवींकडून पुरस्कार वापसी!

राज्य सरकारच्या अडचणी वाढल्या

मुंबई, दि. २३ वृत्तसंस्था

राज्यातील नवीन शैक्षणिक धोरणात इयत्ता पहिलीपासूनच्या विद्यार्थ्यांना तिसरी भाषा शिकणे बंधनकारक करण्यात आले आहे. हिंदी भाषेव्यतिरिक्त अन्य कोणती भाषा शिकायची असल्यास, त्यासाठी २० विद्यार्थ्यांनी मागणी करणे आवश्यक आहे. या निर्णयामुळे पहिलीपासूनच हिंदी सक्तीने शिकण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

> हिंदी भाषेला तिसरी भाषा म्हणून लादण्याच्या निर्णयाचा निषेध म्हणून मला पॅरानोया या कवितासंग्रहासाठी मिळालेला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार रकमेसकट परत करत आहे. सरकारने निर्णय मागे घेतला तरच मी माझा निर्णय मागे घेईन.
>
> **- हेमंत दिवटे**

> शासनाच्या निर्णयामुळे पालकांमध्येही नाराजी पसरली आहे. शासनाने पहिलीपासून हिंदी भाषा तिसरी भाषा म्हणून अनिवार्य करण्याला पालकांचा विरोध आहे. सरकारने २० विद्यार्थी जमले तर पर्याय देऊन शब्दच्छल केला. हिंदी भाषा शिकण्याला विरोध नाही तर मुलं थोडी मोठी झाली की ५ वी नंतर हिंदी शिकवा. आमचा विरोध प्राथमिक शिक्षणात समावेशाला आहे. सरसकट हिंदी भाषेला नाही.
>
> **- सचिन गोस्वामी**

> हिंदीच्या अट्टाहासापायी विद्यार्थ्यांचे नुकसान का करताय? महाराष्ट्र शासनाने मागच्या दाराने शिक्षणात त्रिभाषा सूत्र घुसडले आहे. सर्वात काळजीची बाब म्हणजे त्रिभाषा सुत्राबाबतचा हट्ट पुरवण्यासाठी कार्यानुभव, खेळ आणि कला या विषयांसाठीचे तास कमी करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांचे व्यक्तिमत्त्व बहरावे यासाठी हे तास अतिशय महत्त्वाचे आहेत. परंतु ते कमी करण्यात येत असल्याने शासनाचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत नेमके काय धोरण आहे?
>
> **- सुप्रिया सुळे**

या भूमिकेमुळे राज्यातील अनेक मराठी भाषिक नागरिकांकडून शासनाचा विरोध होत आहे. या पार्श्वभूमीवर लेखक, कवी हेमंत दिवटे यांनी शासनाचा पुरस्कार परत करण्याची घोषणा केली आहे, तर सचिन गोस्वामी आणि खासदार सुप्रिया सुळे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सरकारच्या निर्णयावर टीका केली आहे.

राज्य शासनाने नवीन शैक्षणिक धोरणानुसार, पहिलीपासून तिसरी भाषा शिकणे अनिवार्य केले आहे. त्यामुळे अप्रत्यक्षपणे हिंदी भाषा सक्तीची होण्याची शक्यता आहे. या निर्णयाला मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्यांकडून विरोध होत आहे. मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी यावर आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यानंतर आता लेखक, कवी हेमंत दिवटे यांनी या निर्णयाच्या निषेधार्थ महाराष्ट्र शासनाने दिलेला पुरस्कार परत करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी सोशल मीडियावर याबाबत माहिती दिली.

खिडकीतून डोकं बाहेर काढल्यामुळे चिमुरड्याला जीव गमवावा लागला!

लखनऊ, दि. २३ वृत्तसंस्था

एका भीषण अपघातात ११ वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला आहे. ही घटना उत्तर प्रदेशातील कोतवाली हाथरस जंक्शन परिसरात कालौरे चौकात घडली. अली असं या ११ वर्षांच्या मुलाचं नाव असून तो बसमधून प्रवास करत असताना ही घटना घडली. अलीने खिडकीतून डोकं बाहेर काढलं आणि तेवढ्यात एका पिकअप गाडीची त्याला जोरदार धडक बसली. या दुर्घटनेत अलीचं शीर धडावेगळं झालं आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. ही घटना पाहून उपस्थितांच्या अंगावर काटा आला.

जेव्हा या पिकअपची धडक मुलाला बसली तेव्हा त्याचं शीर धडावेगळं होऊन रस्त्यावर पडलं तर त्याचं धड हे बसमधील सीटवर तडफडत राहिलं. हे पाहून बसमधील लोकांनी आरडाओरड केली. ही घटना इतकी भयानक होती की बसमधील प्रवाशांनी एकच आरडाओरड केली. बसमध्ये बसलेले इतर प्रवासी हे दृश्य पाहून घाबरले आणि त्यांनी आरडाओरडा करत बस थांबवली. बस थांबताच मुलाचे वडील खाली उतरले आणि त्यांनी रस्त्यावर पडलेले मुलाचे शीर हाती घेतले. हतबल झालेला बाप लेकाचं शीर हाती घेताच जमिनीवर कोसळला आणि आक्रोश करु लागला. तर, मुलाच्या काकाने दुपट्ट्यात त्याचे (पान २ वर)

पान 1 वरून...

विधान भवनात बसलेले ....

वक्तव्यापासून माघार घेण्यास तयार नाहीत. माझा शब्द झोंबला असेल तर त्यावा त्यांनी विचार केला पाहिजे. दुसरं म्हणजे हक्कभंगचा विषय असेल तर कारवाईला मी सामोरं जायला तयार आहे. उद्या माझ्यावर जेलमध्ये जायची वेळ आली तर मी मराठी भाषेसाठी जेलमध्ये जायला तयार आहे, असं संदीप देशपांडे म्हणाले.

आंतरजातीय विवाह असेल तर...

मुलाचे संगोपन जर आईच्या समाजात झाले असेल, तर जात ठरवताना ते महत्त्वाचे असते, फक्त वडिलांची जात ग्राह्य धरली जाणे योग्य नाही. न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती एन. के. सिंग यांच्या खंडपीठाने सुनावणी दरम्यान विचारले, जेव्हा एखादी स्त्री घटस्फोटित आहे, तेव्हा तिला आपल्या पतीकडे किंवा सासरच्या मंडळींकडे मुलांच्या जात प्रमाणपत्रासाठी का जावे लागते? न्यायालयाने सांगितले की, ही बाब विशेषतः महिलांवर अन्याय करणारी आहे आणि समाजात अनेक एकल मातांना यामुळे त्रास सहन करावा लागतो. केंद्र सरकारने याप्रकरणी आपले प्रतिज्ञापत्र दाखल करून याचिकेतील मागणीला पाठिंबा दर्शविला आहे. मात्र, संबंधित मार्गदर्शक तत्त्वे राज्य सरकारांमार्फत ठरवली जात असल्याने त्यांची भूमिका देखील आवश्यक आहे, असे केंद्राने स्पष्ट केले. राज्य सरकारेच इतर मागासवर्गीय प्रमाणपत्रासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरवत असल्याने, राज्य सरकारांकडून स्पष्ट भूमिका आवश्यक असल्याचे केंद्राने सांगितले. न्यायालयाने सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना २२ जुलैपूर्वी आपले उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २२ जुलै २०२५ रोजी होणार असून, त्यावेळी अंतिम निर्णय अपेक्षित आहे.

भरती प्रक्रियेकरिता पर्सेंटाईल ....

जेव्हा परीक्षा अनेक शिफ्टमध्ये घेतली जाते. यामुळे वेगवेगळ्या शिफ्टमध्ये परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांना योग्य वागणूक मिळते याची खात्री होते. पर्सेंटाइल म्हणजे ० ते १०० पर्यंतची संख्या जी दर्शवते की विशिष्ट डेटा पॉइंटच्या किती टक्के मूल्ये खाली आहेत. उदाहरणार्थ, जर एखाद्या उमेदवाराची टक्केवारी ९० असेल, तर त्याचा अर्थ असा की त्याने किंवा तिने इतर ९०% उमेदवारांपेक्षा चांगली कामगिरी केली. पर्सेंटाइल सिस्टीममुळे वेगवेगळ्या शिफ्टमध्ये परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांना योग्य वागणूक मिळते याची खात्री होते.

'नीट' चाचणी परीक्षेत कमी गुण...

त्यांची मुलगी आटपाडी येथे बारावीमध्ये शिकत होती. आटपाडी येथील निवासी विद्यालयात ती वास्तव्याला होती. नुकतीच ती घरी आली होती. नीट चाचणी परीक्षेत तिला कमी गुण मिळाले होते. त्यामुळे संतापलेल्या भोसले यांनी घरातील जात्याच्या लाकडी खुंट्याने मुलीला मारहाण केली. या मारहाणीत तिच्या डोक्याला मार लागला होता. ती गंभीर पण शुद्धीवर होती. वडिलांनी तिला दवाखान्यात नेले नाही. शनिवारी दुसऱ्या दिवशी सकाळी भोसले माध्यमिक विद्यालयात योगदिनाचा कार्यक्रम करून घरी आल्यावर मुलगी बेशुद्ध अवस्थेत दिसली. तिला उपचारासाठी दवाखान्यात नेण्यात आले. पण उपचारापूर्वीच तिचा मृत्यू झाला होता. शनिवारी रात्री मुलीचा अंत्यविधी झाला. त्यानंतर मुलीची आई प्रीती धोंडीराम भोसले यांनी काल फिर्याद दिली. आरोपीस अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने आरोपीस बुधवारपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

खिडकीतून डोकं बाहेर ....

शीर झाकले आणि हंबरडा फोडला. अपघातामुळे हतबल झालेले वडील आणि काका मुलाचे शीर धडाला जोडण्याचा अयशस्वी प्रयत्न करत होते. या दुर्घटनेमुळे मुलाच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच, बसमधून प्रवास करणाऱ्या इतर प्रवाशांनाही या घटनेमुळे मोठा धक्का बसला आहे. काही प्रवाशांनी सांगितले की, मुलगा खिडकीतून वारंवार डोकं बाहेर काढत होता. त्याला अनेक वेळा हटकले होते, पण त्याने ऐकले नाही.

इराणने इस्त्रायलवर डागली ...

इस्त्रायलचा इराणमधील सहा हवाईतळांवर हल्ला : इराण आणि इस्रायल युद्धाचा आज अकरावा दिवस आहे. आतापर्यंत या युद्धात दोन्ही देशांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवित आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. इस्रायली सैन्याने इराणमधील सहा विमानतळांवर हवाई हल्ले केले आहेत. मशहद, तेहरान, हमादान, देझफुल, शाहिद बख्तियारी आणि तबरीझ या विमानतळांना लक्ष्य केल्याचा दावा इस्त्रायलने केला आहे. तर इराणने इस्रायलवर हर्मीस ड्रोन पाडला आहे. इस्त्रायलने लष्कराने निवेदन जारी करून म्हटले आहे की त्यांनी ड्रोन हल्ल्यांद्वारे इराणची १५ लष्करी विमाने आणि हेलिकॉप्टर नष्ट केले आहेत. या हल्ल्यांमध्ये हवाई पट्ट्या, भूमिगत बंकर, इंधन भरणारे विमान आणि इराणच्या -१४, -५ आणि -१ सारख्या लढाऊ विमानांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. इस्त्रायलने इराणच्या एविन तुरुंगासह आणखी काही ठिकाणी भीषण हल्ले केले आहेत. या हल्ल्यात अनेक परिसरही उद्ध्वस्त झाले आहेत.

अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या मेरा खुर्द फाट्यावर खुनी थरार

पैशाच्या वादातून युवकाची हत्या; दोन्ही आरोपी अटकेत!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अंढेरा, दि.२३: अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येणारे तसेच चिखली तालुक्यातील मेरा खुर्द फाट्यावरील चौफुलीवर पैशाच्या वादातून भरत विरशिंद (वय ३२, रा. नांद्राकोळी, ता. बुलढाणा) याची धारधार शस्त्राने वार करून निर्घृण हत्या करण्यात आली. ही घटना २३ जून रोजी दुपारी सुमारे २ वाजता घडली. या प्रकरणी अंढेरा पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की,जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यातील वरूड येथील ज्ञानेश्वर सुखदेव निकाळजे (वय २५) आणि मृतक भरत विरशिंद यांच्यात पैशांच्या वादातून दोघांमध्ये वाद निर्माण झाला होता.या वादातूनच ज्ञानेश्वर निकाळजे याने भरतच्या मानेवर धारदार शस्त्राने वार करून हत्या करण्यात आली यावेळी ज्ञानेश्वर निकाळजे सोबत मनोज इच्छे रा.खोर ता चिखली हा सहकारी होता.या हल्ल्यात भरत विरशिंद यांचा जागीच मृत्यू झाला असून सदर घटना परिसरात वाऱ्यासारखी पसरली.भर दिवसा धारदार शस्त्राने युवकांची हत्या करण्यात आल्याने जिल्हाभर अंढेरा पोलिस स्टेशन चर्चेत आले आहे. घटनेची माहिती मिळताच अंढेरा पोलिस स्टेशनचे ठाणेदार रुपेश शक्करगे आणि कर्मचारी भरत पोफळे यांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होत ज्ञानेश्वर निकाळजे ला ताब्यात घेतले.तर दुसरा आरोपी मनोज इच्छे हा घटनास्थळावरून पसार झाला होता.तो सुध्दा सायंकाळी स्वताहा अंढेरा पोलिस स्टेशन सरेंडर झाला आहे.घटनेचा पुढील तपास जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक रुपेश शक्करगे करीत आहे.

घटनास्थळी जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक बी.बी.महामुनी यांची घटनास्थळी धाव

मेरा खुर्द फाट्यावर पैशाच्या वादातून युवकाची हत्या होताच अंढेरा पोलिसांनी आरोपीला अटक करण्यात आली असून जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे आणि अप्पर पोलीस अधीक्षक बी.बी.महामुनी यांनी घटनास्थळी मेरा खुर्द फाट्यावर धाव घेतली असुन घटनेची सविस्तर माहिती घेतली.तसेच मेरा खुर्द फाट्यावरील एका दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरात सर्व घटना कैद झाली आहे.उपविभागीय पोलिस अधिकारी मनिषा कदम यांची घटनास्थळी धाव घेतली असुन अप्पर पोलीस अधीक्षक बीबी महामुनी आणि उपविभागीय पोलिस अधिकारी मनिषा कदम हे अंढेरा पोलिस स्टेशनला तळ ठोकून होते.मृतकाचा भाऊ नामें शरद विरशिंद रा.नांद्राकोळी यांच्या फिर्यादीवरून अंढेरा पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन्ही आरोपींना अटक करण्यात आले आहे.याने अंढेरा पोलिस स्टेशनला फिर्याद दिली असून कलम भारतीय हत्यार कायदा कलम १०३,३(५)प्रमाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच मृतक ज्ञानेश्वर निकाळजेच्या मृतदेह शिव विच्छेदनासाठी चिखली येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला असून स्वताहा ठाणेदार रुपेश शक्करगे आणि भरत पोफळे सोबत होते. मृतक हा चिखली येथे राहत असुन ड्रायव्हर चे काम करत होता.मृतकाच्या पश्चात आई, वडील, दोन भाऊ,पत्नी एक मुलगी आहे.

दोन कुख्यात गुंड 'एमपीडीए'खाली अटक; जिल्हाधिकाऱ्यांचा मोठा निर्णय

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३: जिल्ह्यात गुन्हेगारीचा उच्छांक गाठलेल्या दोन कुख्यात गुंडांना अखेर 'एमपीडीए' (महाराष्ट्र प्रतिबंधात्मक धोरण अधिनियम) अंतर्गत अटक करण्यात आली असून त्यांना पुढील एक वर्षासाठी अकोला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. अकोट फाईल पोलीस ठाणे हद्दीतील संतोष उर्फ शेटटी पुरषोत्तम यंगड (३३), रा. पुरपीडीत कॉर्टर, अकोला) व ऋषीकेश उर्फ रूषी अंबादास बेले (२३), रा. लाडीस फाईल, अकोला) या दोघांवर याआधी खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, शस्त्र बाळगणे, शांतताभंग, अश्लील कृत्ये, जबर दुखापत, बेकायदेशीर जमाव निर्माण करणे, दंगा करणे अशा गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल होते. प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्यांच्यात बदल झाला नव्हता. या गुन्हेगारी पार्श्वभूमीचा गांभीर्याने विचार करून मा. जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दोघांना एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करण्याचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी अजित कुंभार यांच्याकडे सादर केला होता. यावर प्रक्रिया करताना स्वतःचे गुप्त स्त्रोत तपासून, कायदेशीर बाबींची पूर्तता करून, जिल्हादंडाधिकाऱ्यांनी दिनांक २३ जून २०२५ रोजी दोन्ही गुंडांना एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचा आदेश दिला. सदर आदेश तात्काळ अंमलात आणत दोघांना शोधून काढण्यात आले व त्यांना अकोला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले.

योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी - आयुक्त डॉ. लहाने

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

मनपात अधिकारी-कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

अकोला, दि. २३: योग म्हणजे मन, शरीर आणि आत्म्याचा समतोल ठेवणारे प्रभावी साधन. आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून अकोला महानगरपालिकेच्या वतीने मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली विविध अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उत्साहात सहभाग घेत योगासनांची सादरीकरण केली. डॉ. लहाने म्हणाले की, "योग ही भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून, दररोज काही वेळ योगासाठी दिल्यास उच्च रक्तदाब, मधुमेह, स्थूलपणा, थायरॉईड, मानसिक तणाव यांसारख्या आजारांवर नियंत्रण मिळवता येते. त्यामुळे निरोगी जीवनासाठी योग ही काळाची गरज आहे." योगाचार्य अशोक पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या शिबिरात आयुक्त डॉ. लहाने यांच्यासह सहायक आयुक्त दिलीप जाधव, राजेश सरप, सचिव अमोल डोईफोडे, पर्यावरण अधिकारी अनिल बिडवे, जितेंद्र तिवारी व विविध विभाग प्रमुख आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण परिसरात सकारात्मक ऊर्जा अनुभवली गेली. अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या एकत्रित सहभागामुळे योग दिनाचे औचित्य अधिकच उजळून निघाले.

इराण-इस्त्रायल संघर्षः भारताचा 'एलपीजी' साठा संपण्याच्या उंबरठ्यावर!

नवी दिल्लीः पश्चिम आशियातील वाढत्या सैन्य संघर्षामुळे भारताची चिंता वाढली आहे. भारत आपल्या एलपीजी पुरवठ्यासाठी या क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. भारतात वापरल्या जाणाऱ्या प्रत्येक तीन घरगुती एलपीजी सिलेंडरपैकी दोन पश्चिम आशियातून येतात. इराणने होर्मुझचा समुद्रमार्ग बंद करण्याचा प्रस्ताव मंजूर केला आहे. कच्चे तेल आणि एलपीजी पुरवठ्याचा हा प्रमुख मार्ग आहे. त्यामुळे या निर्णयाचा फटका बसणार आहे. एका वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार, देशात सध्या फक्त १६ दिवसांचा एलपीजी साठा आहे. दरम्यान, अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्यानंतर जर पश्चिम आशियातील तणाव आणखी वाढला आणि पुरवठा साखळी प्रभावित झाली, तर याचा सर्वात पहिला परिणाम सामान्य लोकांच्या स्वयंपाकघरावर होईल. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, देशात इच्छा असूनही मोठ्या प्रमाणात एलपीजी साठवणूक करू शकत नाही. याचे कारण साठवणुकीच्या मर्यादित सुविधा आहेत. देशात केवळ १६ दिवसांसाठी आवश्यक असलेला एलपीजी साठा करू शकतो. त्यामुळे एलपीजी पुरवठ्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा आल्यास देशात मोठे संकट निर्माण होऊ शकते. सध्या तरी जास्त धोका नाही, फक्त सतर्क राहण्याची गरज आहे असल्याचे सांगितले जाते आहे. गेल्या दशकात देशातील एलपीजीचा वापर दुप्पट झाला आहे. सरकारी योजनांमुळे आता ३३ कोटी घरांपर्यंत एलपीजी सिलेंडर पोहोचले आहेत. यामुळे आयातीवरील अवलंबिता देखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे. आपण आपल्या ६६% एलपीजी गरजा आयातीतून पूर्ण करतो आणि त्यापैकी सुमारे ९५% हिस्सा सौदी अरब, यूएई आणि कतार यांसारख्या पश्चिम आशियाई देशांतून येतो.

आर्णीत भिक्षुकांच्या वस्तीवर आढळले बोगस आधारकार्ड

मतदार यादीतही नावे!;महसूल अधिकाऱ्यांच्या पाहणीत धक्कादायक प्रकार उघड

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

आर्णी, दि.२३: आर्णी शहरात भिक्षेकरी म्हणून राहणाऱ्या एका समूहाकडे बोगस आधारकार्ड आणि मतदार ओळखपत्र आढळल्याने मोठी खळबळ उडाली आहे. शहरातील व्यापाऱ्यांच्या तक्रारीनंतर, प्रशासकीय अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीत हा धक्कादायक प्रकार समोर आला असून, यामागे मोठे रॅकेट असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आर्णीः आर्णी येथे संशयास्पद नागरिकांच्या वस्तीला भेट देऊन पाहणी करताना तहसीलदार वैशाख वाहुरवाघ, ठाणेदार नीलेश सुरडकर आणि मुख्याधिकारी रवींद्र राऊत.

शहरात गेल्या दोन-तीन वर्षांपासून काही लोक पालात (तंबू) राहत असून, त्यांच्या व्यसनाधीनतेमुळे आणि भांडण-तंट्यांमुळे स्थानिक व्यापारी आणि नागरिक त्रस्त झाले होते. या त्रासाला कंटाळून, व्यापाऱ्यांनी प्रशासनाकडे तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत, तहसीलदार वैशाख वाहुरवाघ, ठाणेदार नीलेश सुरडकर आणि मुख्याधिकारी रवींद्र राऊत यांनी प्रत्यक्ष वस्तीला भेट दिली. यावेळी, या लोकांकडे बनावट आधारकार्ड असल्याचे आढळून आले. धक्कादायक म्हणजे, त्यांची नावे मतदार यादीतही समाविष्ट असल्याचे उघडकीस आले. दोन हजार रुपयांमध्ये हे बनावट दस्तऐवज मिळवून देण्यात आल्याची माहिती समोर आल्याने, प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. या लोकांना रहिवासी दाखला कोणी आणि कशाच्या आधारावर दिला, यामागे कोणते सेतू सुविधा केंद्र आहे आणि या रॅकेटचे सूत्रधार कोण आहेत, याचा शोध घेणे आता गरजेचे बनले आहे. सुरुवातीला नगरपरिषद आणि पोलिसांनीही याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. या लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेत, कोणी राजकीय स्वार्थ तर साधत नाही ना, अशी चर्चाही आता सुरू झाली आहे. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून, यामागील सूत्रधारांवर आणि दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दोन हजारांत मिळतात बनावट दस्तऐवज

धक्कादायक बाब म्हणजे आर्णीतील एका सेतू सुविधा केंद्रातूनच दोन हजारांत बनावट दस्तऐवज मिळत असल्याचा आरोप होत आहे. ते सेतू सुविधा केंद्र कोणते..? यात कोणाचा प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे सहभाग आहे, त्यांना रहिवासी दाखला कोणी व कशाच्या आधारावर दिला यामागचे सूत्रधार व त्यांचा हेतू शोधणे गरजेचे आहे.

जिल्हा परिषद कन्या शाळा, दानापूर येथे प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

दानापूर (वा), दि. २३: उन्हाळी सुट्टीनंतर विदर्भातील शाळा २३ जून रोजी सुरू झाल्या असून, जिल्हा परिषद कनिष्ठ प्राथमिक कन्या शाळा, दानापूर येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाचा प्रवेशोत्सव मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. नवीन प्रवेश घेतलेल्या आणि वर्गोन्नत झालेल्या विद्यार्थिनींना फुलांनी सजविलेल्या पारंपरिक बैलगाडीत बसवून, बँड-बाजाच्या तालावर गावातून मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले होते. शाळेत दाखल झाल्यावर राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या वेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सूर्यकांत वैलकार, उपाध्यक्ष धम्मपाल वाकोडे, माजी पंचायत समिती सदस्य संदीप पालीवाल, गीताताई घायल, अकिल भाई, विक्रमभाऊ नांदूरकर, रवींद्र दांदळे, भीमराव कांबळे, प्रेस क्लब अध्यक्ष भगवान हागे, उपाध्यक्ष नंदकिशोर नागपुरे, ग्रामपंचायत सदस्य रवींद्र तायडे, मुख्याध्यापिका नयना कळंबे, शिक्षिका ठोंबरे मॅडम, नवलकर मॅडम, डिवरे मॅडम, शिक्षक सुतार सर, वानखडे सर, सचिन ठोंबरे सर यांची उपस्थिती लाभली. विद्यार्थिनींनी "आई, मी शाळेत जाणार; शिकून घराला पुढे नेणार!" असा ठाम निर्धार व्यक्त करत शाळेच्या पहिल्या दिवसाचा आनंद लुटला. या दिवशी सर्व विद्यार्थिनींना गणवेश, शूज, सॉक्स आणि नवीन पाठ्यपुस्तकांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

रिपाई (आठवले)अकोला जिल्हा बैठक संपन्न

रिपाईमध्ये शेकडो युवकांचा प्रवेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३: रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) अकोला जिल्हा बैठक जिल्हा अध्यक्ष सुनील अवचार यांच्या अध्यक्षतेखाली २२जून रविवारी शासकीय विश्राम गृह अकोला येथे संपन्न झाली. बैठक सुरु होण्यापूर्वी युवा नेते आशिष शिरसाट यांच्या सह शेकडो युवकांनी रिपाई (आठवले) पक्षात प्रवेश घेतला, या बैठकी मध्ये जिल्ह्यातील ज्या अतिक्रमण धारकांनी १४एप्रिल १९९० साला पूर्वी शेतीसाठी शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण केले.त्याचप्रमाणे गावठाण जमिनीवर रहिवाशी घरे बांधली त्यांच्या पाठीशी रिपाई खंबीर पणे उभे राहू असा ठराव या बैठकी मध्ये घेण्यात आला, यावेळी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत रिपाई ला मित्र पक्षाने राखीव जागा सोडाव्यात अन्यथा रिपाई स्वबळावर उभे करू असा निर्धार या जिल्हा बैठकीत करण्यात आला. तसेच श्रावण बाळ योजनेचे मानधन १५०० रुपयावरून ३००० रुपये करण्यात यावे या मागणीसाठी जिल्हाभर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.या बैठकीला जिल्हाभरातून युवक आघाडीचे जिल्हा अध्यक्ष बुद्ध भूषण गोपनारायण, अजय गवई, आशिष शिरसाट, गणेश थोरात, अनिल वाकोडे, संघदीप शेगांवकर, पंडित सदार, दयानंद तेलगोटे, दिनेश पेटकर, सुरज तायडे, किशोर नीलकंठ, सागर जामणिक, प्रकाश तायडे, समाधान वानखडे, विशाल सराटे, सागर तायडे, देविदास डोंगरे, राजेश आठवले, संघपाल उपर्वट, शकील अहमद, गौतम सावंग, मिलिंद सुर्वे, अमित वाहुरवाघ, मिथुन खंडेराव,जयेश तायडे, निखिल शिरसाट, संतोष मालगे, संतोष खंडारे, रोशन मोरे, रोनित राऊत, सुरेश सावळे, विजय इंगोले, शरद खांडेकर,रामाराव तायडे, भीमराव वाघमारे, संतोष उपर्वट,शे. हबीब शे. नबी. संदेश इंगळे, रामा पचांग, दीपक सदार, वैभव खंडारे, शंकरराव इंगळे, शालिग्राम पायधन,भीमराव वाघमारे,श्रीराम श्रीनाथ, जगन्नाथ आटोटे, सलीम पहेलवान, रामकृष्ण पुसाम,शोभाताई राठोड, गीताबाई जाधव, एकता राठोड, पुष्पबाई जाधव, शोभाताई खांडेकर, बेबीताई सुर्वे इत्यादी शेकडो कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.

यवतमाळ जिल्ह्यात 'शाळा बंद' आंदोलनाला प्रतिसाद

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

यवतमाळ, दि.२३: शासनाच्या शैक्षणिक धोरणाविरोधात येथील खासगी संस्था संचालक मंडळाने पुकारलेल्या 'शाळा बंद' आंदोलनाला आज, सोमवारी जिल्ह्यात शंभर चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील सर्व खासगी शाळांनी बंद पाळून आपल्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधले. गेल्या अनेक वर्षांपासून वेतनेतर अनुदानात होणारा विलंब, रिक्त शिक्षक पदांची भरती न करणे आणि शाळांच्या विविध मान्यता प्रक्रियेतील अडथळे यांसारख्या समस्यांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा बंद पुकारण्यात आला होता. हे आंदोलन शांततेत पार पडले, त्याला पालकांनीही समजून घेत पाठिंबा दिला. हा शासनाला दिलेला एक इशारा असून, मागण्या मान्य न झाल्यास भविष्यात तीव्र आंदोलन करू, असे संस्था मंडळाचे अध्यक्ष गणेश मोरे आणि सचिव अनिल गायकवाड यांनी सांगितले. दरम्यान, शैक्षणिक नववर्षाचे स्वागत समारंभ आता मंगळवारी, (दि. २४) रोजी जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये उत्साहात साजरा केला जाणार आहे.

युद्धाच्या विध्वंसात चिमुकल्यांची दुर्दशा

तेहरान, दि.२३ वृत्तसंस्था

रशिया-युक्रेन युद्धाला तीन वर्षांहून अधिक काळ लोटला आहे, पण ही लढाई काही केल्या थांबत नाही. त्याचप्रमाणे इस्रायल-पॅलेस्टाईन युद्धात हजारो लोकांनी आपले प्राण गमावले आहेत तर लाखो लोक विस्थापित झाले आहेत. परंतु जगात सुरू असलेल्या या युद्धांचा सर्वाधिक त्रास मुलांना सहन करावा लागत आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अलिकडच्या अहवालात याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे.संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार, गेल्या वर्षी अनेक संघर्षांमध्ये मुलांवरील हिंसाचाराणे पातळी गाठली आहे. गाझा आणि वेस्ट बँक, काँगो, सोमालिया, नायजेरिया आणि हैती यासारख्या ६ संघर्ष क्षेत्रांमधून मुलांवरील हिंसाचाराच्या बहुतेक घटना नोंदवल्या गेल्या आहेत. एपी अहवालानुसार, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्या सशस्त्र संघर्षातील मुलांवरील वार्षिक अहवालात असे दिसून आले आहे की २०२४ मध्ये १८ वर्षांखालील मुलांवरील गंभीर उल्लंघनांमध्ये २५ टक्के वाढ झाली आहे, तर २०२३ मध्ये या घटनांमध्ये २१ टक्के वाढ झाली आहे.

गुटेरेस यांनी या अहवालाविषयी बोलताना, संयुक्त राष्ट्रांनी मुलांविरुद्ध ४१,३७० उल्लंघने ओळखली आहेत, त्यापैकी ३६,२२१ २०२४ मध्ये झाले होते. उर्वरित ५,१४९ उल्लंघने आधी झाली होती परंतु गेल्या वर्षी त्याची पुष्टी झाली होती.

२ युद्ध अन ६ संघर्ष क्षेत्रे

या उल्लंघनांमध्ये मुलांची हत्या, त्यांना अपंग करणे, त्यांना भरती करणे, त्यांचे अपहरण करणे, त्यांच्यावर लैंगिक हिंसाचार करणे, शाळा आणि रुग्णालयांवर हल्ला करणे आणि त्यांना मानवतावादी मदत मिळण्यास नकार देणे यांचा समावेश आहे.या वर्षी, इस्रायली सैन्याला दुसऱ्यांदा काळ्या यादीत टाकण्यात आले आहे कारण सैन्याने ७,१८८ गंभीर उल्लंघने केली आहेत, ज्यात गाझामध्ये १,२५९ पॅलेस्टिनी मुलांची हत्या आणि ९४१ इतर जखमी आहेत. संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे की त्यांचे कठोर निकष आहेत आणि पडताळणी प्रक्रिया अजूनही चालू आहे. गाझाच्या आरोग्य मंत्रालयाने संयुक्त राष्ट्रांच्या अहवालापेक्षा खूपच जास्त आकडेवारी नोंदवली आहे.
गुटेरेस यांनी याविषयी माहिती देताना, व्यापलेल्या पॅलेस्टिनी प्रदेशात आणि इस्रायलमध्ये मुलांविरुद्ध गंभीर उल्लंघनांच्या वाढत्या संख्येने त्यांना धक्का बसला आहे .उल्लंघनांमध्ये वाढ झाल्याबद्दल, विशेषतः इस्रायली सैन्याने मोठ्या प्रमाणात मारलेल्या मुलांबद्दल त्यांना चिंता आहे. त्यांनी इस्रायलला आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन करण्यास आणि शाळा आणि रुग्णालयांच्या सुरक्षेसह मुलांसाठी विशेष संरक्षण सुनिश्चित करण्यास सांगितले. हल्ल्यांमध्ये सैनिक आणि नागरिकांमध्ये फरक करण्यास सांगितले तसेच नागरिकांना जास्त नुकसान होण्यापासून वाचवण्याच्या गरजांचे पालन करण्याच्या सूचना दिल्या. तर दुसरीकडे अहवालात हमासला देखील काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात रशियन सशस्त्र दलांना सलग तिसऱ्या वर्षी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे, ज्यामध्ये महासचिवांनी दावा केला आहे की युक्रेनमध्ये मुलांविरुद्ध गंभीर उल्लंघनांमध्ये वेगाने वाढ झाली आहे. अहवालानुसार, रशियन सैन्य ९४ युक्रेनियन मुलांच्या हत्येसाठी, ५७७ जणांना जखमी करण्यासाठी, शाळांवर ५५९ हल्ल्यांसाठी आणि रुग्णालयांवर ३०३ हल्ल्यांसाठी जबाबदार आहे.संयुक्त राष्ट्रांनी गेल्या वर्षी काँगोमध्ये ३,४१८ मुलांविरुद्ध ४,०४३ गंभीर उल्लंघने, सोमालियामध्ये १,९९२ मुलांविरुद्ध २,५६८ उल्लंघने, नायजेरियामध्ये १,०३७ मुलांविरुद्ध २,४३६ गंभीर उल्लंघने आणि हैतीमध्ये १,३७३ मुलांविरुद्ध २,२६९ गंभीर उल्लंघने नोंदवली आहेत.

अहवालानुसार, लैंगिक हिंसाचारात ३५ टक्क्यांनी वाढ झाली आहे तसेच ही संख्या खूपच कमी सांगण्यात आली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या प्रमुखांनी सांगितले की, मुलींच्या भरती आणि वापरासह, त्यांचे लैंगिक गुलामगिरीच्या उद्देशाने अपहरण करण्यात आले.

२०२४ मध्ये मुलांमध्ये लैंगिक हिंसाचाराच्या वाढत्या घटनांबद्दलही गुटेरेस यांनी चिंता व्यक्त केली आहे. यामध्ये टोळ्यांमध्ये भरती आणि वापर, लैंगिक हिंसाचार, अपहरण आणि मानवतावादी मदत नाकारण्याच्या घटनांचा समावेश आहे.

अहवालानुसार, २०२४ मध्ये २२,४९५ मुले हिंसाचाराने ग्रस्त झाली होती, त्यापैकी सुमारे ५० टक्के सशस्त्र दल जबाबदार आहेत आणि सरकारी सैन्य हे मुलांना मारण्याचे आणि अपंग करण्याचे, शाळांवर हल्ला करण्याचे आणि मानवतावादी मदत न देण्याचे मुख्य दोषी आहेत. अहवालात विविध उल्लंघनांना बळी पडलेल्या मुलांच्या संख्येत तीव्र वाढ नोंदवली गेली आहे, जी २०२३ मध्ये २,६८४ वरून २०२४ मध्ये ३,१३७ वर पोहोचली आहे.

थोडक्यात

कॅनडात पदवी समारंभात भारतीय विद्यार्थ्याचा 'शंकर भगवान की जय' चा नारा

सोशल मीडियावर दररोज काही ना काही वेगळं पाहायला मिळतात. कधी मनोरंजक, तर कधी भयावह व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात. डान्स, स्टंट, जुगाड यांसारख्या अनेक गोष्टी आपल्याला सोशल मीडियावर पाहायला मिळतात. केवळ आपल्या आसपासच्या परिसरातील किंवा आपल्या देशातीलच नव्हे तर संपूर्ण जगात सध्याच्या घडीला काय सुरु आहे हे पाहायला मिळते. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ कॅनडातील आहे. यामध्ये एका भारतीय विद्यार्थ्यांने पदवीदान समारंभात असे काही केलं आहे की सध्या त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, कॅनडात एका पदवीदान समारंभात दिल्लीतील एका भारतीय विद्यार्थ्याने शंकर भगवान की जय असा नारा दिला आहे. याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि सामुदायिक उत्सवाचा एक दुर्मिळ क्षण असे याचे वर्णन केले जात आहे. राहूल छिल्लार असे या विद्यार्थ्याचे नाव आहे. या विद्यार्थ्याने सास्काचेवान पॉलिटेक्निकमधून पदवी प्राप्त केली आहे. या विद्यार्थ्यांने संमारंभारच्या वेळी शंकर भगवान की जय असा नारा दिला आहे. अभिमानेने त्याने भगवान शंकराचा जयघोष केला आहे.व्हिडिओत तुम्ही पाहू शकता की, पदवीदान समारंभ सुरु आहे. यावेळी दिल्लीतील या राहूल छिल्लारचे नाव घेतले जाते. राहूल स्टेजवर येतो. यावेळी आपल्या ग्रॅज्युएशन स्पीचच्या वेळी तो शंकर भगवान की जय असा जयघोष करतो. त्यानंतर पदवी देण्याऱ्याशी हातमिळवणी करतो आणि आपली पदवी घेतो.

राजदच्या अध्यक्षपदासाठी लालूंनी दाखल केला अर्ज

पाटणा : बिहारचे माजी मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांनी सोमवारी राष्ट्रीय जनता दलाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. लालूंनी पाटण्यातील वीरचंद पटेल पथ येथील पक्षाच्या केंद्रीय कॅम्प ऑफिसमध्ये राष्ट्रीय निवडणूक अधिकारी डॉ. रामचंद्र पूर्वे आणि सहाय्यक राष्ट्रीय निवडणूक अधिकारी चित्तरंजन गगन यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज सादर केला.यावेळी माजी मुख्यमंत्री आणि लालूंच्या पत्नी राबडी देवी, मुलगा आणि विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव, लोकसभा खासदार आणि कन्या मीसा भारती, राजदचे बिहारचे अध्यक्ष मंगनीलाल मंडल, अब्दुलबारी सिद्दीकी इत्यादी उपस्थित होते. लालूंची बिनविरोध निवड निश्चित मानली जाते आहे. या पदासाठी दुसरा कोणीही दावेदार नसल्यामुळे पक्षाच्या घटनेनुसार फक्त निवडणुकीची औपचारिकता पूर्ण करायची आहे. पक्षाच्या संघटनात्मक अधिवेशनासाठी राष्ट्रीय जनता दलाच्या निवडणुकीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.या टप्प्यात, राष्ट्रीय अध्यक्षाची निवड प्रामुख्याने होणार आहे. यासाठी लालूंनी सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. मंगळवारी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत राष्ट्रीय सहाय्यक निवडणूक अधिकारी चित्तरंजन गगन हे नामांकन पत्रांची तपासणी करतील.

भारतासोबतचा सिंधू जल करार वादात

५७ इस्लामिक देशांचा पाकिस्तानच्या सूरात सूर

इस्लामाबाद दि.२३ वृत्तसंस्था

इस्लामी सहकार्य संघटना() च्या परराष्ट्र मंत्र्यांच्या परिषदेत भारताने पाकसोबतचा सिंधू जल करार पूर्ववत करण्याच्या मागणीवर जोर दिला. ५७ इस्लामिक देशांच्या या संघटनेची बैठक रविवारी तुर्कीच्या इंस्ताबुलमध्ये पार पडली. त्यात सिंधू जल करारासह पाकिस्तान-भारत यांच्यातील द्विपक्षीय कराराचे पालन करावे असं आवाहन दोन्ही देशांना केले. संघटनेचा हा आग्रह पूर्णपणे पाकिस्तानच्या समर्थनार्थ असल्याचे दिसून आले.
सीएफएमकडून जारी केलेल्या निवेदनात म्हटलंय की, दक्षिण आशियात अलीकडच्या काळात झालेल्या सैन्य कारवाईवर आम्हाला चिंता आहे. यात भारताने पाकिस्तानात अनेक ठिकाणी हल्ले केले. आम्ही दोन्ही देशांना संयम बाळगून आक्रमक भूमिका न घेण्याचं आवाहन करतो. त्याशिवाय सिंधू जल



करार रोखला जाऊ नये. आधीसारखे या दोन्ही देशांनी कराराचे पालन करावे असं त्यांनी सांगितले. इंस्ताबुलमध्ये आयोजित या इस्लामिक देशांच्या बैठकीत सिंधू जल करारासोबतच काश्मीर मुद्द्यावरही इतर देशांनी पाकिस्तानच्या सूरात सूर मिसळले. आम्ही संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद, प्रस्ताव आणि काश्मिरी लोकांच्या इच्छेनुसार त्यांच्या मानवाधिकाराचे पूर्णपणे समर्थन व्यक्त करतो असं सीएफएमने सांगितले. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक डार या बैठकीत सहभागी होण्यासाठी तुर्कीला गेले होते. डार यांच्यासोबत पाकिस्तानी सैन्याचे फिल्ड मार्शल असीम मुनीरही तुर्कीत होते. मुनीर यांनी तुर्कीचे राष्ट्रपती रेसेप एर्दोगन यांची भेट घेतली. या बैठकीचा परिणाम बैठकीनंतर करण्यात आलेल्या विधानावरून दिसून आला. सिंधू जल करारावर भारत आणि पाकिस्तान यांच्यात १९६० स्वाक्षरी झाली होती. या करारानुसार भारत आणि पाकिस्तानात नद्यांच्या पाण्याचे वाटप झाले. भारताने २२ एप्रिलच्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सिंधू जल कराराला स्थगिती देत पाकिस्तानला मोठा झटका दिला. भारताच्या या कठोर निर्णयामुळे बिथरलेल्या पाकिस्तानी नेत्यांनी भारताला थेट युद्धाचीही धमकी दिली.

हल्ल्यानंतर पहलगाम पर्यटकांनी पुन्हा गजबजले- ओमर अब्दुल्ला

जम्मू: दि.२३ वृत्तसंस्था

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे अलिकडेच झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पर्यटकांच्या संख्येत सातत्याने घट होत होती. या हल्ल्याचा स्थानिक व्यापारी, हॉटेल व्यावसायिक आणि मार्गदर्शकांच्या दैनंदिन कमाईवर व्यापक परिणाम झाला. बाजारपेठांमध्ये शांतता होती आणि हॉटेल्स रिकामी पडली होती. पण आता परिस्थिती हळूहळू बदलत आहे. पर्यटक पुन्हा येऊ लागले आहेत.मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी रविवारी सोशल मीडियावर पहलगामचे काही फोटो शेअर केले आहेत. ज्यामध्ये हे स्पष्टपणे दिसून येते की हा परिसर पुन्हा एकदा गर्दीने भरलेला आहे. ओमर अब्दुल्ला यांनी लिहिले, मी गेल्या वेळी पहलगामला सायकल चालवत असताना एका बाजारपेठेजवळून गेलो होतो तेव्हा हे ठिकाण जवळजवळ निर्जन होते. पण आज मी एका अशा पहलगाममध्ये परतलो आहे जे गर्दीने भरलेले आहे.ओमर अब्दुल्ला म्हणाले की, देशाच्या विविध भागातून पर्यटक येथे येत आहेत. थंडी आणि हलक्या पावसात लोक त्यांच्या कुटुंबियांसोबत पिकनिक साजरी करत आहेत. मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी केलेल्या प्रयत्नांना आता हळूहळू फळ मिळत आहे हे पाहून खूप समाधान होत आहे.
पर्यटकांच्या परतण्याने स्थानिक व्यापाऱ्यांच्या चेहऱ्यावर हास्य परत आले आहे. हॉटेल्स, टॅक्सी सेवा, दुकानदार आणि इतर छोटे व्यावसायिक आता आशावादी आहेत की येत्या काळात पर्यटकांची संख्या वाढेल. ज्यामुळे त्यांना रोजगार मिळेल.पहलगाम हे अमरनाथ यात्रेतील एक महत्त्वाचा थांबा तसेच एक प्रमुख पर्यटन स्थळ आहे. पर्यटन हा येथील स्थानिक अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अशा परिस्थितीत, पर्यटकांचे परतणे हे केवळ सौंदर्याचा आनंद घेण्यासारखे नाही, तर रोजगार आणि स्थिरतेचे पुनरागमन देखील मानले जाते.

रशियाचा युक्रेनची राजधानी कीवमध्ये कहर

कीव :दि.२३ वृत्तसंस्था

सध्या जग दोन आघाड्यांवर युद्ध लढत आहे. एकीकडे मध्य पूर्वेत इराण आणि इस्रायल आणि दुसरीकडे रशिया आणि युक्रेनमध्ये युद्ध सुरु आहे. सध्या मध्य पूर्वे त अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्यानंतर तीव्र संघर्ष उफाळला आहे. इराणने देखील प्रतिहल्ल्याची धमकी दिली आहे. याकडे सर्वांचे लक्ष लागले असतानाच दुसरीकडे रशियाने युक्रेनमध्ये कहर माजवला आहे. यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रशियाने युक्रेनची राजधानी कीववर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत. यामध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेकजण जखणी झाले आहे. अशी माहिती कीवच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी दिली. रशियाने कीवमधील एका रहिवासी इमारतीला लक्ष केले आहे. यामुळे संपूर्ण इमारतीचे ढासळल्या आहे. सध्या ढिगाऱ्याखाली अडकेलेल्या लोकांच्या बचावाचे कार्य सुरु आहे. युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री उशिरा हा हल्ला करण्यात आला आहे.अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमींमध्ये तीन लहान मुलांचा समावेश आहे. कीवच्या नैऋतेस बिला त्सेरक्वा शहरातही रशियाने हल्ला केला आहे. यामध्ये एकाचा मृत्यू आणि आठ जखमी झाले आहेत. या हल्ल्याच्या एक आठवड्यापूर्वी देखील रशियाने युक्रनेवर हल्ला केला होता. या हल्ल्यात कीवमधील २८ जणांचा मृत्यू झाला होता. रशियाने कीवमधील रहिवासी इमारतींवर क्षेपणास्त्रे डागली होती. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी या हल्ल्याचे युद्धातील सर्वात मोठ्या बॉम्बस्फोटांपैक एक म्हणून केले होते.तसेच सोमवारी (२३ जून) पहाटे देखील कीवमदील रहिवासी इमारती, रुग्णालये आणि क्रीय संकुलांन लक्ष्य करण्यात आले. सर्वात जास्त नुकसान शेवचेनकिव्स्की शहरात झाले असल्याचे युक्रेनच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. कीवचे महापौर विटाली क्लित्स्को यांनी दिलेल्या माहितीनुसार, शेवचेनकिव्स्कि प्रदेशात रशियाच्या हल्ल्यामुळे सहा जणांचा मृत्यू झाला आहे. रशियाने एका रहिवासी इमारतीवर हल्ला केला होता. युक्रेनच्या हवाई दलाने दिलेल्या माहितीनुसार, रशियाने रात्रभर एकूण ३५२ स्फोटक ड्रोन आणि डेकॉय सोडले. तसेच ११ बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे आणि पाच क्रूझ क्षेपणास्त्रांचा देखील हल्ला केला आहे.सध्या इराण आणि इस्रायलमध्ये तीव्र युद्ध सुरु आहे.

युद्धाच्या मैदानात आता मच्छर उतरवणार चीन

असे तंत्रज्ञान ज्याचा अमेरिकेने विचारही केला नसेल

जगात सध्या युद्धाचे वातावरण असताना चीन सातत्याने त्यांना सशक्त करण्यासाठी पुढाकार घेत आहे. त्यातच चीनने एक पाऊल पुढे टाकले आहे. चिनी वैज्ञानिकांनी एक मिलिट्री ड्रोन तयार केले आहे. या ड्रोनची साईज आणि आकार एका मच्छरासारखा आहे.

विद्यार्थी लियांग हेक्सियांगने म्हटलं की, माझ्या हातात मच्छरासारखा एक खास रोबोट ड्रोन आहे. याप्रकारचे छोटे बायोनिक रोबोट खासकरून गुप्त माहिती आणि युद्धाच्या मैदानात उपयोगी ठरणार आहे.चीनने विकसित केलेले हे छोटे ड्रोन अतिमहत्त्वाच्या मिशनसाठी खूप उपयोगी पडणार आहेत, कारण त्याच्याबाबत कुणालाही काही माहिती मिळणार नाही आणि सहजपणे हे ड्रोन देखरेखीसाठी वापरले जाऊ शकतात.

आपत्कालीन परिस्थितीत अडकलेल्या लोकांच्या मदतीसाठीही या मच्छर ड्रोनचा वापर केला जाऊ शकतो. एखाद्या मलब्याखाली अडकलेल्या व्यक्तींचा शोध घेतानाही या ड्रोनचा विशेष फायदा होणार आहे.त्याशिवाय हवेची गुणवत्ता किंवा पाण्याची गुणवत्ता यासारख्या पर्यावरणीय परिस्थितीचे निरीक्षण करण्यासाठी सेन्सर्ससह माइक्रो ड्रोनचा वापर केला जाऊ शकतो.

मच्छरच्या आकाराचे हे ड्रोन युद्धाच्या मैदानात विध्वंस करण्यासाठी सज्ज आहेत. विशेष म्हणजे या खास ड्रोनचा वापर करून ना केवळ सर्विलांस करता येऊ शकते तर त्याचा वापर करून एखादे मिशन यशस्वीही करता येऊ शकते. साऊथ चायना मॉर्निंग पोस्टनुसार, चिनी वैज्ञानिकांनी त्यांच्या मिलिट्री ऑपरेशनसाठी मच्छरच्या आकाराचे एक खूप लहान ड्रोन तयार केले आहे. हे माइको ड्रोन नॅशनल युनिवर्सिटी ऑफ डिफेन्स टेक्नोलॉजीच्या रोबोटिक्स प्रयोगशाळेत विकसित करण्यात आले आहे. जे मध्य चीनच्या हुनान प्रांतात आहे.हे माइको ड्रोन आकाराने छोटे आणि कॉम्पॅक्ट आहेत. त्याचा वापर मिलिट्री आणि डिफेन्सशिवाय विविध च्या माध्यमातून केला जाऊ शकतो. रिपोर्टनुसार, हा प्रोटोटाइप संशोधकांकडून सीसीटीव्ही ७ डिस्प्लेवर तयार केला आहे.
मच्छराच्या आकाराच्या या ड्रोनमध्ये २ छोटे पंख आहेत, ज्याने ते हवेत उडू शकते.सोबतच या ड्रोनला मच्छरांसारखे ३ पायदेखील आहेत. हा ड्रोन स्मार्टफोनने कंट्रोल केला जाऊ शकतो. हे जवळपास एक मच्छर म्हणजे १.३ सेंटीमीटर लांब आहे. त्यामुळेच याला असं म्हटले जाते.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

संपादकीय...

दुतोंड्या पाकिस्तान

अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार दिला जावा, अशी शिफारस दोनच दिवसांपूर्वी पाकिस्तानने केल्यामुळे जागतिक स्तरावर पुन्हा एकदा नोबेल पुरस्काराची चर्चा सुरू झाली असतानाच काल अमेरिकेने इराणवर हल्ला चढविताच पाकिस्तानने दुतोंडी भूमिका घेत डोनाल्ड ट्रम्प यांचा तीव्र निषेध नोदविला, त्यामुळे पाकिस्तानचे पितळ पुन्हा उघडे पडले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील लष्करी संघर्ष थांबविण्यात मोठी भूमिका बजावून शांतता प्रस्थापित केल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार दिला जावा, अशी शिफारस पाकिस्तानकडून करण्यात आली आहे. त्यानंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना डोनाल्ड ट्रम्प यांनी 'मला कधीच शांततेचे नोबेल मिळणार नाही' असे म्हटले आहे. अर्थात, डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्याला नोबेल पुरस्कार मिळावा अशी अपेक्षा लपवून ठेवलेली नाही. अध्यक्षपदाच्या पहिल्या कारकिर्दीतही त्यांनी अनेक वेळा मी शांततेच्या नोबल पुरस्काराचा हक्कदार आहे असे जाहीर व्यासपीठावर सांगितले होते आणि यावेळी दुसरा टर्ममध्येसुद्धा त्यांनी आपली ही महत्त्वाकांक्षा लपवून ठेवलेली नाही. पण पाकिस्तानने केलेल्या शिफारसीनंतर प्रतिक्रिया व्यक्त करताना आपल्याला नोबेल पुरस्कार मिळणार नाही याची जी कारणे त्यांनी दिली आहे त्यामध्येच त्यांची महत्त्वाकांक्षासुद्धा दिसून येते. गेल्या काही वर्षांच्या कालावधीमध्ये आपण जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी काय काय केले याची जंत्री या निमित्ताने त्यांनी वाचून दाखविली आहे. गेली तीन वर्षे सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध थांबविण्यासाठी आपण खूप प्रयत्न केले असे त्यांचे म्हणणे आहे, तर भारत-पाकिस्तान संघर्ष तीव्र होऊ नये म्हणून तो थांबविण्यासाठी आपण प्रयत्न केले, असाही त्यांचा दावा आहे. हा दावा भारताने नेहमीच खोडून काढला आहे. इस्रायल आणि इराण यांच्यातील लष्करी संघर्षामध्येसुद्धा अमेरिकेची शांततेची भूमिका असल्याचा दावा ट्रम्प यांनी केला असला, तरी कालच अमेरिकेने इराणच्या तीन अणुतळांवर हल्ले केल्याने खळबळ उडाली आहे. यापूर्वी अमेरिकेच्या ज्या अध्यक्षांना या पुरस्काराने गौरविण्यात आले होते त्या बराक ओबामा यांना मिळालेल्या शांततेच्या नोबेलवर ट्रम्प यांनी जोरदार टीका केली होती. अध्यक्षपदावर विराजमान झाल्यावर नऊ महिन्यांतच बराक ओबामा यांना शांततेचा नोबेल देण्यात आला होता. कोणतेही कारण नसताना ओबामा यांना शांततेचे नोबेल मिळते तर मी एवढ्या सगळ्या गोष्टी केल्यानंतर मला ते का मिळू नये, असा दावा ट्रम्प यांनी केला आहे. या काही वर्षांमध्ये दरवर्षी कोणता तरी देश, देशांचा समूह ट्रम्प यांना आता नोबेल मिळावे म्हणून शिफारस करीत असतात. पण आतापर्यंत नोबेल पुरस्कार देणाऱ्या समितीने या शिफारशीला मान्यता दिलेली नाही. आताही पाकिस्तानने केलेल्या शिफारसीकडे आणि अमेरिकेच्या इराणवरील हल्ल्यानंतर केलेल्या टिकेकडे फारसे लक्ष दिले जाईल असे नाही. आजपर्यंतचा नोबेल शांतता पुरस्काराचा इतिहास पाहिला तर रूझवेल्ट किंवा ओबामा यांच्यासारखे काही अपवाद वगळता देशाच्या प्रमुखांना खूप कमी प्रमाणात नोबल देण्यात आले आहे. शांतता प्रस्थापित करणाऱ्या लोकांसाठीच हा नोबेल पुरस्कार आरक्षित असतो. मदर तेरेसा किंवा मलाला युसूफझाई यासारख्या लोकांनी ज्या पुरस्कारावर मोहर उमटविली आहे त्या पुरस्कारांचा सन्मान डोनाल्ड ट्रम्प यांच्यासारख्या संघर्षवादी नेत्यांना दिला जाईल अशी कोणतीही शक्यता दिसत नाही. जगाच्या कानाकोपऱ्यात अनेक ठिकाणी लष्करी संघर्ष सुरू असताना तो संघर्ष मिटविण्याचे काम करण्याऐवजी त्यात तेल ओतण्याचे काम अमेरिकेकडून अनेक वेळा होत असते. विशेषतः ट्रम्प यांच्या अध्यक्ष कारकिर्दीमध्ये अमेरिकेत संघर्षाची परिस्थिती वाढत चालली आहे. अमेरिकेतील अनेक राज्यांमध्ये अस्वस्थता वाढत चालली आहे. अजूनही काही शहरांमध्ये हिंसाचार सुरू आहेत. सर्व गोष्टी समोर दिसत असतानासुद्धा पाकिस्तानने केवळ अमेरिकेची मैत्री असावी या एकाच हेतूने डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार दिला जावा अशी शिफारस केली होती परंतु मुस्लिम देश ईराणवर अमेरिकेने हल्ला करताच पाकिस्तानची भूमिका बदलली आहे. भारत आणि पााकिस्तान यांच्यातील संघर्ष कोणाच्याही मध्यस्थीमुळे संपला नाही, हा जो भारताचा दावा आहे तो हाणून पाडण्यासाठीच पाकिस्तानकडून या रणनीतीचा वापर केला जात आहे हे उघड आहे. आता भारतालासुद्धा या रणनीतीला उत्तर द्यावे लागणार आहे. जगात अनेक ठिकाणी सध्या अशांत परिस्थिती असताना आणि लष्करी संघर्ष वाढत असताना जगातील कोणतीही व्यक्ती किंवा संस्था सध्या शांततेचा नोबल पुरस्कार देण्याच्या पात्रतेची नाही असाच निष्कर्ष या निमित्ताने काढावा लागणार आहे. या निमित्ताने आपल्या पात्रतेचे ढोल बडवून घेण्याचे कारण डोनाल्ड ट्रम्प यांना मिळाले आहे. पाकिस्तानसारखे देश राजकीय लाभाचा विचार करूनच या विषयाकडे पहात आहेत. हाच या संपूर्ण प्रकरणाचा निष्कर्ष आहे. पाकिस्तान सरकारने केलेल्या शिफारशी आणि त्यानंतर ट्रम्प यांच्या केलेल्या निषेधाचा परिणाम होऊन डोनाल्ड ट्रम्प यांना शांततेचे नोबेल पुरस्कार मिळण्याची कोणतीही शक्यता नाही हेही समजून घ्यायला हवे.

पुरावे

लक्ष्यभेद

जयदीप सोनखासकर
9890508017

डाटा तो राहायचा वर्षभर
पंचेचाळीस दिवस ठेवणार
निवडणूक आयोग सर्वांस
ही खरंच कमाल दाखवणार

ज्यांच्याकडून हवे उत्तर
तेच नष्ट करतात पुरावे
कशी झाली मॅच फिक्सिंग
आयोगाने खरंच सांगावे

केंद्रीय संस्थांची सध्यस्थिती
आता काय राहुल बोलणार
ज्याची खरंच सत्तेत चालती
तोच मलिदा इथे चाखणार

।। अभंगवाणी ।।

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



का ? कधी इच्छेला
मरण असते ।
अमर असते
अनंत ती ।।

इच्छा स्व: पुरता
अनमोल आहे ।
मातीमोल आहे
जगासाठी ।।

इच्छेला लगाम
मनाचा असावा ।
उगाच नसावा
देखावा तो ।।

इच्छाही असते
सर्वांसाठी जेव्हा ।
अनमोल तेव्हा
असते ती ।।

सांजवेळी उजळावे आठवणींचे दिवे

सप्तरंग
डॉ . विनय व. दांदळे
९८२२२ ३१७६९



मनाच्या सांजवेळी शब्दही थांबतात, डोळ्यांतल्या शांततेला अर्थ लाभतो, आणि अशा क्षणी, कुणीतरी ''आपलं'' आठवतं, ज्याच्या आठवणींनीच मन गहिवरून येतं. सांजवेळी आकाशाचं रंगवलेलं चित्र पाहताना मनदेखील हळवं होतं एखादा शब्द, एखादी नजर, एखादं स्मरण आणि मनाच्या अंतरंगात हळूच पेटतो एखादा आठवणींचा दिवा.

काही संध्याकाळी शब्द नसतात, पण भावना असतात ज्या आठवणींच्या शिडकाव्यात मन भिजतं आणि एक हलकंसं हास्य डोळ्यांत उतरून जातं माणसाचं मन म्हणजे एक आभाळ केव्हा कोसळेल, केव्हा हसेल, केव्हा शांत होईल याचा काही नेम नसतो. काही क्षण असे असतात, जेव्हा दिवसभरात घडलेली कोणतीही गोष्ट, एखादा शब्द, एखादी नजर, एखादी आठवण, नकळत आपल्या मनाच्या आभाळावर ढग जमवून टाकते. आणि मग आत कुठेतरी एक शून्य पसरू लागतं. एक उदासी जी नेमकी शब्दांत पकडता येत नाही, पण हृदयाच्या कोपऱ्यांतून अलगद झिरपत राहते.

मन उदास झालं की मग आठवणींचा एखादा कोपरा उघडतो जिथे आपली ''जवळची माणसं'' राहतात. त्या आठवणी म्हणजे एखाद्या जुन्या वळणावर विसावलेली गंधाळलेली फुलं ज्यांच्यावर काळाचा धूळसाच बसलेला असतो, पण स्पर्श केला की अजूनही त्यांचा सुगंध मनभर दरवळतो.

उदासी म्हणजे मनाची संध्याकाळ असते सूर्य अस्ताला गेलेला असतो, पण अंधार अजून पूर्ण उतरलेला नसतो. आणि त्या काळसर प्रकाशात आपल्याला आठवतं, कोणीतरी होतं ज्याच्याशी बोलल्याशिवाय मन मोकळं व्हायचं नाही. जणू त्याच्या आवाजातच आपल्याला आपली शांतता गवसत असे. मैत्री म्हणजे संध्याकाळच्या आभाळात उठलेली पहिली तारा, जी प्रकाश देईपर्यंत फक्त आपल्यासाठी चमकत राहते. प्रेम म्हणजे क्षितिजावर पसरलेला लालसर सोनेरी रंग, जो क्षणभंगुर असतो, पण त्या क्षणात संपूर्ण आकाश सुंदर होऊन जातं. आणि नाती म्हणजे संध्याकाळी विझलेले पण अजून उब देणारे दिवे, जे आपल्याला आठवण करून देतात आपण एकटे नाही. या सगळ्या ''जवळच्या माणसां''च्या आठवणी म्हणजे आपल्या हृदयातल्या दिवाळी. दरवर्षी येणाऱ्या सणासारख्या त्या आठवणीही चांगल्या-वाईट अनुभवांच्या वाती घेऊन येतात त्या उजळतात, कधी डोळ्यांत ओलाही आणतात, पण शेवटी त्या आपल्याला 'जिवंत' असल्याची जाणीव करून देतात. कधी मैत्रीणच्या खांद्यावर डोकं ठेवलं होतं कधी प्रिय व्यक्तीला हळूच सांगू न शकलेलं ऐकवायचं होतं कधी घरातल्या व्यक्तीच्या कुशीत विसावायचं होतं ही सगळी 'जवळची माणसं' म्हणजे आपण हरवलेल्या असंख्य तुकड्यांचा जिवंत कोलाज आहेत. त्यांच्या आठवणींनीच आपली आतली उदासी वितळू लागते.

कारण मनाचं हे असं असतं जेव्हा काहीच समजत नाही, तेव्हा ते जवळच्यांकडे धावतं. जणू सायंकाळची पाखरं पुन्हा घरट्याकडे येतात तसं. आजच्या या धावपळीच्या आणि गजबजलेल्या जीवनात माणूस एकटाच झालाय. संपर्क वाढले, पण संवाद हरवले. नात्यांची संख्या वाढली, पण 'आपुलकी' हरवली. म्हणूनच मनाचा एक कोपरा अधूनमधून उदास होतो. आणि तेव्हा त्याला हवं असतं एक नाव, एक आवाज, एक स्पर्श जो फक्त 'आपल्यासाठी' असतो. मनाचं हे गूढ विश्व खोल आहे त्यात कधी गाणी पाझरतात, कधी आठवणींची चांदणं झरतात, कधी अश्रूंनी अंधार भरतो. पण त्या प्रत्येक सायंकाळी, जर आपल्या मनात 'जवळची माणसं' असतील तर आपण एकटे नसतो.

प्रत्येक उदास संध्याकाळी हृदयात एक दिवा लावायचा असतो आठवणींचा दिवा आणि त्याच्या प्रकाशात आपली उदासी लपून जाते, आपल्या मनाला एक 'ओळखीची ऊब' मिळते. दिवाळी आली की आपण आकाशकंदील लावतो, पण मनाचं आकाश मात्र 'आपल्या माणसांच्या' आठवणींनी उजळवावं लागतं. कारण ''माणसाचं मन फुलवणाऱ्या दिव्यांना नातं, मैत्री आणि प्रेम म्हणतात आणि अशा दिव्यांच्या उजेडातच माणूस खरंच झळाळतो.'' नात्यांच्या दिव्यांनी उजळू दे ही सायंकाळ, मैत्रीच्या चांदण्यात विरघळू दे ही हुरहुर, प्रेमाच्या एका हसऱ्या स्पर्शात विसावू दे हे मन, कारण शेवटी ''आपलं'' कुणीतरी असणं हेच खरं जीवन ....

मनाच्या गाभाऱ्यात जेव्हा उदास संध्याकाळ पसरते, तेव्हा आपुलकीचा एखादा उजळ दिवा पुरेसा असतो नात्यांचा तो कोमल उजेड मैत्रीचा तो शांत श्वास आणि प्रेमाचा तो निःशब्द स्पर्श हेच आपलं खरं वैभव खरं अस्तित्व. कारण शेवटी ''जवळचं कुणीतरी असणं'', हीच आपल्या मनाची खरी दिवाळी असते...

आषाढ वारी : भक्ती, संस्कृती आणि एकतेचा संगम


संस्कृती
चंद्रकांत पोरे
मराठी विभाग प्रमुख, प्रभात किड्स स्कूल

वारकरी संप्रदाय म्हणजे एक चैतन्य, श्रद्धा, आणि समर्पणाचा प्रवाह. आषाढी एकादशी म्हणजे या प्रवाहाचा काठोकाठ भरून वाहणारा पवित्र दिवस. या दिवशी पंढरपूरच्या विठोबा-माऊलीच्या भेटीची ओढ असते ती लाखो वारकऱ्यांच्या अंतःकरणात. प्रत्येक वारकऱ्याच्या पावलात, टाळ-मृदंगाच्या गजरात, ज्ञानोबा माऊली तुकारामच्या जयघोषात आणि पुंडलिक वरदा हरी विठ्ठलच्या उद्गारात भक्तीचा झरा वाहत असतो. पंढरपूरची आषाढी वारी ही केवळ परंपरा नाही ती एक जीवनशैली आहे. वारी म्हणजे फक्त पंढरपूर गाठणे नव्हे, ती अंत:करण गाठण्याची यात्रा आहे. पांडुरंगाच्या भेटीच्या निमित्ताने माणूस स्वतःला शोधतो, शुद्ध करतो, विठोबाच्या पायाशी सगळं अर्पण करून शांत निर्मळ भाव आपल्या मनात रुजवतो.

पालखी म्हणजे फक्त संतांच्या मूर्तींची मिरवणूक नाही, ती एक श्रद्धेची यात्रा आहे. देव आणि भक्त यांच्यातील नातं या पावन सोहळ्याच्या माध्यमातून अधिक गहिरं होतं. ही वारी म्हणजे समाजात समानतेचा आणि समरसतेचा महामंत्र जपणारा भक्तिपंथ आहे. इथे कुणी मोठं, कुणी लहान, कुणी स्पृश्य-अस्पृश्य, कुणी स्त्री-पुरुष असा भेदभाव नसतो. सगळे फक्त वारकरी असतात पांडुरंगाचे भक्त. संत ज्ञानेश्वरांनी लहान वयात भागवत धर्म गाठला आणि त्यांच्या पालखीने वारीची सुरुवात झाली. तुकाराम महाराजांच्या अभंगांनी या वारीला जीव दिला. सावता माळी, चोखामेळा, नामदेव, एकनाथ, जनाबाई या संतांनी वारकरी संप्रदायाला समतेचा गारुड दिलं. वारीत चालताना लाखो पावलं एकत्र चालतात, पण त्यांचा हेतू एकच असतो पांडुरंगाच्या चरणी पोहोचायचं. रस्त्यात येणाऱ्या अडचणी, पावसाची शिडकावणी, उन्हाचा तडाखा, थकवा, वेदना काहीही असो, पण या भक्तीच्या प्रवाहात कुणी थांबत नाही. कारण इथे चालणं हेच साधन आणि ध्येय दोन्ही आहे. या वारीत दिसतो तो आपुलकीचा, प्रेमाचा आणि बंधुभावाचा एक अद्भुत अनुभव. एका पंक्तीत अन्नदान घेताना कोणी कोण याचं भान राहत नाही. डोळ्यांत भाव, मुखावर हरिपाठ आणि मनात विठोबाच्या भेटीची आस हेच त्या क्षणाचे खरे अलंकार असतात. स्त्री-पुरुष समानतेचा देखील हा सोहळा एक आदर्श नमुना आहे. स्त्रिया पारंपरिक वेशात फुगडी घालत, टाळ वाजवत, अभंग गात वारीमध्ये सहभागी होतात. त्या केवळ सहभागीच नाही, तर वारीच्या संस्कृतीची वाहकही असतात. वारीने समाजातील अनेक रूढी परत फेकून दिल्या आणि माणूसपणाची खरी ओळख दिली. वारकरी संप्रदायाचे संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, चोखामेळा, जनाबाई, एकनाथ, सावता माळी यांचं कार्य आणि विचार वारीच्या प्रत्येक टप्प्यात झळकतो. चोखामेळ्यासारखा अस्पृश्य मानला गेलेला संत जेव्हा या वारीचा अविभाज्य भाग बनतो, तेव्हा ती खरी सामाजिक क्रांती ठरते. वारी म्हणजे चालत राहण्याची शिकवण, एकमेकांची मदत करण्याची भावना, आणि सर्व भेद विसरून एकच नामस्मरण करण्याची वृत्ती. या वारीचा शेवट फक्त पंढरपूरात होत नाही, तो घडतो मनात. कारण विठोबा बाहेर नसतो, तो अंतःकरणात असतो. पालखी आणि वारी हे त्याच्याशी होणाऱ्या मनस्वी भेटीचं माध्यम आहे. वारी हे नुसती चाल नाही, ती सामाजिक समतेची शाळा आहे, प्रेमाची भाषा आहे आणि आत्मिक उन्नतीचा मार्ग आहे. म्हणूनच वारी हे आस्थेचं, भक्तीचं आणि एकतेच चिरंतर प्रतीक आहे. जी पिढ्यानपिढ्या माणसाच्या मनात शाश्वत आणि पवित्र चैतन्य फुंकत राहील.

जी ७ परिषदेचे मर्यादित यश

आंतरराष्ट्रीय
भालचंद्र ठोंबरे
९८३४३५०८९५

जी सेवन म्हणजे ग्रुप ऑफ सेव्हन. सात प्रमुख औद्योगिक विकसीत राष्ट्रांचा गट. या गटात फ्रान्स, संयुक्त अमेरिका, ब्रिटन ,जर्मनी, जपान, इटली, व कॅनडा आणि सदस्य नसलेला युरोपियन युनियन (युरोप मधील २७ देशांचा समुह)हे आहेत. या सात राष्ट्रांचा अनौपचारिक रित्या चर्चा करण्याचा हा मंच आहे.

स्थापना १९७० मध्ये आलेले ऊर्जा संकट, त्यानंतर आलेला विनिमय दरातील चढ उतार, जागतीक मंदी , अविकसित देशांच्या समस्या , या सर्व समस्यांवर विचारविनिमय व उपाययोजना म्हणून १९७३ साली फ्रान्स, संयुक्त अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, जपान व इटली या सहा राष्ट्रांच्या या गटाची स्थापना करण्यात आली. व जी ६ या नावाने तो ओळखला जाऊ लागला. १९७६ मध्ये कॅनडाला सदस्यत्व दिल्याने जी ७ झाले. पुढील वर्षी रशियाचा समावेश झाला म्हणून जी८ झाले. २०१४ मध्ये क्रिमीयावर केलेल्या आक्रमणामुळे रशियाचे सदस्यत्व स्थगित करण्यात आले व रशिया शिवाय सात राष्ट्रांची बैठक घेण्याचे ठरले. त्यामुळे ग्रुप पुन्हा जी ७ झाला. १९९९ मध्ये जी ट्वेंटी या गटाची स्थापना झाली. त्यात विस राष्ट्रांचा समावेश असल्यामुळे जी ७ चे महत्व थोडे कमी झाले त्यामुळे काही संस्था अथवा राष्ट्रांना परिषदेत आमंत्रित करण्याचे ठरले.

उद्दिष्ट : सदस्य राष्ट्रांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक बाबतीत स्थैर्य, तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्या साठी उपाययोजना, लोकशाही तत्वाचे पालन व मानवा अधिकारा ची जपणूक, जागतीक शांतता ,सदस्या राष्ट्रा मधील परस्पर सहकार्य समन्वय वाढवणे, गरीब व विकसनशील राष्ट्रांच्या प्रगतीचा विचार,सदस्य राष्ट्रांच्या विकासासाठी मदत करणे, आरोग्य समस्या, शिक्षण, तंत्रज्ञान, विकास आदी विषयावर चर्चा करून प्रगतीच्या दृष्टिकोनातून उपाययोजना करणे,आदी उद्दिष्टे आहेत.

कार्यपद्धती : या परिषदेचे स्वतः चे कायम स्वरूपाचे सचिवालय कोठेही नाही. अध्यक्ष पद दरवर्षी फिरते असून त्याचा क्रम फ्रान्स, संयुक्त राष्ट्र , इंग्लंड, जर्मनी, जपान ,इटली, कॅनडा असा आहे, ज्याच्याकडे अध्यक्ष पदाची जबाबदारी असते , तोच आयोजन करतो. परिषदेचे आयोजन दर वर्षातून एकदा केले जाते. निर्णय एकमताने घेतल्या जातो, बहुमताने नाही. घेतलेले निर्णय कायदेशीररित्या बंधनकारक नसले तरी जगाच्या राजकारणात आर्थिक ,सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रभाव पाडतात.

कॅनडातील ५१ वी परिषद : जी सेवन ची २०२५ मधील ५१ वी परिषद कॅनडाच्या अल्बर्टा राज्यातील कनानास्किस मध्ये संपन्न झाली. यासाठी सहभागी राष्ट्रांच्या तसेच आमंत्रित राष्ट्रांच्या प्रमुखासह नाटो चे प्रमुख मार्क रूट्टे उपस्थित होते. यात जागतीक शांतता, जागतिक सुरक्षा, मजबूत अर्थव्यवस्था, डिजिटल पद्धतीतील बदल, आदी वर विषयावर चर्चा झाली. या चर्चेत जी सात राष्ट्रा शिवाय, आमंत्रित म्हणून ऑस्ट्रेलिया, मेक्सिको, ब्राझील , दक्षिण आफ्रिका, युक्रेन ,भारत, आदींनी भाग घेतला २०१८ पासून भारत सतत या परिषदेत आमंत्रित म्हणून हजर राहत आहे.

परिषदेतील भारताची स्पष्ट भूमिका : दहशतवाद हा जागतिक धोका असून त्या विरोधात सर्वांनी एकत्र येऊन कारवाई करणे आवश्यक आहे. दहशतवादी कारवाया करणारा देश व त्याला त्याचे समर्थन करणारा देश या दोन्ही देशांना त्याची किंमत मोजावी लागेल. असे मोदीने स्पष्ट सांगितले. तसेच जागतिक शांती व समृद्धीसाठी आपल्या विचार व धोरणात स्पष्टता असावी एका बाजूला दहशतवादाविरुद्ध बंदी घालणे व दुसऱ्या बाजूला दहशतवादाला उघडपणे समर्थन करणे अशी धोरणे बंद व्हायला हवीत. आर्थिक दृष्ट्या अल्पविकसित असलेल्या देशांचा म्हणजे ''ग्लोबल साऊथ '' देशांचा (यात दक्षिण अमेरिका व कॅरेबियन तसेच अनेक आफ्रीकन व आशियाई देशांच्या समावेश आहे)आ वाज जागतिक व्यासपीठावर पोहोचविणे ही भारत आपली जबाबदारी समजतो. तसेच यांच्या चिंता व गरजा यावर लक्ष देण्याचे त्यांनी आवाहन केले. गेल्या काही वर्षापासून बिघडलेले भारत व कॅनडांचे संबंध व व्यापार सुरळीत करण्यावर भर देण्याचे दोघांनीही ठरविले. व नवीन उच्चायुक्तांची नेमणूक करण्यावर दोघांचीही सहमती झाली ही एक भारताच्या दृष्टिकोनातून बरी उपलब्ध म्हणावी लागेल.

परिषदेतील चर्चीत विषय : परिषदेने काढलेल्या निवेदनात इस्त्राइलला स्वसंरक्षणाचा हक्क असल्याचे मान्य करून त्याला पाठिंबा देण्यात आला. इराणला अण्वस्त्रधारी न होऊ देण्यावर भर देण्यात आला. रशिया युक्रेन वादात सहाही राष्ट्रांनी युक्रेनला पाठिंबा दर्शविला आहे. तसेच युक्रेनला अधिक मदत करण्याचाही निर्णय घेण्यात आला. मिडल ईस्ट मध्ये शांतता ठेवणे, भारत व कॅनडा मधील परस्पर व्यापार संबंध सुरळीत करण्याच्या हेतुने वाटचाल, तसेच दोन्ही राष्ट्रातील उच्चायुक्तांच्या नेमणुकीवर भर देण्यात आला.हवामानातील बदल,जागतीक अर्थव्यवस्था, चीनच्या वाढत्या प्रभावा बाबत सावध चर्चा झाली.हरित ऊर्जा, तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणूक वाढविण्यावर भर देण्यात आला. इजराइल इराण, युक्रेन रशिया, यांच्या मधील संघर्षावर चर्चा झाली. मात्र गाजा हमास यावर चर्चा झाली नाही. तसेच विकसनशील राष्ट्रासाठी ठोस आर्थिक मदत, हवामान बदला मधील स्पष्ट कृती योजना, जागतिक दारिद्र्य निर्मूलनासाठी उपाययोजना,आरोग्य, मानवाधिकार याबाबतही कोणतेही ठोस निर्णय झाले नाहीत. याशिवाय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे मधूनच निघून जाणे आणि त्यांनी सुरू केलेले टेरीफ युद्धा चाही प्रभाव जी ७ वर पडल्याचे जाणवत होते. त्यामुळे कॅनडात झालेल्या जी सेवन राष्ट्राच्या परिषदेला मर्यादित यश मिळाले असे म्हणावे लागेल. जी ७ या परिषदेच्या यशस्वीते बाबत मत भिन्नता असली तरी भारताच्या दृष्टीने भारत व कॅनडाशी बिघडलेले संबंध सुरळीत होण्याच्या दृष्टीने बोलणी झाली आहे ही भारतासाठी एक उपलब्धी म्हणावी लागेल.

टाटा मोटर्सकडून एस प्रो लाँच

पुणे: टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने नवीन टाटा एस प्रोच्या लाँचसह नवीन टप्पा गाठला आहे, तसेच लहान कार्गो मोबिलिटीच्या परिवर्तनात्मक युगाचा शुभारंभ केला आहे. ३.९९ लाख रूपयांच्या सुरुवातीच्या किमतीसह टाटा एस प्रो भारतातील सर्वात किफायतशीर चार-चाकी मिनी ट्रक आहे, जो अपवादात्मक कार्यक्षमता, अद्वितीय वैविध्यता आणि उच्च दर्जाचे मूल्य देतो.उद्योजकांच्या भावी पिढीला सक्षम करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला टाटा एस प्रो पेट्रोल, बाय-फ्यूईल (सीएनजी + पेट्रोल) आणि इलेक्ट्रिक व्हेरिएण्ट्समध्ये उपलब्ध आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या व्यवसाय गरजांसाठी योग्य सोल्यूशन निवडण्याची स्थिरता मिळते. ग्राहक देशभरातील टाटा मोटर्सच्या १२५० कमर्शियल वेईकल्स विक्री टचपॉइण्ट्सपैकी कोणत्याही टचपॉइण्टमध्ये किंवा टाटा मोटर्सचे ऑनलाइन विक्री प्लॅटफॉर्म फ्लीट व्हर्सवर त्यांचे पसंतीचे एस प्रो व्हेरिएण्ट बुक करू शकतात. टाटा एस प्रोच्या मालकीहक्काला सोईस्कर करण्यासाठी टाटा मोटर्सने आघाडीच्या बँका व एनबीएफसींसोबत सहयोग केला आहे, ज्यामधून विनासायास फायनान्सिंग सोल्यूशन्ससह त्वरित कर्ज मंजूरी, स्थिर ईएमआय पर्याय आणि सुधारित फंडिंग सपोर्ट देण्यात येईल. यासह ग्राहकांच्या विविध गरजांची पूर्तता होण्याची खात्री मिळते. एस प्रो लाँच करत टाटा मोटर्सचे कार्यकारी संचालक श्री. गिरीश वाघ म्हणाले, ''लाँच करण्यात आलेल्या टाटा एसने भारतातील कार्गो मोबिलिटीमध्ये क्रांती घडवून आणली. गेल्या दोन दशकांमध्ये या ट्रकने २५ लाखांहून अधिक उद्योजकांना यशस्वीरित्या सक्षम केले आहे, तसेच प्रगती व क्षमतेचे प्रतीक बनला आहे. नवीन टाटा एस प्रोसह आम्ही महत्त्वाकांक्षी भावी पिढीसाठी नवीन उद्देशासह हा वारसा अधिक दृढ करत आहोत. स्थिरता, सुरक्षितता आणि नफ्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या एस प्रोमध्ये उत्तम उत्पन्न मिळवून देण्याची क्षमता आहे, जो उज्ज्वल भविष्य घडवण्याच्या दिशेने वाटचाल करण्यास सुसज्ज असलेल्या महत्त्वाकांक्षी उद्योजकांच्या महत्त्वाकांक्षांची पूर्तता करण्यास मदत करेल. टाटा एस प्रोबाबत मत व्यक्त करत टाटा मोटर्स कमर्शियल वेईकल्सच्या एससीव्हीपीयूचे उपाध्यक्ष व व्यवसाय प्रमुख श्री. पिनाकी हल्दर म्हणाले, ''उद्देशपूर्ण टाटा एस प्रो सखोल ग्राहक अभिप्रायांसह विकसित करण्यात आली आहे आणि विविध उपयोजनांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. विविध प्रदेश व हवामान स्थितींमध्ये, तसेच लाखो किलोमीटर अंतरापर्यंत या ट्रकची प्रखर चाचणी करण्यात आली आहे. मल्टी-फ्यूईल पर्याय, किफायतशीरपणा आणि सुधारित ड्रायव्हिंग क्षमतेसह टाटा एस प्रो विविध वापरांमध्ये उच्च दर्जाचे मूल्य देतो. आमच्या पोर्टफोलिओमधील हा धोरणात्मकरित्या भर करण्यात आलेला ट्रक आहे, जो उद्योजकांना आणि लहान व्यवसायांना विश्वासार्ह, भविष्यासाठी सुसज्ज गतशीलता सोल्यूशन्ससह सक्षम करण्याप्रती टाटा मोटर्सच्या कटिबद्धतेला अधिक दृढ करतो. भारतातील व्यावसायिक, ई-कॉमर्स व लॉजिस्टिक्स हब महाराष्ट्र एस प्रो बाय-फ्यूईल आणि ईव्ही व्हेरिएण्ट्ससाठी लाभदायी क्षेत्र आहे. या राज्यातील ग्राहक या ऑफरिंगचा फायदा घेण्यास अद्वितीयरित्या सज्ज आहेत, जेथे राज्यामध्ये प्रबळ सीएनजी पायाभूत सुविधा असण्यासोबत शाश्वत परिवहन सोल्यूशन्सना पाठिंबा देणा-यसा इलेक्ट्रिक गतीशीलतेचा लवकर अवलंब करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे व नागपूर अशी प्रमुख शहरे एफएमसीजी, फ्लीट लॉजिस्टिक्स, डार्क स्टोअर्स व पेय वितरण अशा क्षेत्रांमध्ये एस प्रो ईव्हीच्या फिक्स्ड-ड्युटी चक्रांसाठी विशेषत: अनुकूल आहेत, जेथे उच्च प्रमाणातील डिलिव्हरी नेटवर्क्ससाठी कार्यक्षमता व विश्वसनीयतेची आवश्यकता आहे. दरम्यान कोकण, विदर्भ व मराठवाडा या यासारख्या प्रांतांमध्ये कृषी-आधारित उद्योग आणि एमएसएमईची संपन्न परिसंस्था आहे. या क्षेत्रांमध्ये एस प्रोची उच्च लोड क्षमता, सुसंगत आकारमान आणि इंधन-कार्यक्षम ड्राइव्हट्रेन्स अरूंद रस्त्यांमधून नेव्हिगेट करण्यासाठी आणि लास्ट-माइल डिलिव्हरी ऑप्टिमाइज करण्यासाठी व्यावहारिक व लाभदायी सोल्यूशन देतात. महाराष्ट्रातील प्रगतीशील मोबिलिटी लँडस्केप आणि वैविध्यपूर्ण व्यावसायिक गरजांशी संलग्न होत एस प्रो ऑपरेशनल कार्यक्षमता, अनुकूला आणि दीर्घकालीन मूल्याचे लक्षवेधक संयोजन देते.

आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 81



संकेतामध्ये दिलेले शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहा

संकेत शब्द:—

दोन अक्षरी
कस, कष्ट, काका, कान, काव्य, खंड, गद्य, घेरा, जाणे, त्रेधा, दर्जा, दशा, दान, धन, नड, नम, नंदी, निशा, पारा, भात, मण, मन, यम, याग, रग, रत्न, रात, वजा, वार, वेडा, शत्रू, शेत, शेर, सर्जा, साधु, सोंग, सोंड, हवा, हर्ष, ज्ञान

तीन अक्षरी
आचार्य, कणव, कपास, कायम, गारवा, गोदान, गोधडी, गोरस, जरब, तनया, पामर, भेकड, मनन, रपाटा, वराह, सतत, सवार, स्वागत, ज्ञानदा

चार अक्षरी
आरक्षित, उतमात, खडतर, खीरापत, तर्कज्ञान, नमस्कार, नवजात, मनसब, मितव्यय, रक्तदान, विसर्जित, विनायक, शनिवार, हितशत्रू

पाच अक्षरी
अनपेक्षित, माहितगार, सुर्यग्रहण

सहा अक्षरी
अहमहमिका, गाजरपारखी, वडलोपार्जित, हार्दिक शुभेच्छा

अन्य अक्षरी
वेड घेऊन पेडगावास जाणे, स्वामी विवेकानंद, हातखंडा असणे

(उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोडेचे उत्तर

Uday Munde - 8446302691

महाशब्दकोडे 461



—: आडवी विधाने :—

1) अंगावर एकही अलंकार नसलेली स्त्री, गरीब महिला
4) ज्याला रात्री मुळीच दिसत नाही असा
6) दाणादाण, पूर्ण विध्वंस
8) वडिलांचा भाऊ
9) एखादी घटना प्रत्यक्ष बघणाऱ्याने न्यायालयात दिलेली जबानी
10) आकाशात उंच विहार करणारा एक पक्षी
11) रंगातील परस्पर विरोध, वर्णावरुन भेदाभेद करणे
13) गाठ सरकविली असता पाहिजे तेवढा लहान मोठा करता येईल असा फास
16) कृपा करणारा, दयाळू
17) इंद्राचा हत्ती
19) हाताच्या पंज्याचा सांधा
22) माळ, जिंकणे
23) एखाद्याला ओवाळणे, आरती
24) आराधना, मनोभावे केलेले व्रत
25) उन्मत्तपणा, गर्व
27) तम, काळोख
28) क्षणिक, चंचल, लवचिक
29) नवीन
30) गोष्ट
31) लहान सहान प्राण्यांना पकडणारा, शिकारी
32) मोठा हातोडा
33) वस्तूंची देवाण घेवाण, अदलाबदल
35) लहान मुलांचा मुका
36) देवळाच्या आतील भाग, गर्भ
37) पुतळ्या व मणी यांची माळ
39) उगाचच, जाण्या–येण्याचा व्यर्थ त्रास
42) आपले राज्य, स्थानिक लोकांची शासन पद्धती
43) पारख असणारा, परीक्षक
44) दूध देईनाशी झालेली गाय
46) गद्य इतिहास, चरित्र
47) चुलत भावाची आई
48) श्रीविष्णुचा एक अवतार
52) चर्चा, भांडण
53) कागदी रुपया
55) दुर्लक्ष, हेळसांड
57) रयत, जनता
58) सुंदर स्त्री
61) सांप्रत राज्य पद्धतीत क्रांती घडवून केलेली मोठी उलथापालथ
62) मनुष्याच्या राशीत अडवणूक करणारा एक ग्रह
63) जळून ध्वस्त झालेले
65) या शक जातीय राजाने वर्षगणना सुरु केली होती
67) संगनमत, कारस्थान
69) मिळकत, प्राप्ती
70) सामान्य जनतेद्वारे सरकारला देण्यात येणारा पैसा
71) पण, शर्यत
73) एका विशिष्ट हरिणाच्या नाभित आढळणारे सुगंधी द्रव्य
75) लक्ष, चित्त
77) मुस्लीम राष्ट्रात चालणारे एक चलन
78) मोरोपंताच्या आर्या
79) गदा धारण करणारा

—: उभी विधाने :—

1) रामायणात रावणाची राजधानी
2) मोराचे ओरडणे
3) हरियाणातील या ठिकाणी तीन युद्धे झालीत आणि मुघल सत्तेचा पाया भारतात घातला गेला, पूर्ण विध्वंस
4) मनुष्याच्या जन्मकाळाच्या ग्रहस्थितीवरुन पाडण्यात येणाऱ्या गणांपैकी तिसरा गण
5) टक्कर, जोराचा धक्का
6) दिवस
7) दुसऱ्याकडून जुलूमाने घेतलेले द्रव्य येते तसे लवकर नाहीसे होते या अर्थाचा एक वाक्प्रचार
10) तोंडी घेतलेला अन्नाचा गोळा
11) तपशीलवार हकीकत
12) प्रत्यक्ष, देखत, समोर
14) एकाच गोष्टीचा घोषा लावणे
15) पशू – पक्ष्यांना जाळ्यात अडकवून पकडणारा
18) राशी, ढीग
20) मोठ्या मोगल सरदाराची उपाधी
21) शाश्वत, चिरकाल टिकणारे
23) मिथ्या, नाही तर, अन्य प्रकारे
24) परतफेडीच्या बोलीवर घेतलेली वस्तू किंवा पैसे
26) आपल्याला वाट्टेल तसे वागणे
27) क्रिकेटमधील पंच (इं.)
30) सूक्ष्म अंश
32) आलय, निवासस्थान
33) अंकगणितात दुसऱ्या संख्येला नि:शेष भागणारी संख्या
34) अतिशय घट्ट व न सुटणारे आलिंगन
35) शिबिका, डोलीसारखे माणसांनी वाहून नेण्याचा जुन्याकाळचा एक वाहन प्रकार
36) चिखल, पंक
38) एकसारखे जोराचे बोलणे, गोळ्यांचा वर्षाव
39) गुप्त दूत, गुप्तपणे माहिती काढणारा
40) भजनात केवळ टाळ कुटणारा
41) केवळ एकच पदर असलेली (माळ)
43) वृक्ष्याच्या बुंध्याभोवती बांधलेला ओटा
45) भय, भीती (हिं.)
49) आजारी मनुष्याची सेवा
50) मनातल्या मनात आपल्या भावी उत्कर्षाविषयी रचलेल्या कल्पना
51) अंगात घालण्याचा कपडा
54) बुटका, ठेंगणा
55) प्रत्येक प्रकारचे कार्य कौशल्याने व हुशारीने करणारा
56) एक शब्दालंकार
57) निशाण, स्मृतीचिन्ह
59) भविष्य खुपच चांगले असेल अशी आशा बाळगणारा
60) सूर्य
61) जंगल, वन
64) वाद्यवृंदासह गाणे म्हणणे
66) शिव, प्रत्येक
68) एकाग्र दृष्टी
69) आश्रय, टेका
71) पैसा, धन
72) एक तेल बी प्रकार
74) प्रशंसा, गुणवर्णन
75) दिलेले (हिं.)
76) ठार मारणे, हत्या (उत्तर पुढील अंकी)

मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

Uday Munde - 8446302691

राशी-भविष्य

मेष : घाईघाईत चुकीचे निर्णय घेण्यापासून टाळा. अडकलेली कामे अचानक गती घेऊ शकतात. आज चैनीच्या वस्तूंवर मोठा खर्च होण्याची शक्यता आहे.

वृषभ: तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्हाला अधिक मेहनत करावी लागेल. तुमच्या बहिणींसोबतच्या तुमच्या नात्यात कटुता येऊ शकते.

मिथून : मनाच्या अस्थिरतेमुळे तुम्ही निर्णय घेऊ शकणार नाही. तुमचा राग नियंत्रित करा. तुमच्या नात्यांमुळे अडकलेले काम गती घेईल.।

कर्क : अचानक आर्थिक लाभ होऊ शकतो. मोठी गुंतवणूक होण्याची शक्यता आहे. जी फायदेशीर ठरेल. व्यवसाय नवीन उंचीवर पोहोचेल. विर-ोधक सक्रिय असतील.

सिंह : काम करणाऱ्या लोकांसाठी वेळ शुभ आहे. तुम्ही कौटुंबिक कार्यक्रमाची तयारी करण्यात व्यस्त असाल. तुम्हाला कुटुंबातील सदस्यांचा पाठिंबा मिळेल.

कन्या : अडकलेले काम पूर्ण होईल. तुम्ही एखाद्या खास व्यक्तीला भेटाल. तुम्ही तुमच्या कामात समर्पित नाही आहात. काळजीपूर्वक काम करा.

तुळ : तुम्ही शुभ कार्यात सहभागी व्हाल. तुमच्या मुलाच्या प्रगतीने तुम्ही आनंदी असाल. तुमच्या सहकाऱ्यांशी मतभेद होण्याची शक्यता आहे.

वृश्चिक : रागाचा अतिरेक असेल. तुम्ही फायदेशीर संधी शोधत आहात. व्यवसायात नवीन सौदे होतील. तुम्ही नवीन मित्र बनवाल.

धनु : आरोग्य सुधारेल. एकत्र बसून कौटुंबिक वाद सोडवले जातील. अनपेक्षित प्रवास होऊ शकतो. तुम्हाला तुमच्या जीवनसाथीचा पाठिंबा मिळेल.

मकर : सैन्य प्रशासनाशी संबंधित लोकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. विरोधक सक्रिय राहतील, सावधगिरीने वेळ घालवा. तुम्हाला पोटाशी संबंधित आजार होतील.

कुंभ : आज तुम्हाला तुमच्या संपर्कांचा फायदा होईल. तुम्ही मित्रांसोबत वेळ घालवाल. तुम्हाला नवीन कपडे आणि दागिने मिळू शकतात.

मीन : प्रवासाची शक्यता आहे. तुम्हाला नोकरीत पदोन्नती मिळू शकते. उमेदवार यशस्वी होतील. घरगुती वादामुळे तुम्ही तणावाखाली राहाल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

अजिंक्य भारत
आपलं नागपूर
मंगळवार, दि. २४ जून २०२५

पैसे बिमारी ठीक होने के बाद

उम्र की अधिकता और
बीपी शुगर से आई कमजोरी,
टायमिंग में कमी,
शुक्राणु की कमी,
निःसंतान, आदी सभी
रोगों का विशेष
आयुर्वेदिक पद्धती से इलाज. मनचाहा पॉवर
सफलता से प्राप्त करने हेतु संपर्क करें
धन्वंतरी आयुर्वेदिक
भारती कॉम्प्लेक्स नं.२ उद्योग भवन समोर,
दारव्हा रोड, यवतमाळ
8767418343

'स्मार्ट मीटर' प्रीपेड नव्हे, पोस्टपेडच

सचिन तालेवार यांनी घेतला नागपूर परिक्षेत्राचा आढावा, थकबाकी वसुलीचे दिले सक्त निर्देश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : महावितरणकडून बसवण्यात येत असलेले नवीन स्मार्ट मीटर हे 'प्रीपेड' नसून, ते सध्याच्या मीटरप्रमाणे 'पोस्टपेड'च असतील, अशी महत्त्वपूर्ण ग्वाही महावितरणचे संचालक (संचलन व प्रकल्प) सचिन तालेवार यांनी दिली आहे. या मीटरमुळे ग्राहकांना मोबाईल ॲपद्वारे वीज वापरावर लक्ष ठेवता येणार असले, तरी जुनी पद्धत कायम राहणार आहे. या स्पष्टीकरणामुळे नागरिकांमधील मोठा संभ्रम दूर झाला आहे.

नागपूर येथील विद्युत भवन कार्यालयात आयोजित नागपूर, गोंदिया, चंद्रपूर, अमरावती आणि अकोला या पाच परिमंडलांच्या संयुक्त आढावा बैठकीत ते बोलत होते. स्मार्ट मीटरबाबत माहिती देताना ते म्हणाले, "या मीटरमध्ये केवळ 'कम्युनिकेशन'ची अतिरिक्त सुविधा आहे, ज्यामुळे ग्राहक आपल्या वीज वापराचे अधिक प्रभावीपणे नियोजन करू शकतील." तसेच, थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी, त्यांना पूर्वीप्रमाणेच १५ दिवसांची पूर्वसूचना दिली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या आढावा बैठकीत तालेवार यांनी अधिकाऱ्यांना अनेक महत्त्वाचे निर्देश दिले. मार्च २०२५ च्या तुलनेत वाढलेली थकबाकी आणि चालू वीज बिलांची १०० टक्के वसुली याच महिन्यात करण्याचे सक्त आदेश त्यांनी दिले. ग्राहक मॅपिंग आणि लोड शिफ्टिंगमुळे होणारे नुकसान तातडीने दुरुस्त करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. एकाच पत्त्यावर असलेल्या अनेक वीज जोडण्यांची युद्धपातळीवर पडताळणी करावी, तसेच नवीन वीज जोडणी आणि भारवाढीची प्रकरणे वेळेत निकाली काढावीत, असेही ते म्हणाले. रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी एजन्सींना पुरेसे साहित्य आणि मनुष्यबळ पुरवण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

विविध विषयांचा आढावा

या बैठकीत केवळ स्मार्ट मीटर आणि वसुलीवरच नव्हे, तर इतर अनेक महत्त्वाच्या योजनांचाही आढावा घेण्यात आला. यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मागेल त्याला सौर कृषी पंप, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा, प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, सौरग्राम आणि उपकेंद्र सक्षमीकरण यांसारख्या प्रमुख योजनांचा समावेश होता. या सर्व योजनांची अंमलबजावणी वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचनाही संचालक सचिन तालेवार यांनी दिल्या.

वरिष्ठ अभियंत्यांची बैठकीला उपस्थिती

नागपूर परिक्षेत्राच्या या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीला वरिष्ठ अभियंत्यांची उपस्थिती होती. यात मुख्य अभियंता सुहास रंगारी, दिलीप दोडके, हरिश गजबे, राजेश नाईक आणि अधीक्षक अभियंता अमित परांजपे, मंगेश वैद्य, संजीव वाकडे, अनिल वाकोडे, दिपक देवहाते यांच्यासह नागपूर शहरातील सर्व कार्यकारी अभियंत्यांचा समावेश होता. या सर्वांना संचालकांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील कामांना गती देण्याबाबत निर्देश दिले.

आंतरराष्ट्रीय खरेदीदारांशी संवाद

नागपूर, दि. २३ : फेडरेशन ऑफ इंडियन एक्सपोर्ट ऑर्गनायझेशन्स (एफआयईओ) आणि महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ इंडस्ट्रिज असोसिएशनच्या (व्हीआयए)सहकार्याने २४ जून २०२५ रोजी दुपारी ३ वाजतापासून 'आंतरराष्ट्रीय खरेदीदारांशी संवाद आणि व्यवहार' या विषयावर रोड शो आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम व्हीआयए सभागृह, उद्योग भवन येथे होईल. हा रोड शो रेझिंग अँड ॲक्सिलरेटिंग एमएसएमई परफॉर्मन्स योजनेअंतर्गत आयोजित करण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय खरेदीदार शोधणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे व व्यवहार करणे, यावर मार्गदर्शन केले जाईल. कार्यक्रमात स्नेहल व्ही. धोके (सहाय्यक डीजीएफटी), शिवकुमार मुद्दामवार (महाव्यवस्थापक, डीआयसी), अक्षय एच. शाह (सहाय्यक संचालक एफआयईओ, पश्चिम विभाग), निखिल चौधरी (सल्लागार, केपीएमजी) आणि विनायक टेमगिरे मार्गदर्शन करतील.

थोडक्यात

गोवंशीय जनावरांना निर्दयपणे कोंडले

नागपूर : गोवंशीय जनावरांना निर्दयपणे कोंडल्याप्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला़ ही कारवाई पाचपावली पोलिसांनी २२ जून २०२५ रोजी सकाळी केली. पाचपावली पोलिसांचे पथक ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंग करत असताना टेक वस्ती येथे पांढऱ्या रंगाच्या वाहनात गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने कोंडल्याची माहिती मिळाली. तपास पथकाने नमूद ठिकाणी धडक दिली असता सदर वाहनात एकूण ११ लहान-मोठी गोवंशीय जनावरे अत्यंत क्रूरपणे व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून, चारा-पाणी न देता कत्तल करण्याच्या उद्देशाने बांधून ठेवलेली आढळली. घटनास्थळावरून गोवंशीय जनावरे, वाहन आणि इतर साहित्य असा एकूण ६ लाख ३० हजार ७०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी आरोपीविरुद्ध कलम ५, ५(ब) (क), ९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम-१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(घ)(छ) प्राणी क्रूरता अधिनियम-१९६० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

साडेतीन लाखांची घरफोडी

नागपूर : यशोधरानगर पोलिसांनी तीन लाख ७० हजारांच्या घरफोडीप्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. विश्वभारती ले-आऊट येथील सुनिल हरिश्चंद्र गुप्ता १० ते २१ जून २०२५ दरम्यान कुटुंबासह स्वत:च्या गावी प्रयागराज उत्तर प्रदेश येथे गेले असता अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराच्या मुख्य दरवाजाचे कुलुप व कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश करून बेडरूममधील कपाटातील रोख पाच हजार रुपये, सोन्याचे दागिने व डेल कंपनीचा लॅपटॉप असा एकूण ३ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. यशोधरानगर पोलिसांनी आरोपींविरुद्ध कलम ३०५, ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

जागेच्या वादातून हत्या

नागपूर: नागपूरच्या कळमना मार्केट परिसरात ट्रक चालकाची हत्या करण्यात आली आहे. ही घटना शनिवारी रात्री घडली. रवी वाघमारे असे मृतकाचे नाव आहे़ माहितीनुसार, किशोर ठाकरे शनिवारी रात्री कळमना मार्केटमध्ये काही मजुरांसोबत बोलत होता. त्यावेळी रवी वाघमारे तिथे आला. यावेळी रवीने तेथे येवून आपल्या जागेवरून उठण्यास सांगितले़ मात्र, त्यांच्यात वाद सुरू झाला. नंतर दोघांत हाणामारीत होवून रविने रागाच्या भरात किशोरवर चाकूने हल्ला केला. किशोरने तो वार हातावर झेलत रवीच्या हातातून चाकू हिसकावून घेतला. त्यानंतर किशोरने त्याच्यावर अनेक वार केले. रवी रक्ताच्या थारोळ्यात कोसळला आणि घटनास्थळी त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी किशोरला अटक केली आहे.

राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचा समारोप

विजेत्यां खेळाडूंचा आकर्षक बक्षिसे देऊन केला गौरव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : मानकापूर येथील विभागीय क्रीडा संकुलात झालेल्या मुख्यमंत्री चषक राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत हरियाणाच्या संघाने आपले वर्चस्व सिद्ध केले. रविवारी या स्पर्धेचा समारोप झाला, ज्यात महाराष्ट्राला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेतील मुला-मुलींच्या फ्री-स्टाईल व ग्रिको-रोमन या तिन्ही प्रकारांत हरियाणाने प्रथम क्रमांक पटकावला, तर महाराष्ट्राने द्वितीय क्रमांक मिळवला. फ्री-स्टाईल प्रकारात दिल्ली, तर ग्रिको-रोमनमध्ये राजस्थानने तिसरा क्रमांक मिळवला. महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस यांच्या हस्ते विजेत्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात आले. २०१४ पासून खेळांना राजाश्रय मिळाल्याने प्रतिभावंतांना फायदा होत असल्याचे तडस म्हणाले. मनपाचे क्रीडा अधिकारी डॉक्टर पीयूष आंबुलकर यांनी प्रास्ताविक केले. नागपुरात लवकरच आंतरराष्ट्रीय स्पर्धा भरवण्याचा प्रयत्न करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी संजय तिरथरकर, योगेश दोडके, दयाराम भोतमांगे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन आर.जे. आमोद यांनी केले.

मुदत वाढविली, प्रतीक्षा यादी कायम

नागपूर, दि. २३ : परिवहन खात्याने उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसवण्यासाठी तिसऱ्यांदा १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ दिली. मात्र, प्रतीक्षायादी मोठी असल्याची माहिती समोर आली आहे. १५ ऑगस्टपर्यंतच्या नवीन मुदतीचा विचार केल्यास रोज ३ लाख १६ हजार ७१ वाहनांना पाटी बसवावी लागणार आहे. सध्या केंद्रांवर पाटीसाठी दीड ते दोन महिन्यांची प्रतीक्षायादी आहे. त्यामुळे दिलेल्या मुदतीत ही प्रक्रिया होणार का, हा प्रश्न कायम आहे. केंद्र सरकारने २०१९ आधीच्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बंधनकारक केली आहे. २० जून २०२५ पर्यंत केवळ २३ लाख वाहनांनाच अशी पाटी लावण्यात आली. २०१९ आधीच्या विविध संवर्गातील तब्बल दोन कोटी वाहने आहेत.

नागपुरात स्केटिंग स्पर्धेचे आयोजन

आरसीडब्ल्यूए सीआरपीएफतर्फे ३० वा स्थापना दिवस साजरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : ग्रुप केंद्र सीआरपीएफ नागपूरने परिवार कल्याण संस्थेच्या ३० व्या स्थापना दिनानिमित्त १७ जून ते २२ जून २०२५ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. हा भव्य सोहळा परिवार कल्याण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती पूनम गुप्ता यांच्या कुशल नेतृत्वाखाली पार पडला. त्यांनी महिला सक्षमीकरण, आरोग्य, शिक्षण आणि कौटुंबिक एकोपा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांना प्रोत्साहन दिले.

१७ जून रोजी पर्यावरण संरक्षणाचा संदेश देत वृक्षारोपण अभियानाने कार्यक्रमांची सुरुवात झाली. १८ जून रोजी मुलांमध्ये आणि तरुणांमध्ये ऊर्जा व खेळाची भावना वाढवण्यासाठी स्केटिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले, ज्यात सीआरपीएफ कुटुंबातील मुलांनी उत्साहाने भाग घेतला. १९ जून रोजी आरोग्य जागृती वाढवण्यासाठी वैद्यकीय शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिरात विशेषज्ञ डॉक्टरांनी आरोग्य तपासणी, समुपदेशन, ब्लड शुगर, बीपी, डोळ्यांची तपासणी आणि महिलांसाठी विशेष आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या. संपूर्ण आठवडाभर चाललेल्या या कार्यक्रमांचा समारोप २२ जून रोजी एका रंगीत सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे झाला, ज्यात संगीत आणि नृत्यासारख्या आकर्षक कला सादर करण्यात आल्या. परिसरात राहणाऱ्या कुटुंबीय, महिला आणि मुलांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. प्रमुख अतिथी श्रीमती कीर्ती जांभोळकर यांनी विजेत्यांना पुरस्कार प्रदान केले. आरसीडब्ल्यूए च्या अध्यक्षा पूनम गुप्ता यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "RCWA गेल्या तीन दशकांपासून सीआरपीएफ कुटुंबांच्या कल्याण, शिक्षण, आरोग्य, स्वावलंबन आणि सामाजिक सलोख्यासाठी निरंतर कार्यरत आहे. हा कार्यक्रम याच भावनेचे प्रतीक आहे. आम्ही पुढील वर्षांमध्ये अधिक संकल्पांसह समाज आणि संघटनेच्या हितासाठी काम करत राहू."

CAPTION असेही आणि तसेही ...

नागपूर : माता कचेरी परिसरातील (दीक्षाभूमी रोड) अतिशय प्रशस्त इमारत म्हणजे समाज कल्याण विभागाची होय़ ए आणि बी विंग असे दोन भाग़ तीन ते चार मजल्यांच्या इमारतीत विविध महामंडळांची कार्यालये आहे़त आकर्षक कॅबिन्स, महागडे सोफे-खुर्च्या आहे़त मात्र, याच इमारतीत गटाराचे पाणी वाहत असल्याचे दिसून आले. आत शिरताना दुर्गंधीचा अनुभव सोमवारी अनेकांनी घेतला.

सौर कृषी पंपांच्या समस्या होणार दूर

तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महावितरणने घेतला पुढाकार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

नागपूर, दि. २३ : राज्यात विविध योजनांमध्ये बसविण्यात आलेल्या एकूण सौर कृषी पंपांची संख्या ५ लाख ६५ हजारांवर पोहोचली असून महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे. आणखी पाच लाख सौर कृषी पंप बसविण्यात येणार आहेत. सौर कृषी पंप बसविल्यानंतर त्यात काही बिघाड होण्याच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी महावितरणने पुढाकार घेतला असून शेतकऱ्यांना घरबसल्या फोनवरून अथवा ऑनलाईन तक्रार करता येईल, अशी सुविधा उपलब्ध केली आहे. शेतकऱ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे. मे महिन्याच्या अखेरीस आलेल्या वादळी वाऱ्यांमुळे आणि मुसळधार पावसामुळे काही ठिकाणी सौर ऊर्जा निर्मिती पॅनेल्स कोसळून नुकसान झाले. अशा प्रकारच्या विविध समस्या सोडविण्यासाठी व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. सौर कृषी पंप बसविल्यानंतर पंप चालत नसणे, सौर ऊर्जा संच काम करत नाही, सौर पॅनेल्सची किंवा पंपाची चोरी होणे अथवा पंपातून कमी दाबाने पाणी येणे अशा विविध तक्रारी शेतकरी करू शकतील. सौर कृषी पंप संचाचा विमा उतरविण्यात आला आहे. लाभार्थी शेतकऱ्यांना महावितरणच्या टोल फ्री नंबरवर फोन करून किंवा महावितरणच्या संबंधित वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करून किंवा थेट संबंधित पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर नोंदणी करून तक्रार नोंदविता येईल. शेतात सौर कृषी पंप बसविल्यानंतर पाच वर्षे त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर आहे. शेतकऱ्यांनी तक्रार नोंदविल्यानंतर तीन दिवसात तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व कंत्राटदारांना त्यांनी ज्या जिल्ह्यात पंप बसविले आहेत त्या जिल्ह्याच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले आहे. कंत्राटदार कंपन्यांच्या कामावर महावितरणच्या प्रत्येक मंडलाच्या अधीक्षक अभियंत्यांची देखरेख राहील.

दोन्ही एसटीपी प्रकल्पांच्या कामांना गती देण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : नागनदी प्रदूषण रोखण्यासाठी व्हीएनआयटी आणि कृषी विद्यापीठाच्या जागेत उभारण्यात येणाऱ्या सांडपाणी प्रक्रिया केंद्रांच्या (एसटीपी) कामांना गती द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज दिले. त्यांनी विकासकामांचा आढावा घेतला.

या आढावा बैठकीला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह विविध आमदार व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. दोन्ही एसटीपी प्रकल्प मुंबईतील धारावीच्या धर्तीवर कमी जागेत उभारावेत, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. तर, टीसीएसने त्वरित अहवाल सादर करावा, असे निर्देश गडकरींनी दिले. शहरातील बंद असलेले सर्व सीसीटीव्ही कॅमेरे दोन महिन्यांत सुरू होतील, अशी माहिती आयुक्त डॉक्टर अभिजीत चौधरी यांनी दिली. कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे, तसेच शहराचा नवीन विकास आराखडा (डीपीआर) तयार करण्याचे आदेशही यावेळी देण्यात आले. महावितरणने खोदलेले रस्ते तातडीने दुरुस्त करावेत, असेही बजावण्यात आले.

'स्वप्ननिकेतन' सदनिकांचे स्वप्न झाले साकार

मुख्यमंत्री फडणवीस, पालकमंत्री बावनकुळे यांच्याहस्ते किल्ली सुपूर्द, विविध विकासकामांचे लोकार्पण

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नागपूर, दि. २३ : नागपूर महानगरपालिकाच्या वतीने प्रधानमंत्री आवास योजना घटक क्र. तीन अंतर्गत मौजा वांजरा खसरा क्र. २४/४, २४/६ जागेवर बांधण्यात आलेले ४८० ईडब्ल्यूएस सदनिकांचे हस्तांतरण व विविध विकासकामांचे लोकार्पण रविवारी करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात सदनिकांच्या किल्ली सुपूर्द करण्यात आल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वप्रथम लाभार्थ्यांचे अभिनंदन केले. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत मनपाने अतिशय उत्तम सदनिका तयार केल्याची भावना व्यक्त करीत त्यांनी शहरातील सहाही विधानसभा क्षेत्र निहाय पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत किमान एक हजार घरांच्या इमारती उभाराव्यात, जेणेकरून नागरिकांना राहण्याची उत्तम व्यवस्था होईल, असे सांगितले. झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांना देखील मालकी हक्काचे पट्टे दिले जात असून, पुढील काळात सर्वांना पक्के घरे मिळतील, अशी ग्वाही देत मनपाद्वारे उभारण्यात आलेल्या आरोग्यवर्धिनी केंद्राला अतिशय सुंदर व देखणी इमारतीप्रमाणे दर्शविण्याची सूचना केली. नागपूर हे हरित शहरांच्या यादीत असून, येथील विकासासह पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी पर्यावरणपूरक अशा ई-बसेस उपलब्ध केली आहे. नागरिकांनी स्वत:च्या वाहनांचा कमीत कमी उपयोग करून सार्वजनिक वाहतूक सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. प्रधान सचिव गोविंद राज, मनपा आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, वैष्णवी बी.,अजय चारठाणकर, उप सचिव विद्या हंपिया, मुख्य अभियंता मनोज तालेवार, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, एसडीपीएलचे संचालक गौरव अग्रवाल, पीएमसीचे दिनेश वराडे यांच्यासह मनपाचे अधिकारी कर्मचारी व नागरिक उपस्थित होते. पालकमंत्री बावनकुळे यांनी नागरिकांना हजार रुपयांत त्यांच्या घराची रजिस्ट्री करण्याचा महत्वाचा निर्णय राज्य शासनाने घेतल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. तसेच, पुढील वर्षात केंद्र शासनाच्या निधीतून राज्यातील दीड कोटी जनतेसाठी ३० लाख घरे उपलब्ध होतील, असा विश्वास व्यक्त केला. राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविकेत डॉ. अभिजीत चौधरी यांनी 'स्वप्ननिकेतन'बद्दल माहिती देत राज्य शासनाकडून निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आभार मानले.

एक हजार रुपयांत घराची नोंदणी

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्या भाषणात राज्य सरकारच्या एका महत्त्वाच्या निर्णयावर प्रकाश टाकला. प्रधानमंत्री आवास योजनेतील या घरांची नोंदणी (रजिस्ट्री) करण्यासाठी लाभार्थ्यांना आता केवळ एक हजार रुपये शुल्क भरावे लागणार आहे. पूर्वी यासाठी मोठा खर्च येत असे. या निर्णयामुळे हजारो गरीब कुटुंबांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

आयटीपीआयचा पदग्रहण समारंभ

नागपूर, दि. २३ : द इन्स्टिट्यूट ऑफ टाऊन प्लॅनर इंडिया (आयटीपीआय) च्या नागपूर चॅप्टरच्या नव्या पदाधिकाऱ्यांची निवड व पदग्रहण समारंभ पार पडला.नव्या कार्यकारिणीत मनपाच्या नगर रचना विभागाचे किरण राऊत यांनी अध्यक्ष पदाचा कार्यभार सांभाळला. यासह उपाध्यक्षपदी डॉ. प्रिया चौधरी, सचिव प्रा. सुमित पतंगे, कोषाध्यक्ष आशिष नागपूरकऱ चॅप्टरच्या सीबीसी कमिटी अध्यक्षपदावर संजय कोपुरवार यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यकारिणीत १२ कार्यकारी सदस्य आहेत. आयटीपीआय ही शहर नियोजन पद्धती आणि उपक्रमांसाठी काम करणारी एक प्रमुख संस्था आहे. संस्थात्मक यंत्रणेला प्रोत्साहन, स्थानिक आर्थिक साधणे, एकात्मिक शहर आणि देश नियोजन पद्धती, शिक्षण, संशोधन असे आयटीपीआयचे ध्येय असून, ही शाखा भारतातील सक्रिय शाखांपैकी एक आहे.

पंतची विक्रमी कामगिरी; १५० कसोटी झेल पूर्ण

भारत आणि इंग्लंड यांच्यातील कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी भारतीय संघाचा यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंतने मोठी कामगिरी आपल्या नावावर केली. त्याने वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाच्या चेंडूवर ऑली पोपचा झेल घेत एका विशेष विक्रमाला गवसणी घातली. पोपचा झेल पकडताच तो कसोटी क्रिकेटमध्ये १५० झेल पूर्ण करणारा केवळ तिसरा भारतीय यष्टीरक्षक ठरला आहे.पूर्वी हा पराक्रम केवळ भारताचे माजी यष्टीरक्षक महेंद्रसिंग धोनी आणि सय्यद किरमाणी यांनी केला आहे. पंतने ४४ सामन्यांमध्ये १५० झेलांचा टप्पा पूर्ण केला, तर धोनीने ९० सामन्यांमध्ये २५६ झेल घेतले आहेत. सय्यद किरमाणी यांच्या नावावर ८८ सामन्यांमध्ये १६० झेल आहेत.याचबरोबर, लीड्स कसोटीत पंतने आणखी एका विक्रमाची नोंद केली आहे.

सामन्याच्या पहिल्या दिवशी त्याने ३००० धावांचा टप्पा पार केला. तर, दुसऱ्या दिवशी सातवे कसोटी शतक झळकावत, त्याने भारतीय यष्टीरक्षकातर्फे सर्वाधिक कसोटी शतके करण्याच्या बाबतीत महेंद्रसिंग धोनीला मागे टाकले. या यष्टीरक्षक-फलंदाजाने ४४ कसोटी सामन्यांच्या ७६ डावांमध्ये सुमारे ४४ च्या सरासरीने ३००० हून अधिक धावा केल्या आहेत. यामध्ये ७ शतके आणि १५ अर्धशतकांचा समावेश आहे.भारताचे माजी कर्णधार आणि यष्टीरक्षक महेंद्रसिंग धोनी यांनी ९० कसोटी सामने खेळले आहेत. यामध्ये त्यांनी २५६ झेल आणि ३८ यष्टिचित केले आहेत. धोनीने १४४ डावांमध्ये ३८.०९ च्या सरासरीने ४८७६ धावा केल्या असून, त्यात ६ शतके आणि ३३ अर्धशतकांचा समावेश आहे.

युवा आशियाई कुस्ती स्पर्धा : फ्री-स्टाईल प्रकारात भारताचा दबदबा

नवी दिल्ली: दि. २३ प्रतिनिधी

वुंग ताऊ (व्हिएतनाम) : भारतीय महिला संघापाठोपाठ पुरुष संघानेही युवा (२३ वर्षांखालील) आशियाई कुस्ती स्पर्धेत फ्री-स्टाईल प्रकारात सांघिक विजेतेपदाचा मान मिळवला. भारतीय कुस्तीगिरांची फ्री-स्टाईल प्रकारातील आंतरराष्ट्रीय स्तरावरील ही सर्वोत्तम कामगिरी ठरली. भारतीय पुरुष खेळाडूंनी १० पैकी ७ वजनीगटांत पदकांची कमाई केली.

यामध्ये सहा सुवर्ण आणि एका रौप्यपदकाचा समावेश आहे. महिला संघाचे यश अधिक लक्षणीय ठरले. महिला कुस्तीगिरांनी सर्व दहा वजनी गटांतून पदकांची कमाई केली.पुरुष गटातून निखिल (६१ किलो), सुजीत कलकल (६५ किलो), जयदीप (७४ किलो), चंद्रमोहन (७९ किलो), सचिन (९२ किलो), विकी (९७ किलो) यांनी सोनेरी यश मिळवले, तर जयपूरन सिंग १२५ किलो गटात रौप्यपदकाचा मानकरी ठरला.भारताने या स्पर्धेत ग्रीको-रोमन प्रकारात एका सुवर्णपदकासह तीन पदके जिंकली. या प्रकारातही भारताची कामगिरी सर्वोत्तम ठरली. "हे यश भारतीय कुस्तीसाठी नक्कीच आशादायी आणि प्रेरणादायी आहे.

भारतीय मल्ल चांगली तयारी करत आहेत. त्यांचे हे यश भविष्यात असेच वरिष्ठ गटातही परावर्तीत होईल अशी आशा," असे भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष संजय सिंह म्हणाले. याच केंद्रावर आता १७ वर्षांखालील गटाच्या आशियाई स्पर्धेला सुरुवात झाली.

पृथ्वी शॉ मुंबई क्रिकेट संघ सोडणार?

नवी दिल्ली: दि. २३ प्रतिनिधी

भारताचा संघ सध्या इंग्लड दौऱ्यावर आहे, टीम इंडीया इंग्लडविरुद्ध ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. या मालिकेचा पहिला सामना सध्या सुरु आहे. यामध्ये भारताच्या युवा खेळाडूंनी चांगली कामगिरी केली आहे. याचदरम्यान आता भारतीय क्रिकेट संदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. यामध्ये १९ वर्षांखालील विश्वचषक विजेता कर्णधार पृथ्वी शॉ सध्या भारताच्या सर्वात प्रतिभावान तरुण खेळाडूंपैकी एक मानला जातो, परंतु तरीही त्याला भारतीय संघात संधी मिळत नाही.त्याला मागील बरीच वर्ष भारतीय संघामधुन त्याचबरोबर आयपीएल २०२५

मध्ये देखील स्थान मिळाले नाही. तो मुंबईच्या स्थानिक संघाबाहेर आहे. दरम्यान, बातम्यांनुसार, त्याने मुंबई संघ सोडण्याचा निर्णय घेतला आहे. त्याला आणखी २ ते ३ राज्य संघांसाठी खेळण्याची मोठी ऑफर मिळाली आहे. विक्री न झाल्यामुळे शॉ यावर्षी आयपीएलचा भाग नव्हता.

हेडिंग्लेचा रणसंग्राम निर्णायक वळणावर

नवी दिल्ली: दि. २३ प्रतिनिधी

हेडिंग्ले येथे सुरू असलेल्या या चुरशीच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्याच्या तिसऱ्या दिवशी जसप्रीत बुमराहच्या भेदक माऱ्यानंतर के. एल. राहुलच्या संयमी ४७ धावांच्या नाबाद खेळीमुळे भारताने इंग्लंडवर नियंत्रण ठेवले. इंग्लंडचा पहिला डाव ४६५ धावांवर आटोपताच भारताला सहा धावांची आघाडी मिळाली होती. दिवसाचा खेळ पावसामुळे अर्धा तास आधी थांबवण्यात आला, तेव्हा भारताने दुसऱ्या डावात २ बाद ९० धावा केल्या होत्या आणि ९६ धावांची आघाडी घेतली होती.

भारताकडून जसप्रीत बुमराहने ८३ धावांत ५ बळी घेतले. ही त्याची कसोटीतील १४ वी पाच बळींची कामगिरी असून परदेशातली १२ वी 'फायव्हर' आहे. त्याने या प्रकारात कपिल देवच्या विक्रमाची बरोबरी केली. प्रसिद्ध कृष्णाने तीन तर मोहम्मद सिराजने दोन गडी बाद केले. भारताच्या दुसऱ्या डावात यशस्वी जैस्वाल अवघ्या ४ धावांवर बाद झाला. त्याला बायडन कार्सने बाद केले. त्यानंतर के. एल. राहुल आणि साई सुदर्शन यांनी दुसऱ्या विकेटसाठी ६६ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी करत डाव सावरला. साई सुदर्शनला पुन्हा एकदा स्टोक्सने तंबूत पाठवले. दिवसअखेर राहुल ४७ धावांवर नाबाद असून, शुभमन गिल ६ धावांवर त्याच्या साथीला आहे.दिवसाच्या पहिल्या सत्राचा खेळ संपला असून, उपाहारापर्यंत भारताने शुभमन गिलची एकमेव विकेट गमावून आपली आघाडी १५९ धावांपर्यंत पोहोचवली आहे. हे सत्र भारतासाठी समाधानकारक ठरले आहे. या सत्रात केवळ ६३ धावाच करता आल्या असल्या तरी, भारताने फक्त एकच गडी गमावला, ही दिलासादायक बाब आहे. त्यामुळे या सत्रावर कोणत्याही एका संघाचे पूर्ण वर्चस्व राहिले नाही. उपाहाराच्या या वेळेत दोन्ही संघ जेवणापेक्षा पुढील सत्रासाठी नवी रणनीती आणि डावपेच आखण्यावर अधिक लक्ष केंद्रित करतील, हे निश्चित.इंग्लंडच्या भेदक गोलंदाजीपुढे भारतीय फलंदाजांची धावगती मंदावली आहे. सध्या भारताची धावगती सुमारे ३.१८ इतकी आहे, जी गोलंदाजांना बचाव करण्यासाठी मोठे आव्हान उभे करण्याच्या दृष्टीने अजिबात समाधानकारक नाही. ख्रिस वोक्स आणि ब्रायडन कार्स यांनी केलेल्या प्रभावी गोलंदाजीची लय कर्णधार बेन स्टोक्स आणि जोश टंग यांनी कायम राखली आहे. त्यांच्या अचूक माऱ्यामुळे ऋषभ पंत किंवा के. एल. राहुल या दोघांनाही दडपण कमी करणारा कोणताही मोठा फटका खेळण्याची संधी मिळालेली नाही.ऋषभ पंतचा धाडसी आणि धोकादायक खेळ कायम असून, त्याला चुका करण्यास प्रवृत्त करण्यासाठी इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सने त्याच्यासोबत शाब्दिक चकमक सुरू केली आहे.

डावाच्या ४१ व्या षटकातील पाचवा चेंडू स्टोक्सने लेंथवर टाकला, जो पंतच्या ऑफ स्टंपच्या दिशेने आला. पंतने तो चेंडू हलक्या हातांनी कव्हरच्या दिशेने खेळण्याचा प्रयत्न केला, पण चेंडूने बॅटची कड घेतली आणि दुसऱ्या स्लिपच्या बाजूने चौकार गेला. या षटकातील शेवटचा चेंडू मिडविकेटला खेळल्यानंतर स्टोक्सने पंतला उद्देशून काहितरी बोलला. पंतने त्याचे नेहमीचे मोठे, आक्रमक फटके खेळावेत, यासाठी स्टोक्स त्याला मुद्दामहून डिवचत असल्याचे स्पष्ट दिसत होते. यावेळी पंत ४१ चेंडूंत २४ धावांवर, तर के. एल. राहुल १३२ चेंडूंत ६२ धावांवर खेळत होता.

ललित उपाध्यायची तडकाफडकी निवृत्ती

नवी दिल्ली: दि. २३ प्रतिनिधी

भारतीय हॉकी संघाचा अनुभवी फॉरवर्ड आणि दोन ऑलिम्पिक पदक विजेता खेळाडू ललित उपाध्याय यांने आपल्या दोन दशकांहून अधिक यशस्वी कारकिर्दीला पूर्णविराम दिला आहे. त्यांच्या या अनपेक्षित निवृत्तीच्या घोषणेने क्रीडाविश्वात अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे.

ललितने २०१४ साली झालेल्या विश्वचषक स्पर्धेतून आंतरराष्ट्रीय हॉकीमध्ये पदार्पण केले होते आणि दोन ऑलिम्पिक पदके जिंकणे ही त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठी उपलब्धी ठरली.ललित उपाध्यायने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर एक पोस्ट शेअर करत आपल्या निवृत्तीची माहिती दिली. त्याने आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की, 'हा प्रवास मर्यादित संसाधने असलेल्या एका लहानशा गावातून सुरू झाला, पण माझी स्वप्ने अमर्याद होती. अनेक आव्हानांचा सामना करण्यापासून ते दोनदा ऑलिम्पिक पदकांपर्यंत पोहोचण्याचा हा प्रवास अविस्मरणीय आणि गौरवाने भरलेला आहे. तब्बल २६ वर्षांनंतर आपल्या शहरातून पहिला ऑलिम्पियन बनण्याचा मान मी आयुष्यभर अभिमानाने जपेन.'ललित उपाध्यायने आपल्या शानदार खेळाच्या जोरावर भारतीय हॉकी संघाला अनेक सामन्यांमध्ये विजय मिळवून दिला. त्याच्याकडे गोल करण्याची एक अद्भुत क्षमता होती. वरिष्ठ स्तरावर खेळताना

ऑलिम्पिक पदकांव्यतिरिक्त, ललितने २०१६ मध्ये आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी आणि २०१७ मध्ये आशिया चषक जिंकणाऱ्या भारतीय संघात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. याशिवाय, त्याने २०१७ हॉकी वर्ल्ड लीग फायनल्समध्ये कांस्य, २०१८ चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये रौप्य, २०१८ आशियाई खेळांमध्ये कांस्य आणि २०१८ आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये सुवर्णपदक जिंकले. तो एफआयएच प्रो लीग २०२१-२२ मध्ये तिसऱ्या स्थानी राहिलेल्या आणि २०२२ आशियाई खेळांमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या संघाचाही भाग होते. भारतीय हॉकीमधील अतुलनीय योगदानाबद्दल ललितला २०२१ मध्ये प्रतिष्ठित 'अर्जुन पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले होते.

त्याने भारतीय संघासाठी १८३ सामन्यांमध्ये ६७ गोल नोंदवले. या ३१ वर्षीय खेळाडूने आपला अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना १५ जून रोजी ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळला होता.

सेन्सेक्स ५११ अंकांनी घसरून बंद, निफ्टी २५ हजारांखाली

मध्य पूर्वेत वाढलेल्या संघर्षामुळे बाजारातील भावना कमकुवत झाल्या आहेत. परिणामी, सोमवारी (दि. २३ जून) सेन्सेक्स- निफ्टी घसरले. सेन्सेक्स ५११ अंकांनी घसरून ८१,८९६ वर बंद झाला. तर निफ्टी ५० निर्देशांक १४० अंकांच्या घसरणीसह २५ हजारांच्या खाली म्हणजे २४,९७१ वर स्थिरावला. मुख्यतः आयटी आणि रियल्टी शेअर्समध्ये जोरदार विक्री दिसून आली.

अमेरिकेने इराणमधील महत्त्वाच्या आण्विक तळांवर केलेला हल्ला आणि यामुळे पुरवठ्याबाबत चिंता निर्माण झाल्याने कच्च्या तेलाच्या दरात झालेली वाढ आदी घटक बाजारातील घसरणीसाठी कारणीभूत ठरले. क्षेत्रीय निर्देशांकात सर्वाधिक फटका निफ्टी आयटीला बसला. निफ्टी आयटी निर्देशांक १.५ टक्के घसरला. निफ्टी ऑटो ०.९ टक्के, निफ्टी एफएमसीजी ०.७ टक्के घसरला. निफ्टी बँक, फायनान्सियल सर्व्हिसेस निर्देशांकावरही दबाव राहिला. दरम्यान, बीएसई मिडकॅप ०.२ टक्के आणि स्मॉलकॅप ०.५ टक्के वाढून बंद झाला.बीएसई सेन्सेक्सवरील ३० पैकी २१ शेअर्स लाल रंगात बंद झाले. त्यात इन्फोसिस, एलटी, एचसीएल टेक, एम अँड एम, हिंदुस्तान युनिलिव्हर, टीसीएस, पॉवर ग्रिड या शेअर्सचा समावेश होते. हे शेअर्स १ ते २ टक्के घसरले. तर दुसरीकडे ट्रेंट, भारत इलेक्ट्रॉनिक हे शेअर्स प्रत्येकी ३ टक्के वाढले. बजाज फायनान्स, कोटक बँक, बजाज फिनसर्व्ह, इर्टनल, टाटा स्टील हे शेअर्सही तेजीत राहिले.

सीएनजी, इथेनॉल ट्रॅक्टर्स लवकरच बाजारात

नितीन गडकरींची पुण्यात मोठी घोषणा

पुणे : दि. २३ प्रतिनिधी

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी पुण्यात शेती आणि पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात नवतंत्रज्ञानाच्या वापरावर भर देत मोठी घोषणा केली आहे. पुण्यात आयोजित आंतरराष्ट्रीय टनेल वर्कशॉप परिषदेत बोलताना गडकरी यांनी सांगितले की, देशात लवकरच सीएनजी, इथेनॉल आणि इलेक्ट्रिकवर चालणारे ट्रॅक्टर्स उपलब्ध होतील.

"मी स्वतः माझ्या शेतात सीएनजी ट्रॅक्टर वापरतो. शेतीत अशा पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे गरजेचे आहे," असे त्यांनी ठामपणे सांगितले. यासोबतच, देशात बोगदे निर्मिती, पर्यायी इंधन आणि आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित पायाभूत सुविधांच्या विकासावरही त्यांनी भर दिला.गडकरी यांनी शेती क्षेत्रात पर्यायी इंधनाच्या वापरावर जोर दिला. "आम्ही सीएनजी, इथेनॉल आणि इलेक्ट्रिकवर चालणारे ट्रॅक्टर्स विकसित करत आहोत. माझ्या शेतात मी स्वतः सीएनजी ट्रॅक्टर वापरतोय. यामुळे इंधन खर्च कमी होतो आणि पर्यावरणाचे रक्षण होते," असे गडकरी म्हणाले.

त्यांनी शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याचे आवाहन केले. याशिवाय, दुचाकी वाहनांवरही सीएनजीचा वापर वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. "सीएनजी दुचाकीमुळे खर्चात मोठी बचत होते. शेती आणि वाहतूक क्षेत्रात अशा तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात अपरिहार्य आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.पायाभूत सुविधांच्या विकासावर बोलताना गडकरी यांनी बोगदा निर्मितीवर विशेष भर दिला. "देशात येत्या काही वर्षांत ३ लाख कोटी रुपयांचे बोगदे बांधण्याचे नियोजन आहे. सध्या बोगदा निर्मितीच्या मशिन्स फक्त चीनमध्येच तयार होतात, पण राजकीय कारणांमुळे आपण त्या आयात करू शकत नाही.

यामुळे स्वदेशी मशिन्स विकसित करण्याची गरज आहे," असे गडकरी म्हणाले. बोगदा निर्मितीत कृत्रिम बुद्धिमत्ता () आणि नवतंत्रज्ञानाचा वापर करून सुरक्षा आणि कार्यक्षमता वाढवण्याचेही त्यांनी आवाहन केले. "आयात मशिन्स महाग आहेत. आपण स्वतःच्या मशिन्स बनवल्या तर

खर्च कमी होईल आणि देशाला आत्मनिर्भर बनवता येईल," असे ते म्हणाले.गडकरींच्या या घोषणेने शेतकऱ्यांना कमी खर्चात आणि पर्यावरणपूरक शेतीसाठी नवीन पर्याय उपलब्ध होणार आहे. सीएनजी आणि इथेनॉलवर चालणारे ट्रॅक्टर्स शेतकऱ्यांचा खर्च कमी करून शेतीला अधिक फायदेशीर बनवू शकतात. याशिवाय, बोगदा निर्मिती आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून देशाच्या पायाभूत सुविधा क्षेत्रातही क्रांती घडवण्याचा गडकरी यांचा मानस आहे."देशाला प्रगतिपथावर नेण्यासाठी नवतंत्रज्ञान स्वीकारणे अपरिहार्य आहे. मग तो शेती असो, वाहतूक असो की बोगदा निर्मिती, आपण स्वदेशी तंत्रज्ञान आणि पर्यायी इंधनाच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारत घडवू शकतो," असे गडकरी यांनी ठामपणे सांगितले. त्यांच्या या घोषणा आणि नियोजनामुळे शेती आणि पायाभूत सुविधा क्षेत्रात नव्या क्रांतीची नांदी होणार आहे.

पहिल्या इलेक्ट्रिक विमानाचे यशस्वी उड्डाण

वॉशिंग्टन :दि. २३ प्रतिनिधी

अमेरिकेतील बीटा टेक्नॉलॉजीज या कंपनीने इतिहास घडवला आहे. त्यांच्या ' ३००' या पूर्णपणे इलेक्ट्रिक प्रवासी विमानाने नुकतंच १३० किलोमीटरचं अंतर अवघ्या ६९४ रूपये (८) खर्चामध्ये पार केलं आहे.

या विमानाने पूर्व हम्प्टन येथून न्युयॉर्कमधील जॉन एफ. केनेडी विमानतळापर्यंत प्रवास केला. या प्रवासात चार प्रवासी उपस्थित होते आणि संपूर्ण उड्डाण अवघ्या ३५ मिनिटांत पूर्ण झालं.पारंपरिक हेलिकॉप्टरने हेच अंतर पार करण्यासाठी सुमारे रु. १३,८८५ (१६०) खर्च येतो, मात्र ' ३००' ने हा प्रवास केवळ ७०० रुपयांत पार केल्यामुळे हा एक मोठा टप्पा मानला जात आहे. यामुळे भविष्यात हवाई प्रवास अधिक स्वस्त, प्रदूषणमुक्त

आणि सुलभ होण्याची शक्यता आहे.बीटा टेक्नॉलॉजीजचे संस्थापक आणि सीईओ काईल क्लार्क यांनी सांगितले की, "हे १०० टक्के इलेक्ट्रिक विमान आहे. यामध्ये प्रवास करताना आवाजाचा त्रास होत नाही आणि प्रवासी एकमेकांशी निवांतपणे संवाद साधू शकतात. चार्जिंगचा खर्च फक्त ८ आला."फक्त बीटा टेक्नॉलॉजीजच नव्हे, तर आर्चर एव्हिएशन सारख्या कंपन्याही हवाई टॅक्सी क्षेत्रात क्रांती घडवण्यासाठी सज्ज आहेत.लॉस एंजेलिस ऑलिंपिक २०२८ मध्ये अधिकृत एअर टॅक्सी प्रदाता म्हणून आर्चरची निवड झाली आहे. ही वाहतूकप्रणाली २०२६ पासून सुरू होण्याची शक्यता आहे.

२०२५ मध्ये मालमत्ता विक्री सर्वात कमी!

नवी दिल्ली: दि. २३ प्रतिनिधी

घरांच्या विक्रीत सातत्याने घट होत आहे. रिअल इस्टेट डेटा विश्लेषक कंपनी प्रॉपइक्विटीच्या अहवालानुसार, एप्रिल-जूनमध्ये देशातील ९ प्रमुख शहरांमध्ये घरांची विक्री १९ टक्क्यांनी घसरून ९४,८६४ युनिट्सवर येण्याची अपेक्षा आहे. प्रॉपइक्विटीने रविवारी प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे की, चालू कॅलेंडर वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत घरांची विक्री १९ टक्क्यांनी घसरून ९४,८६४ युनिट्सवर येण्याची अपेक्षा आहे, जी गेल्या वर्षी याच कालावधीत १,१६,४३२ युनिट्स होती.प्रॉपइक्विटीचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) समीर जसुजा म्हणाले की, २०२१ च्या तिसऱ्या तिमाहीनंतर (जुलै-सप्टेंबर) पहिल्यांदाच घरांची विक्री एक लाख युनिट्सच्या पातळीपेक्षा खाली आली आहे. म्हणजेच २०२५ मध्ये घरांची विक्री ४ वर्षांच्या नीचांकी पातळीवर पोहोचली आहे. रिअल इस्टेट क्षेत्राशी संबंधित तज्ज्ञांचे म्हणणे आहे की घरांच्या मागणीत घट होण्याचे एकमेव कारण म्हणजे गगनाला भिडणारे दर. गेल्या ४ वर्षात मालमत्तेच्या किमती प्रचंड वाढल्या आहेत. यामागे कोणतेही तर्क नाही, किंमत इतक्या वेगाने का वाढली आहे? कच्च्या मालाच्या किमती खूप वाढल्या आहेत की आधीच सुरू असलेल्या प्रकल्पाच्या जमिनीच्या किमती वाढल्या आहेत. बिल्डरने मनमानी पद्धतीने किंमत वाढवली आहे.

यामुळे मालमत्ता अनेक लोकांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. आता त्यांना इच्छा असूनही घर खरेदी करता येत नाही. त्यामुळे मालमत्तेची मागणी आपोआप कमी झाली आहे. येणाऱ्या काळात हे मोठ्या मंदीला आमंत्रण देऊ शकते. यापूर्वीही अशा परिस्थिती निर्माण झाल्या आहेत जेव्हा रिअल इस्टेट क्षेत्रात बराच काळ मंदी आहे. आता फक्त आलिशान घरे विकली जात आहेत. काही श्रीमंत लोक त्यासाठी सौदे करत आहेत.

दैनिक अजिंक्य भारत

आपला विदर्भ

वर्धापन दिनानिमित्त मंगलमय शुभेच्छा..!!

मंगळवार, दि. २४ जून २०२५

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा..!!
डॉ. सय्यद गाजी असर
आदर्श शिक्षक तथा सामाजिक कार्यकर्ता उमरखेड

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
पवन गिरी
सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी, उपविभाग ढाणकी.

ग्राम विविध सहकारी संस्था म.र. न. ३४२
दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
- अध्यक्ष - उत्तमराव कदम
- उपाध्यक्ष - डॉ. विजयराव थोटे
- सचिव - जीवन शेळके,
तथा सर्व संचालक मंडळ

कुणाल किराणा, सुशांत टी हाऊस संघर्ष, & एयर कॉम्प्रेसर, देवसरी रोड चालगणी.
दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
प्रो. प्रा. शंकरराव विनकरे

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
जी.टी. रणमले
दुय्यम निबंधक
श्रेणी-१ दुय्यम निबंध कार्यालय, उमरखेड.

श्री दत्त ट्रेडिंग कंपनी, चालगणी
दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
भुसार मालाचे ठोक व्यापारी
शुभेच्छुक
प्रो.प्रा. देवदत्त अवधूतराव साळेकर

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिननिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
गणेश मेंढे
शासकीय कंत्राटदार, उमरखेड.

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
प्रवीण पाटील मिराशे
माजी सभापती, पंचायत समिती, उमरखेड
तथा संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती उमरखेड

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिननिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
कृष्णा पाटील देवसरकर
सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती, उमरखेड

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
किरण विमलराव कोळपे
गटविकास अधिकारी, पंचायत समिती उमरखेड तथा सर्व विस्तार अधिकारी व कर्मचारी वृंद प. स. उमरखेड

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
जी.टी. घेवंदे
उपअभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालय, उमरखेड
सर्व अभियंते तथा कर्मचारी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, उमरखेड.

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
डॉ. विजयराव माने
अध्यक्ष, कृषी महाविद्यालय, उमरखेड

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
राम पाटील देवसरकर
कॉंग्रेस नेते, तथा माजी अर्थ व बांधकाम सभापती, जिल्हा परिषद यवतमाळ.

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
ॲड. संजय जाधव
(प्रसिद्ध विधीतज्ञ तथाशिवसेना शहर प्रमुख उमरखेड

दैनिक अजिंक्य भारत या वृत्तपत्रास वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!
शुभेच्छुक
नितीन भाऊ भुतडा
जिल्हा समन्वयक, भारतीय जनता पार्टी
किसनराव वानखेडे
आमदार, उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघ

जाहिरात संकलन : संभाजी भोयर, तालुका प्रतिनिधी, उमरखेड (मो.नं. 9370551495)

अजिंक्य भारत
आपलं अकोला
अकोला, मंगळवार, दि. २४ जून २०२५

निवडणूक प्रक्रियेस वेग; राजकीय पक्षांपुढे आव्हान

प्रभाग रचना तयार करण्याची प्रक्रिया सुरू

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : तीन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर महापालिकेच्या निवडणूक प्रक्रियेस गती मिळत असून, राजकीय हालचालींना वेग आला आहे. साडे तीन वर्षाच्या प्रतीक्षेनंतर निवडणूक होत आहे. शहरात विकास कामांचा सपाटा सुरू झाला आहे. २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीनुसार प्रभाग रचना राहणार आहे. अकोला पूर्व व अकोला पश्चिम विधानसभा मतदार संघातील निवडणुकीनुसार वाढलेली अकोला शहरातील मतदार संख्या पाहता राजकीय पक्षांसाठी आव्हान ठरणार आहे. २०२२ मध्ये अकोला महापालिका सार्वत्रिक निवडणूक होणे अपेक्षित होते. परंतु ओबीसी आरक्षण प्रकरण आणि विविध न्यायालयीन अडथळ्यांमुळे महापालिका निवडणुका होऊ शकल्या नाही. या काळात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्या. शहरातील मतदारसंख्या वाढली असून, प्रत्येक प्रभागात नवीन मतदारांची नोंद झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने २०११ च्या जनगणनेच्या आधारे प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत. २०१७ च्या महापालिका निवडणुकीवेळी ४ लाख ७७ हजार ४५ मतदारसंख्या होती. यामध्ये आता वाढ झाली असून नवीन मतदार आणखी वाढणार आहेत. २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीनुसार एकूण मतदार ४७७,०४५ एवढे होते. यामध्ये पुरुष मतदार २४६,१४४ तर महिला मतदार २३०,८७८ होते. नवीन प्रभाग रचनेदरम्यान सीमा बदल, जोडणी, तोडणीची शक्यता वर्तवली आत आहे. त्यामुळे प्रभाग रचनेबाबत इच्छुकांमध्ये उत्सुकता आणि अस्वस्थता वाढली आहे. तीन वर्षे महापालिकेचा कारभार प्रशासकांमार्फत सुरू राहिल्याने, माजी नगरसेवकांचा जनतेशी असलेला थेट संपर्क कमकुवत झाला आहे. निवडणूक लढवण्याची तयारी करताना माजी नगरसेवक आणि इच्छुक उमेदवार पुन्हा नोकांशी विविध उपक्रमांच्या माध्यमातून संपर्क करण्यासाठी धडपड करताना दिसत आहेत. मतदारसंख्येचा थेट प्रभाव निवडणुकीच्या निकालांवर होणार असल्याने, सर्वच राजकीय पक्ष आणि इच्छुकांसमोर मतदारांना आकर्षित करण्याचे आव्हान आहे. जनसंपर्क, प्रचार, मतदार यादीतील नावे हे सर्व मुद्दे या निवडणुकीत निर्णायक ठरणार आहेत.

२०१७ मधील पक्षीय बलाबल

- भाजप - ४८
- शिवसेना - ८
- काँग्रेस - १३
- राष्ट्रवादी - ५
- इतर - ६

फोटोग्राफीच्या नावाखाली मोबाईल लंपास

अकोला : अकोल्यात एका तरुण छायाचित्रकारासोबत फोटोग्राफी ऑर्डरच्या देण्याच्या नावाखाली फसवणुकीची धक्कादायक घटना घडली आहे. खडकी येथील २२ वर्षीय फोटोग्राफर आदित्य चांदीवाले याला एका अज्ञात इसमाने ७० हजार रुपये किंमतीचा सॅमसंग एस२४ अल्ट्रा मोबाईल घेऊन पसार झाला होता . विशेष म्हणजे, आरोपी पकडूनही सिव्हिल हॉस्पिटलमधून पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे फरार झाला, ज्यामुळे शहरात खळबळ उडाली आहे. ही घटना ३० मे रोजी अकोला शहरातील वाय.एस. ट्रॅव्हल्स ऑफिस परिसरात घडली. आदित्य चांदीवाले याच्याशी एका अज्ञात व्यक्तीने मोठी फोटोग्राफी ऑर्डर देण्याच्या बहाण्याने संपर्क साधला. त्याने स्वतःला ग्राहक सांगत आदित्यला ट्रॅव्हल्स ऑफिसजवळ भेटायला बोलावले. संभाषणादरम्यान काही फोटो काढण्याचा बहाणा करत आरोपीने आदित्यकडून त्याचा महागडा मोबाईल मागितला.संधीचा फायदा घेत, आरोपीने निळ्या रंगाच्या शाईन दुचाकीवरून मोबाईल घेऊन पलायन केले. तात्काळ रामदास पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, यानंतर पोलिसांनी कोणतीही ठोस हालचाल केली नाही.

प्रतिबंधित प्लास्टिकवर मनपाची धडक कारवाई

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : शहरात एकल वापर प्लास्टिकवर बंदी असूनही त्याचा वापर करणाऱ्या व्यापाऱ्यांविरुद्ध सोमवारी अकोला महानगरपालिकेने मोठी कारवाई केली. केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निर्देशानुसार मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनिल लहाने यांच्या आदेशाने ही कारवाई करण्यात आली.

पश्चिम, दक्षिण व उत्तर झोनमध्ये झोननिहाय तपासणी करत मनपाने प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा सापडलेल्या व्यावसायिकांवर दंडात्मक कारवाई केली. पश्चिम झोनमधील जयहिंद चौक परिसरातील फेरीवाले, रेस्टॉरंट व फिंगर व्यावसायिकांकडे प्रतिबंधित कॅरीबॅग व प्लास्टिक कोटेड वस्तू आढळल्याने १०,५०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. दक्षिण झोनमधील फ्रुट मार्केट परिसरातही अशाच प्रकारचा साठा आढळून आला असून संबंधित व्यावसायिकांकडून ६,७०० रुपये वसूल करण्यात आले.तर उत्तर झोनमध्ये टिळक रोड व जैन मंदिर परिसरात एका व्यावसायिकाकडे प्लास्टिक कॅरीबॅग व प्लास्टिक कोटेड ग्लास आढळल्याने ५,००० रुपयांचा दंड लावण्यात आला.

या तिन्ही झोनमध्ये एकूण २२,२०० रुपयांचा दंड वसूल करत मनपाने प्लास्टिकविरोधी कारवाईला जोर दिला आहे.मनपा प्रशासनाने शहरातील सर्व नागरिक, व्यापारी, विक्रेते यांनी एकल वापर प्लास्टिक, थर्माकोल, कोटेड डिश, कप, ग्लास, कंटेनर, वाडगे इत्यादी वापरणे, साठवणे, उत्पादन व विक्री त्वरित बंद करावी, असे आवाहन केले आहे.

९ लाखांची रोकड चोरी; २४ तासांत आरोपी अटकेत!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : महावितरण विभागाच्या कर्मचाऱ्याचे भविष्य निर्वाह निधीचे ९ लाख रुपये चोरीला गेल्याची घटना अकोला शहरातील खदान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गौरक्षण रोडवरील केडिया कॉम्प्लेक्स येथे घडली. विशेष म्हणजे या गुन्ह्यातील आरोपीस केवळ २४ तासांत अटक करण्यात येऊन संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

दिनांक २२ जून २०२५ रोजी फिर्यादी शाम नंदलाल जांबे (४५) व्यवसाय टेक्निशियन, महावितरण विभाग अकोला) यांनी खदान पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक २० जून २०२५ रोजी त्यांनी त्यांच्या जीपीएफ खात्यातून भारतीय स्टेट बँकेमार्फत ९ लक्ष रुपये रोख रक्कम काढली होती. ही रक्कम ते घरी नेत असताना प्रकृती बिघडल्याने विश्रांतीसाठी गौरक्षण रोडवरील केडिया कॉम्प्लेक्स येथे थांबले असता, झोप लागल्यामुळे त्यांच्या जवळील पिशवीतून अज्ञात व्यक्तीने ही मोठी रक्कम चोरून नेली. त्यानंतर खदान पोलीस ठाण्यात कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक मनोज केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली डिटेक्शन ब्रँचच्या पथकाने तातडीने तपास सुरु केला आणि अत्यंत शिताफीने आरोपी विवेक आगस्टीन इंगेळे (३१) व्यवसाय आर्किटेक्ट, रा. रामदासपेठ, अकोला) याला अटक करून त्याच्याकडून संपूर्ण चोरी गेलेली ९ लाख रुपयांची रक्कम हस्तगत करण्यात आली. ही कामगिरी अकोला जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या कारवाईत पोनि मनोज केदारे, पोहेका निलेश खंडारे, पोहेका अमित दुबे, पोहका जय मंडावरे, पोहेका विजय मुलनकर, पोकों अभिमन्यू सदाशिव, आणि पोकों वैभव करतुरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ही जलद कारवाई अकोला पोलिसांच्या दक्षतेचे आणि कार्यक्षमतेचे उत्तम उदाहरण ठरत आहे.

बँक कर्मचाऱ्याकडून १९.८४ लाखांचा अपहार

४३५ महिलांची फसवणूक आरोपीचा जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : इसाफ स्मॉल फायनान्स बँकेतील १९.८४ लाख रुपयांच्या आर्थिक फसवणूकप्रकरणी अटकेत असलेल्या कर्मचारी आरोपी राहुल बाजीप्रभू देशपांडे (३८) रा. साईनगर, अमरावती) याचा जामीन अर्ज अकोट सत्र न्यायालयाने फेटाळला. या प्रकरणात एकूण ४३५ महिला ग्राहकांची बँकेच्या तिघा कर्मचाऱ्यांनी संगनमत करून फसवणूक केल्याचा आरोप आहे. बँकेच्या अकोट शाखेतील क्षेत्र व्यवस्थापक मनोज खंदारे यांच्या तक्रारीवरून अकोट शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी देशपांडे याच्यासोबत दीपक कांबळे (वाशिम) व श्रीकृष्ण बनोहर (शेलूबाजार) यांचाही समावेश आहे.

या तिघांनी महिला बचत गटांना कर्ज देताना बँकेच्या नियमानुसार प्रक्रिया न करता काहींना कर्ज दिले नाही, काहींना दिलेले कर्ज बँकेत भरले नाही, तर काहींना एटीएमच वितरित न करता ते स्वतः वापरून रक्कम काढल्याचे उघड झाले. आर्थिक अंकेक्षण अहवालात १९ लक्ष ८४ हजार ८९१ रुपयांच्या अपहाराची नोंद आहे.

या प्रकरणात सरकारी वकील अजित देशमुख व सहकारी ॲड. शुभम सुर्यवंशी यांनी आरोपीच्या जामीन अर्जास विरोध करत युक्तिवाद सादर केला. पोलीस तपास सुरू असून अन्य दोन आरोपी फरार आहेत. अपहार झालेली रक्कम अजूनही वसूल करायची आहे.

राशन साठी लांबच लांब रांग...

राज्य शासनाने राशन कार्ड धारकांना तीनं महीन्याचे राशन एकाच वेळी मिळणार असे जाहीर केल्या नंतर शहरालगत असलेल्या हद्दवाढ भागातील मलकापूर येथील एका स्वस्त धान्य दुकानावर राशन घेण्यासाठी महीला व पुरुषांची तोबा गर्दी होत आहे.
(छाया. संजय ताथुरकर)

मालमत्ता पुनर्मुल्यांकन सुरू; १५ महिन्यात करावी लागणार प्रक्रिया

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : शहरातील १ लाख ७० हजार मालमत्तांचे पुनर्मूल्यांकन करण्याचे काम स्थापत्य कन्सल्टन्सी नामक एजन्सीने सुरू केले असून या कामाचे आदेश महापालिका प्रशासनाने दिले आहेत. यानुसार शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. जुन्या मालमत्तांचे वाढीव बांधकाम तसेच नवीन मालमत्तांची मोजणी केली जाणार आहे. यामध्ये नकाशे काढणे, वॉर्ड निहाय यादी तयार करणे, जीएसआय प्रणालीद्वारे मोजमाप करणे अशी प्रक्रिया १५ महिन्यात कंत्राटदाराला पार पाडावी लागणार आहे.

यानंतर रेडीरेकनर दरानुसार कर आकारणी करून यावर नागरिकांचे आक्षेप, हरकती व सूचना मागविण्यात येतील. महापालिका प्रशासनाकडून नागरिकांवर भांडवली मूल्यावर आधारित नवीन करवाढ लादण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. महापालिकेने भांडवली मूल्यावर आधारित (रेडीरेकनर दरानुसार) मालमत्तांचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली होती. या कामासाठी स्थापत्य कन्सल्टन्सीची नियुक्ती करण्यात आली असून कार्यादेश देण्यात आले आहे. त्यानुसार सदर एजन्सीने पूर्व झोनमध्ये प्रायोगिक तत्वावर काम सुरू केल्याची माहिती आहे. दरम्यान तत्कालीन सत्ताधारी भाजपने भांडवली मूल्यावर आधारित पद्धतीने २०२२-२३ ते २०२६-२७ या पंचवार्षिक कालावधीकरीता मालमत्तांची करवाढ करण्याबाबतचा विषय ३१ ऑगस्ट २०२१ रोजीच्या सर्वसाधारण सभेत घेतला होता.

रेडीरेकनर दरांवर होणार मूल्यांकन

शहरात महापालिकेकडून सन २०१६ मध्ये कर आकारणी करण्यात आली होती. २०१७-१८ ते २०२१-२२ पर्यंत कर वाढवण्यात आला. वार्षिक भाडे कराराच्या आधारे हे मूल्यांकन करण्यात आले होते. आता २०२५-२६ ते २०२९-३० या वर्षासाठी मालमत्तांचे पुनर्मूल्यांकन करण्यात येणार आहे. सरकारने रेडीरेकनर दर निश्चित केले असून या दरानुसार भूखंड आणि त्यावर बांधण्यात आलेल्या इमारतीचे मूल्यमापन केले जाणार आहे.

४० फूट खोल खदानीत बेपत्ता युवकाचा मृतदेह अखेर सापडला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : वाशिम जिल्ह्यातील नागरतास (ता. मालेगाव) येथील खदानीत पाण्यात बेपत्ता झालेल्या युवकाचा मृतदेह पिंजर येथील मानव सेवा आपत्ती व्यवस्थापन फाउंडेशनच्या संत गाडगेबाबा आपत्कालीन शोध व बचाव पथकाने आज दुपारी १२.३० च्या सुमारास यशस्वीरीत्या शोधून बाहेर काढला.

मृत युवकाचे नाव जयकुमार संतोष भुरकाडे (रा. महसूल कॉलनी, मालेगाव) असून, आज सकाळी खदान परिसरात त्याची मोटारसायकल, मोबाईल व चप्पल आढळल्याने तो खदानीत बुडाल्याची दाट शक्यता व्यक्त करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर मालेगाव तहसीलदार दिपक पुंडे यांच्या सूचनेवरून पिंजर येथील पथक प्रमुख दिपक सदाफळे यांना तात्काळ बोलावण्यात आले. त्यांनी सहकारी शेखर केवट, अतुल उमाळे, गोपाल गीरे, अपूर्व चेके, अजय डाके, दत्ता मानेकर यांच्या मदतीने सर्च ऑपरेशन सुरू केले. प्रशासन व नातेवाईकांना मृतदेह सापडेपर्यंत शोधकार्य थांबवणार नाही असा शब्द दिल्यानंतर अखेर अथक प्रयत्नांनंतर मृतदेह ४० फ ूट खोल पाण्यातून बाहेर काढण्यात आला.

जिल्हा परिषद शाळेची वाजली घंटा!

शाळा प्रवेशोत्सव: विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : दोन महिन्यांच्या उन्हाळी सुटीनंतर सोमवार (ता.२३) पासून नवीन शैक्षणिक सत्राला सुरूवात झाली. जिल्ह्यातील ९१२ जिल्हा परिषद शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक, गणवेश आणि पुष्पगुच्छ देऊन जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी उत्साहात स्वागत केले.

नवीन शैक्षणिक सत्रात शाळांमध्ये प्रवेशोत्सव विविध उपक्रम राबवून उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी गावातून प्रवेशोत्सव दिंडी काढत विद्यार्थ्यांनी उर्स्फुत सहभाग घेतला. यावेळी खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधिर सावरकर, आमदार हरिष पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार नितीन देशमुख, आमदार अमोल मिटकरी, जिल्हाधिकारी अजित कुंभार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकाऱ्यांनी शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके देऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांना पोषण आहारात गोड पदार्थांचेही वितरण करण्यात आले. विदर्भातील शाळा २३ त्रो २८ जूनदरम्यान सकाळच्या सत्रात म्हणजे सकाळी ७ त्रो ११:४५ यावेळेत भरवण्यात येत असून ३० जून पासून शाळा नियमित वेळेनुसार सुरू होतील, अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली.

प्रवेशोत्सव दिंडी

शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात जिल्ह्यातील शाळांमध्ये विविध रंगी फुगे, फुलांनी सजावट करण्यात आली होती. यावेळी प्रवेश दिंडी काढत विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

हिंदी सक्तीला मनसेचा विरोध!

जिल्हा परिषद गेटसमोर पुस्तकांची केली होळी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २३ : राज्य शासनाने इयत्ता पहिलीपासून तिसऱ्या भाषेच्या स्वरूपात हिंदी सक्तीने लागू करण्याचा घेतलेला निर्णय आता वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या धोरणाला जोरदार विरोध केला असून, अकोल्यात याचा प्रचंड रोष व्यक्त करत जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वारासमोर थेट हिंदी पुस्तकांची होळी करून सरकारचा निषेध नोंदवण्यात आला.

या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना पत्र लिहून हिंदी भाषा थोपवण्यास विरोध दर्शवला आहे. अकोल्यात जिल्हा परिषदेच्या शालेय शिक्षण विभागाकडून अद्याप कोणतेही स्पष्ट निर्देश न देता काही खासगी विनाअनुदानित शाळा विद्यार्थ्यांवर हिंदी पुस्तके घेण्याची सक्ती करत असल्याचे निदर्शनास आल्याने, मनसे पदाधिकारी शिक्षणाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी गेले. मात्र, ते अनुपस्थित असल्याने संतप्त मनसेच्या कार्यकर्त्यांनी कार्यालयातच ठिय्या आंदोलन सुरू केले.

दरम्यान, जिल्हा परिषद प्रवेशद्वारासमोर मनसे कार्यकर्त्यांनी हिंदी पुस्तकांची होळी करत निषेध नोंदवला. हे आंदोलन जिल्हाध्यक्ष पंकज साबळे, उपजिल्हाध्यक्ष सतीश फाले, शहराध्यक्ष सौरभ भगत, मनविसे जिल्हाध्यक्ष रणजित राठोड यांच्या नेतृत्वात झाले. त्यांना तालुका अध्यक्ष विजय बोचरे, उपशहराध्यक्ष मुकेश धोंडफळे, राजेश राठी, अमोल भेंडारकर, सतीश खाकरे, हर्षल अंभोरे, प्रदीप आखरे, शेखर स्वर्गीव, अजय सरकटे, नारायण मेहरे, सम्यक सावळे यांचा सक्रिय पाठिंबा लाभला.महाराष्ट्रात हिंदी लादली जाणार नाही, आमचा विरोध सुरूच राहील, असा इशारा मनसे पदाधिकाऱ्यांनी यावेळी दिला.

शाळेचा पहिला दिवस उत्साहात

सिनगाव जहाँगीर येथे शाळा प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा; शिक्षणमंत्री ना.दादाजी भुसे यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२३

जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील सिनगाव जहाँगीर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सोमवारी 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. यावेळी शाळेचा पहिला दिवस खास बनवण्यासाठी विद्यार्थ्यांचे डफडे, ढोलताशाच्या गजरात वाजतगाजत स्वागत करण्यात आले. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

दरम्यान, गावातून विद्यार्थ्यांची पारंपरिक बैलगाडी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीनंतर शाळेच्या सत्राचे उद्घाटन शालेय शिक्षणमंत्री ना. दादाजी भुसे यांच्या हस्ते शाळेची घंटा वाजवून व फीत कापून करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन प्रेमाने स्वागत केले. या प्रसंगी आमदार मनोज कायंदे, शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थ

मोठ्यासंख्येने उपस्थित होते. यावेळी परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण होते.

या प्रसंगी बोलताना शिक्षण मंत्री ना. दादाजी भुसे म्हणाले, ''राज्यातील सर्व विद्यार्थ्यांचे मी मनःपूर्वक स्वागत करतो. जिल्हा परिषदेच्या शाळांमधून गुणवंत विद्यार्थी घडत आहेत. पहिली ते बारावीत सुमारे दोन कोटी बारा लाख विद्यार्थी असून हा आपला परिवार आहे. त्यांच्या आरोग्याची काळजी शासनाला असून यापुढे प्रत्येक विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. गरज असल्यास राज्य शासन गंभीर विद्यार्थ्यांवर मुंबईतील रुग्णालयात उपचार करणार आहे.''

ते पुढे म्हणाले, ''आजची पिढी तंत्रज्ञान स्नेही आहे. आपल्याला तंत्रज्ञान व आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगाशी जुळवून घ्यायचं आहे. यासह विद्यार्थ्यांना शेतावर सहलीसाठी नेण्याची योजना आहे. राज्यातील प्रत्योक जिल्हा परिषद व नगरपालिकेतील शाळांमध्ये सुसज्ज भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. शिक्षणाची अत्याधुनिक साधने निर्माण करण्यावर शासनाचा भर असेल. त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्याला गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शासन कटिबद्ध असेल,'' असेही मंत्री ना. भुसे यांनी सांगितले.

पालकांना मोलाचा संदेश

''विद्यार्थ्यांच्या आईवडील, आजीआजोबांनी दररोज संध्याकाळी मुलांशी अर्धा तास गप्पा माराव‍ी. यामुळे त्यांच्या अडचणी समजतील व नातं घट्ट होईल. तसेच पालकांनी आपल्या पाल्याला बाजारातील व्यवहार, शेतीशी निगडित ज्ञान देणे गरजेचे आहे.''या शाळा प्रवेशोत्सवात इयत्ता पहिली मधील नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे फेटे बांधून स्वागत करण्यात आले. त्यामध्ये शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, गावकरी, पालक, माता पालक ढोल पथक सहभागी झाले होते.

यावेळी शालेय शिक्षण मंत्री ना. भुसे यांच्या हस्ते नव प्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत, दप्तर, गणवेश, बूट सॉक्स, कंपास, वही व पेन व गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

एक पेड मॉ के नाम

शाळा प्रवेशोत्सवात 'एक पेड मॉ के नाम' हा वृक्षारोपणाचा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी त्याांच्या आईच्या नावे वृक्ष लागवड केली. बुलढाणा जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान शिक्षणमंत्री ना. भुसे यांनी जिल्ह्यातील पांगरी येथील जिल्हा परिषद उच्च माध्यमिक शाळेला भेट दिली. या शाळेमध्ये 'फ्यूचरिस्टिक क्लासरुम' या उपक्रमाचे उद्घाटन केले. तसेच भिवगाव येथील जिल्हा परिषद शाळेला अचानक भेट देत तेथील परिस्थिती जाणून घेतली.

शाळा प्रवेशोत्सवानिमित्त धाडी येथे राबविण्यात आले विविध उपक्रम

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
नांदुरा दि.२३

शाळा प्रवेशोत्सवा निमित्त जि.प.म.प्रा. शाळा धाडी येथे दिनांक २३ जूनला विविध उपक्रम राबविण्यात आले.यामध्ये शाळा परीसर सजावट व प्रवेशोत्सव बॅनर लावण्यात आले. एक पेड मॉ के नाम या उपक्रमाअंतर्गत माता पालकांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. इ १ ली त दाखल विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. पहीले पाऊल उपक्रमाअंतर्गत इ १ ली त दाखल विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे घेण्यात आले.

यावेळी मुलांना पाठ्यपुस्तक, गणवेश, बुट व सॉक्सचे वाटप करण्यात आले.शालेय पोषण आहारात मिष्टान्न जेवण देण्यात आले. यावेळी शाळा समितीचे अध्यक्ष ईश्वर बाठे, प्रवीण बाठे, ज्ञानदेव अहिर ,भगवान अहिर, गणेश पाठक व अंकिता वाकोडे या पालकांचे विशेष सहकार्य लाभले.

जि.प.शाळेत वारकरी दिंडी काढून विद्यार्थ्यांचे केले स्वागत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.२३

खामगाव पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा ढोरपगाव येथे नविन सत्रामध्ये सोमवार दि.२३ जुलै २०२५ रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

शाळेत प्रवेश करताना विद्यार्थ्यांचे मिठाई व पुष्पगुच्छ देऊन, संपूर्ण शाळेत व शाळेच्या परिसराची साफसफाई, रंगरंगोटी करून, मोठ्या हर्षउल्लासामध्ये शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा केला.

त्याचप्रमाणे गावातून लेझीम खेळत रॅली काढण्यात आली. त्याचप्रमाणे विद्यार्थी वारकरी दिंडी काढून गावकऱ्यांचे मन मोहित केले. या प्रवेशोत्सवाला शाळेतील दुसरी आणि तिसरी च्या विद्यार्थ्यांना गणवेश,पाठ्यपुस्तक व बूट वितरण करण्यात आले. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत खमंग खिचडी आणि शिरा देऊन करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सवा करिता या विद्यार्थी वारकरी दिंडीचे कौतुक विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे संपूर्ण गावात करण्यात येत आहे.

कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक सर्व शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष आणि सर्व सदस्य तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शाळेच्या पहिल्या दिवशी; शिक्षकांनी दिले स्वखर्चाने गणवेश

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
डोणगाव दि.२३

डोणगाव येथून जवळच असलेल्या ग्राम लोणी गवळी येथील दे. भ. श्री हि. सो उर्फ बाबुराव पाटील विद्यालय येथे दि. २३ जुनला शाळेचा पहिला दिवस प्रवेशोत्सव म्हणून साजरा करण्यात आला यावेळी सर्व प्रथम वाजत गाजत विद्यार्थी यांना शाळेत आण्यात आले व त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्याला पुष्प गुच्छ व हार घालून संस्था अध्यक्ष भास्करराव पाटील व संचालक तसेच मुख्याध्यापक सुरेश हिवरकर यांनी स्वागत केले. त्यानंतर शालेय विद्यार्थी यांना मोफत शिक्षकांनी स्वखर्चाने विद्यार्थी यांना गणवेश व पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष भास्करराव पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून तंटामुक्त समिती लोणीगवळी चे अध्यक्ष मिलिंद अवचार. पोलीस पाटील पती प्रशांत पाटील संचालक संपतराव देशमुख रणजीत

पाटील मुख्याध्यापक सुरेश हिवरकर पर्यवेक्षक एम के चव्हाण नितीन पाटील सखाराम काळदाते तथा पालक वृंद होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक सुरेश हिवरकर तर मनोगत प्रशांत पाटील व संस्थाध्यक्ष भास्करराव पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमानंतर विद्यार्थी यांना खाऊ वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाला शालेय विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक उपस्थित होते. यावेळी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत मुख्याध्यापक सुरेश हिवरकर तंटामुक्ती अध्यक्ष मिलिंद अवचार व प्रशांत पाटील व नितीन पाटील यांच्या हस्ते वृक्ष लागवड करण्यात आली.

जि.प.मराठी प्रा.शाळेत प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
धामणगाव (गो) दि.२३

आज दिनांक २३ जून २०२५ सोमवारला शैक्षणिक सत्र २०२५ - २०२६ या नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात जि प मराठी उच्च प्राथमिक शाळा धामणगाव (गो) येथे ढोल ताशांच्या गजरात व लेझीम सह प्रभात फेरी काढण्यात आली, नवागतांचे स्वागत, वृक्षारोपण, शाळेचे पहिले पाऊल, मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत बूट व सॉक्स वाटप करून मोठ्या उत्साहात करण्यात आले.

नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर इयत्ता पहिली मध्ये दाखल विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व पेढा भरवून, शाळेचे पहिले पाऊल ठसे घेऊन स्वागत उत्साहात व दणक्यात करण्यात आले.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शाळा सुरू होण्याअगोदर गणवेश वाटप करण्यात आला होता. शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, मोफत बूट व सॉक्स वाटप करण्यात आले.सदर कार्यक्रमात विविध टेबल मांडून

विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास, शारीरिक विकास, सामाजिक व भावनात्मक विकास, गणनपूर्व तयारी बद्दल विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्यात आले.

या कार्यक्रमाला ग्रामपंचायत सरपंच पती विठ्ठल पाटील गोतमारे , उपसरपंच पती रामदास गोतमारे व ग्रामपंचायत सदस्य तसेच व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनिल क्षीरसागर, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर वेरुळकार, अंगणवाडी सेविका दुर्गा गोतमारे मॅडम , अंगणवाडी मदतनीस सिंधू वेरुळकार मॅडम , किशोर निकाळजे , शाळेच्या मदतीला तत्पर असणाऱ्या गायिका स्नेहल वानखडे ,शाळेचे मुख्याध्यापक सतिश जाने सर, सहाय्यक शिक्षिका विद्या जाने मॅडम व विद्यार्थी तथा गावकरी उपस्थित होते.

मेहकरमध्ये योग दिन उत्साहात साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मेहकर दि.२३

२१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन मेहकर नगरपालिकेत उत्साहात साजरा करण्यात आला. नगरपरिषद प्रांगणात आयोजित विशेष कार्यक्रमात नगरविकास, मुख्याधिकारी,ठाणेदार, गटविकास अधिकारी व सर्व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत योगाभ्यास व प्राणायामाचे सत्र पार पाडले.

या कार्यक्रमात विविध योगासनांची प्रात्यक्षिके देण्यात आली. योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली कर्मचाऱ्यांनी ताडासन, भुजंगासन, त्रिकोणासन, कपालभाती, अनुलोम-विलोम यांसारखी योगक्रिया केली. यावेळी शरीर व मन निरोगी ठेवण्यासाठी योगाचे महत्व अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांना टी शर्ट, योगा चटई व आरोग्याविषयक पुस्तिका वितरित करण्यात आल्या. योग दिनाच्या निमित्ताने पालिकेच्या वतीने नागरिकांनाही 'योग शिबीर' लवकरच आयोजित करण्यात येईल, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

चिमुकल्यांच्या अभुतपूर्व स्वागताने शाळेचा प्रवेशोत्सव धुमधडाक्यात साजरा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
दे.साकर्शा दि.२३

श्री सरस्वती विद्यालय व कनिष्ट महाविद्यालय दे.साकर्शा येथे आज दिनांक २३ जुन २०२५ रोज सोमवारला शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव आनंदाने साजरा करण्यात आला.

वर्ग ५ वी मध्ये आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रथमतः गुलाब पुष्प देउन त्यांचे वेलकम करण्यात आले. तसेच ईतर वर्गातील मुलांनी टाळ्या वाजवुन पाचवीच्या मुलांना वेलकम दिले. यावेळी वर्ग ५ ते ८ च्या मुलांना मान्यवरांच्या हस्ते पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले. नव्याने रुजु झालेले मुख्याध्यापक प्रा धामोडकर सर, गाडेकर सर, शिंदे

सर, मेटांगळे मॅडम, संतोषभाऊ मुरडकर यांचेही यावेळी स्वागत करण्यात आले. पाचपोर सर यांनी दरवर्षी प्रमाणे याही वर्षी एका गरीब आणि होतकरु विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारुन पुस्तक संच गणवेश,नोटबुक दहावीच्या विद्यार्थीनीला दिले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री सरस्वती शिक्षण समितीचे उपाध्यक्ष रतनशेठ दुगड हे होते. प्रमुख अतिथी देउळगांव साकर्शाचे पोलीस पाटील हे होते. प्रमुख उपस्थिती मध्ये संचालक गोपालभाऊ लाड, रितेशभाऊ दुगड आणि तंटामुक्त समिती अध्यक्ष सुरेशभाऊ आमले हे होते. पालक प्रतिनिधी म्हणुन मांडवा येथील प्रमोदभाऊ शिंदे हजर होते.

यावेळी प्राचार्य धामोडकर सर, प्रा मुंढे सर, धोटे मॅडम, पाचपोर सर, धिरज पाटील सर, गाडेकर सर, शिंदे सर, नगरनाईक सर, मेटांगळे मॅडम, यादव वानखडे सर, साळुबादादा, संतोषभाऊ आणि सुमित चव्हाण उपस्थित होते.

केंद्रीय मंत्र्यांनी केले बैलगाडीचे सारथ्य

विद्यार्थ्यांना आणले पहिल्या दिवशी शाळेत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२३

पहील्या दिवशी शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना बैलगाडीतून बसून त्यांच स्वतः स्वरर्थ करत केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी शाळेत आणलं शाळेत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देत त्यांचं स्वागत केलं

दोन महिन्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर विदर्भातील शाळेची पहिली घंटा आज २३ जूनला वाजली. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे स्वागत केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी मादणी येथील जिल्हा परिषद शाळेत जाऊन शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाला हजेरी लावली. विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केलं. गावातून प्रवेशोत्सव दंडी वाजत गाजत करण्यात आली. बैलगाडीतून विद्यार्थ्यांना घेऊन स्वतः केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव शाळेत गेले. झालेल्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात विद्यार्थ्यांना अद्यावत स्कूल बॅग आणि शालेय गणवेश विद्यार्थ्यांना देण्यात आले.

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकारातून बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेमध्ये शिकणाऱ्या जवळपास १७००० विद्यार्थ्यांना अद्यावत स्कूल बॅग वाटप करण्यात येणार आहे. त्याचा शुभारंभ आज जिल्हा परिषदेच्या मादणी शाळेपासून करण्यात आला. शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण व्हावी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुद्धा चांगल्या दर्जेदार शैक्षणिक साहित्या मिळावे हेतुने ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी या स्कूल बॅग वाटप करण्यात येत आहे.

शाळा हेच संस्कारांचे मंदिर - ॲड.शेळके

गणवेश-साहित्य वाटपाने शाळेची रंगत वाढली; शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
मोताळा दि.२३

नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होताच विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह, नव्या स्वप्नांची बीजं रोवली जात आहेत. याच पार्श्वभूमीवर जहांगिरपूर (ता. मोताळा) येथील जिल्हा परिषद उर्दू प्राथमिक शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहवर्धक स्वागत करण्यात आले. तसेच शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) प्रवक्ता ॲड.जयश्री शेळके यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व आवश्यक शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. लहानग्यांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद पाहून

उपस्थित मान्यवरांच्या चेहऱ्यावरही समाधानाचे हास्य झळकले. गावातील नागरिक, पालक, शिक्षक, आणि शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विद्यार्थ्यांच्या उत्साहात भर घातली.

जिल्हा परिषद उर्दु प्राथमिक शाळेला गावातील शेख सुपडू शेख आलम, फिरोज खान, युनूस खान, शेख अमीन, उस्मान शहा यांच्यावतीने स्वतःच्या मालकीची जागा शालेय उपयोगासाठी देण्यात आली. तसेच शेख रहिम, शेख सईद यांनी स्वखर्चाने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्या उपलब्ध करून दिले. त्याअनुषंगाने उपरोक्त सर्वांचा शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा येथे ॲड.जयश्री शेळके यांनी भेट देऊन शालेय साहित्या व खाऊ वाटप केले.

यावेळी कार्यक्रमाला गटशिक्षण अधिकारी धंदर , पंचायत समितीचे माजी उपसभापती युनूसशेठ, शिवसेना तालुकाप्रमुख विजय इंगळे, सरपंच प्रभाकर इंगळे, उपसरपंच जयचंद्र चोपडे, तंटामुक्ती अध्यक्ष रहिम ठेकेदार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शेख सईद, समाधान राऊत, ग्राम पंचायत सदस्य शेख खलिल ठेकेदार, जयंत चोपडे, रेखाताई इंगळे, विजय चव्हाण, शेख अन्वर, मौलाना युसुफ, केंद्र प्रमुख नंदिनी पवार, जि.प.उर्दू प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जुनेद , सहाय्यक शिक्षक नसीम, जि.प.मराठी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र वाघ, सहाय्यक शिक्षक सुनिल वाघ यांची उपस्थिती होती.

थोडक्यात

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी बलिदान दिनानिमित्त विविध कार्यक्रम

वाशिम : भारतीय जनसंघाचे संस्थापक आणि एक राष्ट्र, एक विधान, एक प्रधान या घोषणेमुळे अखंड भारताच्या संकल्पनेत आपले जीवन अर्पण करणारे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांच्या पुण्यतिथीनिमित्त भारतीय जनता पार्टी, वाशिम शहराच्या वतीने २३ जून रोजी विविध ठिकाणी सन्मानपूर्वक कार्यक्रम पार पडले. कार्यक्रमाचे आयोजन आमदार श्याम खोडे व भारतीय जनता पार्टी वाशिम जिल्हा पुरुषोत्तम चितलांगे यांच्या मार्गदर्शनात व शहर अध्यक्ष मनिष घनश्याम मंत्री यांच्या नेतृत्वात संपन्न झाले. आमदार श्यामभाऊ खोडे यांनी आपल्या भाषणात म्हटले, ''डॉ. मुखर्जी यांचे जीवन हे राष्ट्रासाठी समर्पणाचे प्रतीक आहे. त्यांच्या विचारांवर चालत भाजप आज देशभरात सेवा, सुशासन आणि विकासाचे कार्य करत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाजपा वाशिम शहराचे सर्व पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, महिला मोर्चा, युवा मोर्चा, ओबीसी मोर्चा व अन्य आघाडीचे कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

मनभा येथील जि.प. शाळेत प्रवेशोत्सव साजरा

मनभा : जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक मराठी शाळा मनभा येथे सत्र विद्यार्थांचा प्रवेशोत्सव नाविन्यपूर्ण पद्धतीने साजरा करण्यात आला . प्रवेशोत्सव कार्यक्रमाच्या प्रसंगी कारंजा पंचायत समितीचे माजी सभापती प्रदीप देशमुख, सरपंच शितल माणिकराव देशमुख, उपसरपंच मुजीब शेख चांद भाई, व्यवस्थापन समितीअध्यक्ष पूजाताई शेंदुरकर, सदस्य विजुभाऊ ठोंबरे मुख्याध्यापक नंदकिशोर भोयर, नितीन केळकर, सचिन घुले उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. राखी जगताप संचालन व आभार कु. आशा काटे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंगणवाडी सेविका रेखा गासे ,मदतनीस मीराताई सदाफळे ,अरुणाताई साखरकर रमेश नागापूरे, आशा नागापुरे यांनी सहकार्य केले.

माईंड्स आय इंग्लिश स्कूलमध्ये योग दिन उत्साहात साजरा

वाशिम : योग ही आपल्या संस्कृतीची अमूल्य देणगी असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्याचे अनमोल योगदान आहे. शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्थैर्य, एकाग्रता आणि सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त आहे. असे प्रतिपादन माईंड्स आय इंग्लिश स्कूलच्या संचालिका उषा मापारी यांनी केले. यावेळी मुख्याध्यापक चंद्रशेखर अय्यर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि शांतीमंत्राने झाली. त्यानंतर योगशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी विविध योगासने आणि प्राणायामाचे सादरीकरण केले. या प्रसंगी शिक्षक वृंदांमधून श्याम दवणे, अश्विनी राऊत, छाया नालेगावकर, माया दंडे, सुषमा ठाकरे, दिपाली हजारे, रजनी ठाकरे, पूजा शेळके, ज्ञानेश्वर इंगळे, वर्षा राठोड आदींची उपस्थिती लाभली.

जि.प. शाळेने राबविली शिक्षणाचे पहिले पाऊल संकल्पना

मंगरुळपीर : जि.प. चिखली शाळेत प्रवेशोत्सव साजरा करुन शिक्षणाचे पहिले पाऊल ही संकल्पना राबवुन नविन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. कृतिशील शिक्षक कु भारती दुबळे यांनी हा क्षण उत्सवासारखा साजरा केला. मुख्याध्यापक जयश्री बारड, निलेश तुळजापुरे,स्नेहदीप गोरे, रुपेश अंभोरे, भारती दुबळे यांची उपस्थिती होती.

सजविलेल्या बैलगाडीतून विद्यार्थ्यांची मिरवणूक

शाळेचा पहिला दिवस: जिजाऊ, सावित्री पूजनाने सत्राला प्रारंभ

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. २३ : जिह्यातील सर्व शाळांमध्ये २३ जून रोजी मोठ्या उत्साहात प्रवेशोत्सव सोहळा पार पडला. पहिली प्रवेश पात्र विद्यार्थ्यांची पारंपारिक पद्धतीने बैलगाडी मध्ये मिरवणूक काढून वाजत गाजत त्यांचे गुलाब पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले

यामध्ये शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांसह शिक्षक, कर्मचारी सहभागी झाले होते. जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत नवीन विद्यार्थ्यांची बैलगाडीने वाजत गाजत मिरवणूक काढली. या वेळी विद्यार्थ्यांना गणवेश शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

पहिलीतील विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ पेढे, गणवेश, पुस्तके खाऊचे वाटप करण्यात आले. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, सदस्य शिक्षकांची या वेळी उपस्थिती होती. मुलांनी फेरीदरम्यान हातात फलके घेऊन शैक्षणिकविषयी जनजागृती केली. उन्हाळी सुटीनंतर एकत्र आलेल्या मित्रांनी मनमोकळ्या गप्पा केल्या.

कोकलगाव येथील स्वामी विवेकानंद विद्यालया शाळेच्या प्रथम दिवशी जिजाऊ सावित्री पूजनाने नवीन शैक्षणिक सत्राची सुरुवात करून शाळेत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व पेन देऊन स्वागत उत्सव साजरा केला. सकाळीच गावातून विद्यार्थ्यांची रॅली काढून नारे देत नागरिकांचे

लक्ष वेधले शाळेत आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक योजने अंतर्गत विद्यार्थ्यांना वर्गवार पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले व सर्व शिक्षक बांधवांनी विद्यार्थ्यांना नवीन सत्राच्या शुभेच्छा दिल्या... वर्ग शिक्षकांनी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून त्यांचा परिचय करून घेत त्यांचा उत्साह वाढवत त्यांना बोलतं केलं. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब गोटे हे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे प्रमुख नारायणराव काळबांडे जुनियर कॉलेजचे जेष्ठ शिक्षक सदाशिव गलांडे ,संतोष सरोदे सर वैजनाथ हजारे, संस्थेचे सचिव रामभाऊ काळबांडे हे उपस्थित होते.

शाळेचा पहिला दिवस फक्त वह्या-पुस्तकांचा नसतो, तर तो नव्या स्वप्नांचा शुभारंभअसतो. मुलांनो, खेळा, हसा, शिका आणि उंच भरारी घ्या. शाळा म्हणजे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून ती संस्कारांची पाठशाळाही आहे. शिक्षक, पालक आणि अधिकारी यांनी समन्वयाने मुलांमध्ये विश्वास व स्वाभिमान रुजवायला हवा. बैलगाडीतून मिरवणूक काढणे म्हणजे शिक्षणाच्या प्रवासाला मातीचा गंध येतो. आणि त्या गंधातच खरी समृद्धी असते, अशा पद्धतीने विद्यार्थ्यांचे स्वागतब्म्हणजे एक वेगळीच शैक्षणिक आठवण विद्यार्थ्यांच्या मनात कोरली जाते.

ग्रामपंचायतच्या जागेत अतिक्रमण

अनसिंग : वाशिम जिल्ह्यातील सर्वात मोठे ग्रामपंचायत असलेल्या अनसिंग गावातील ग्रामपंचायतच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समधील काही दुकानदाराने अतिरेक करत ग्रामपंचायतच्या मालकीच्या जागेवर बेकायदेशीर अतिक्रमण केल्याचा प्रकार समोर आला आहे. संबंधित दुकानदाराने शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या भिंतीचा काही भाग तोडून अधिक जागेवर कब्जा मिळवला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेचे नुकसान झाले आहे.

या प्रकारामुळे गावात नाराजीचे वातावरण असून नागरिकांमध्ये .असंतोष पसरला आहे. स्थानिक प्रशासनाकडून या घटनेची दखल घेतली गेली असून, ग्रामसेवकांनी संबंधित दुकानदारास नोटीस बजावण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

ग्रामपंचायत सदस्य व स्थानिक नागरिकांनी याविरोधात ठाम भूमिका घेतली असून, अतिक्रमण तात्काळ हटवण्याची मागणी केली जात आहे.

ग्रामपंचायात च्या मालकीचे शॉपिग हे खाली करून सदर शॉपीग ला सील लावण्यात येईल. असे सचिव यांनी दिलेल्या नोटीस मध्ये नमुद केल्या गेले आहे.

हरणाच्या पिल्लाला जीवनदान

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

कारंजा, दि. २३ : तालुक्यातील बेंबळा शिवारामध्ये काही मोकाट कुत्र्यांनी एका हरणाच्या पिल्लाला घेरले व जखमी केले. यावेळी त्या मार्गाने जात असलेले सामाजिक कार्यकर्ते उत्तमभाऊ नागोलकर यांनी प्रसंगावधान राखून हरणाच्या पिल्लाला जीवनदान दिले.

कारंजा तालुक्यातील देवळा शेत शिवारामध्ये काही मोकाट कुत्रे एका हरणाच्या पिल्याचा पाठलाग करीत असल्याचे उत्तम नागुलकर यांच्या निदर्शनास आले. नागुलकर यांनी प्रसंगावधान राखत कुत्र्यांना हाकलून जखमी पिल्लाला सुरक्षित आपल्या ताब्यात घेतले. त्यानंतर हरणाच्या पिल्याचा रक्तस्त्राव थांबवण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला.

यानंतर सास कंट्रोल रूम कार्यालयाच्या माध्यमातून वनविभागाचे गोलू पुरोहित

यांच्यापर्यंत ही माहिती पोहोचवण्यात आली. वन विभागाच्या टीमने पुढील उपचारासाठी तातडीने मदतीचे नियोजन केले.

पहिल्याच पावसात नाली बांधकामाचा दर्जा उघड!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मानोरा, दि. २३ : पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या एकलारा गट ग्रामपंचायत मधील वाटोद येथील मुख्य रस्त्यावर नालीचे करण्यात आलेले बांधकाम शासनाचे निकष पूर्ण न करता झाल्याने पहिल्याच पावसात नालीचे बांधकाम पूर्ण जमीनदोस्त झाले. या कामाची चौकशी करावी यात दोषी आढणाऱ्या सचिव, सरपंच व बांधकाम अभियंता यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी संदीप ढाकुलकर यांनी गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

एकलारा गट ग्रामपंचायत अंतर्गत वाटोद येथील मुख्य रस्त्यावर सिमेंट काँक्रिट नालीचे सुरु असलेले बांधकाम शासकीय निकषानुसार होत नाही,

अशी तक्रार वेळोवेळी देवून चौकशीची मागणी केल्यावर सुद्धा कोणताच अधिकारी कामाकडे फिरकला नाही. उलट नालीचे पहिल्याच पावसात उखडलेले नाली बांधकाम करून मातीचा भरावा न टाकताच नालीचे पूर्ण देयक देण्यात आले असे त्यांनी तक्रारीत नमूद केले आहे.१६ जूनला आलेल्या पावसात सिमेंट नाली पूर्ण खचून गेली आहे. दिशादर्शक नकाशा व अंदाज पत्रक प्रमाणे कामाची चौकशी करण्यात यावी, चौकशी अंती यात दोषी सचिव, सरपंच व बांधकाम अभियंता यांचेवर कारवाई करण्यात यावी, असे निवेदन संदीप ढाकुलकर यांनी गटविकास अधिकारी यांना दिले आहे.

विद्यार्थ्यांचे औक्षण करून शैक्षणिक सत्राची सुरुवात

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. २३ :येथील विद्याभारती शाळेत भारतीय संस्कृती प्रमाणे प्रथम दिवसाची सुरुवात ही शुभ व्हावी यासाठी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना शाळेमध्ये प्रवेश देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी लेझीम पथकासमवेत प्रवेश दिंडी व प्रभात फेरी काढण्यात आली. सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजन करून मान्यवरांच्या हस्ते नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले आहे.

त्यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी, शाळेचे संचालक भीमराव गंगावणे, शाळेचे संचालक सुमित मिटकरी, मुख्याध्यापक नितेश मिटकरी व पर्यवेक्षक विजय गोटे यांच्या हस्ते पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकासोबत एक

सुंदर भेट वस्तू तसेच त्यांना शाळेच्या प्रथम दिवसाच्या शुभेच्छा देणारे शुभेच्छापत्र देण्यात आले. विद्यार्थ्यांना स्मरणात राहण्याकरिता शाळेच्या प्रांगणामध्ये सेल्फी पॉईंट देखील तयार करण्यात आला होता.

संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे यांनी विद्यार्थ्यांना येत्या शैक्षणिक वर्षाकरिता शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

पावसाची प्रतीक्षा: शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

मानोरा, दि. २३ : कृषी आधारित अर्थव्यवस्थेवर विसंबून असलेल्या तालुक्यातील शेतकऱ्यांकडून धडाक्याच्या पावसाची मागील काही दिवसांपासून वाट बघणे सुरू आहे.

कपाशी, सोयाबीन, तूर आणि भरड धान्याची पेरणी मुख्यत्वे तालुक्यात करण्यात येत असून ६० % पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी बहुमूल्य बियाणे धरती मातेच्या कुशीत पेरले आहे. ह्या बियाण्याला उगवण्यासाठी आवश्यक असलेल्या पावसाची आतुरतेने वाट पाहिली जात आहे.

जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यातील सात तारखेला मृग नक्षत्रात विदर्भात पावसाचे दरवर्षी शक्यतो आगमन होत असते. मात्र निसर्ग चक्रामध्ये मागील काही वर्षांपासून बदल होत असून जून महिन्याच्या आदल्या प्रखर ऊन तपणाऱ्या मे महिन्यामध्ये सुद्धा यावर्षी पावसाने तालुक्यात हजेरी लावली होती. राज्यातील सह्याद्री पर्वतरांगांनी व्यापलेल्या कोकणात व पश्चिम महाराष्ट्रात धो-धो पाऊस बरसत असताना विदर्भात मात्र पावसाचे माप रितेच असल्याने याचा मोठा फटका खरीप हंगामात पेरणी करून बसलेल्या शेतकऱ्यांना मागील दहा दिवसांपासून भोगावा लागत आहे. धडाक्याच्या पावसाची धरती माऊलीला अत्यंत गरज असून तातडीने पाऊस न पडल्यास पिकांच्या उगवण क्षमतेवर विपरीत परिणाम होऊन पीक वाढीला सुद्धा यामुळे ब्रेक लागलेले असल्याने धरती मातीत टाकलेली धान्य राशी जोमदारपणे उगवण्यासाठी बळीराजाचे डोळे आभाळाकडे लागलेले सगळीकडे दिसून येत आहे.

आभाळ दररोज दाटून येतो मात्र पाऊस धारा बरसत नसल्याने मानोरा तालुक्यातील सहाही मंडळातील शेतकऱ्यांच्या मनात आता चिंतेने घर करायला सुरुवात केली आहे. निसर्गाची कृपादृष्टी लवकर होऊन धो धो पाऊस बरसावा अशा प्रार्थना आता आभालवृद्धांकडून व्हायला लागलेल्या आहेत. पश्चिम महाराष्ट्र व कोकणात मुसळधार पाऊस पडण्याचा सतर्कतेचा इशारा शासनाकडून नागरिकांना देण्यात येत आहे. विदर्भात किमान पिकांना संजीवनी असा मध्यम पाऊस तरी पडावा. अशा आशा शेतकऱ्यांकडून व्यक्त केल्या जात आहे.

शालेय साहित्यासह कपड्यांचे 'गिफ्ट' बघून चिमुकले आनंदाने न्हाले!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

वाशिम, दि. २३ : हिंदवी परिवार, शिवछत्रपती तरुण मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी, २२ जून रोजी पालावरील मुलांना व महिलांना जीवनोपयोगी व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये महिलांना साड्या, पुरुषांना पॅन्ट-शर्ट, मुलांना शालेय साहित्य, वह्या, पुस्तके व कपडे यांचा समावेश होता.

जिथे सरकारची जबाबदारी संपते, तिथून सेवाभावी मनाची प्रेरणा सुरू होते. शिक्षणाच्या हक्कापासून वंचित असलेल्या तांडे, वस्ती, पालावर राहणाऱ्या मुलांच्या आयुष्यात शिक्षणाचा दीप पेटवणारे कार्य येथील महिला पोलीस कर्मचारी संगीता ढोले यांनी गेल्या कित्येक वर्षांपासून निष्ठेने सुरू ठेवले आहे. त्यांचे हे कार्य केवळ शिकवणे नसून, एका पिढीचा अंधार दूर करून जीवनदृष्टी देणारी अध्यात्मिक व सामाजिक सेवा ठरली आहे.

रेल्वे स्थानकाजवळील पालावर दररोज संगीता ढोले त्या मुलांना शिकवत असतात. कोणतीही अपेक्षा न ठेवता, आपली नोकरी सांभाळून त्या झोपड्यांमधल्या भवितव्यांना दिशा देत आहेत. त्यांच्या या कार्याचा सन्मान म्हणून शासन, प्रशासन आणि अनेक सामाजिक संस्थांनी त्यांना विविध पुरस्कारांनी गौरवले आहे. त्यांच्या कार्यात आपलाही खारीचा सहभाग असावा या उदात्त भावनेतून, हिंदवी परिवार, शिवछत्रपती तरुण मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पालावरील मुलांना व महिलांना जीवनोपयोगी व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी योगप्रशिक्षक डॉ. भगवंतराव वानखडे, दिलीप मेसरे, विलास आंबटपुरे, जय आंबटपुरे, राजु सहातोंडे, अजय भोयर, गजानन दहात्रे, संजय हेंबाडे, राजु सैबेवार, सुखदेव राजगुरु, शिंदे, राठोड, शुभांगी ठाकरे, गायत्री वाघमारे, खुशाल खडसे, सरोदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांच्या हस्ते संगीता ढोले यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. आपल्या मनोगतात डॉ. वानखडे म्हणाले, शासनाच्या योजनेपेक्षा समाजाच्या सजगतेने परिवर्तन घडते. संगीता ढोले यांच्यासारख्या लोकांनी दिलेलं शिक्षण हे फक्त ज्ञान न देता माणूस घडवते. त्यांनी समाजातील सर्व स्तरांतील व्यक्तींना आवाहन केले की, या पवित्र कार्यात आपणही पुढे येऊन खारीचा वाटा उचलावा आणि समाजसेवेच्या वाटेवर चालण्याचा प्रयत्न करावा. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय संगीता ढोले यांनी स्वतः केले. त्यांच्या डोळ्यांतील समाधान, मुलांच्या चेहऱ्यावरील हास्य आणि उपस्थित समाजसेवकांच्या ओठांवर उमटलेले कौतुकाचे शब्द हेच या उपक्रमाच्या यशाचे खरे मोल ठरले. ही एक सुरुवात आहे. संगिता ढोले यांच्या माध्यमातून पालावर शिक्षणाचा प्रकाश पसरत रहावा आणि समाजातील प्रत्येक पालावरचा दीप अखेरीस उजळलेल्या भवितव्याचा सूर्य ठरावा असे कौतुगोद्गार यावेळी उपस्थितांनी काढले.

अजिंक्य भारत
आपला जिल्हा
अकोला । मंगळवार, दि. २४ जून २०२५

थोडक्यात

अपघातग्रस्त कुटुंबांना भरीव आर्थिक मदत

जानोरी मेड : निंबा आंदोरा सर्कलमधील जानोरी मेळ या गावातील प्रकाश परघरमोर,संजय परघरमोर यांच्या राहत्या घरावरील संपूर्ण टीम पत्रे दिनांक १२ जून २०२५ ला वादळी वाऱ्यात उडून गेली होती त्यांचे कुटुंब उघड्यावर पडलेले होते. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीचे जि. प.सदस्य संजय बावणे यांच्याकडून त्यां पीडित कुटुंबीयांनाआज दिनांक २२ जून रोजी भरीव मदत करण्यात आली. पीडितांच्या घरातील संपूर्ण शालेय साहित्य अन्नधान्य टीव्ही फ्रीज पंखा इतर साहित्याचे नुकसान झाले होते. त्या साहित्याची पाहणी करून संजय बावणे यांनी भारतीय बौद्ध महासभेची धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे पूर्वनियोजन मीटिंग मीटिंग पारसला होती त्या निमित्ताने निघून जाण्यापूर्वी त्यांनी संपूर्ण कार्यकर्त्यांच्या मदतीने दिनांक २२ जून रोजी दोन्ही कुटुंबीयांची भेट घेऊन आस्थेने विचारपूस केली व पाहणी करून त्यांना भरीव मदत केली. त्यांच्या समवेत मोखा ग्रामपंचायत सरपंचपती श्रीहर्ष खरप,बाबाराव बागडे शांतशील तायडे, सहदेव भटकर,सुभाष तायडे,नितीन तसेच गावातील नागरिक सुरेश परघरमोर,सुखनंदन परघरमोर,निलेश परघरमोर ज्ञानदेव परघरमोर अमरदीप परघरमोर पत्रकार देवराव परघरमोर इत्यादी ची उपस्थिती होती.

रस्त्याची डागडुजी थातूरमातूर: अभियंता फिरकेना !

खेट्री चतारी डांबरी रस्त्यावरील प्रताप

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

पातुर, दि. २३ : प्रधान मंत्री ग्रामीण सडक योजने अंतर्गत पातूर तालुक्यातील सुकळी ते चतारी खेट्री चांगेफळ पिंपळखुटा या रस्त्याचे दोन वर्षांपूर्वी डांबरीकरण करण्यात आले होते.रस्त्याचे डांबरीकरण निकृष्ठ दर्जाचे केल्याने दोन वर्षातच रस्त्याची चाळणी आहे.नुकतेच रस्त्याचे थातुरमातुर डागडुजी करून पुन्हा देयक हडपण्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

दोन वर्षापूर्वी डांबरीकरण करता वेळी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांची मिलीभगत असल्याने रस्त्याच्या डांबरीकरणामध्ये मुरुमाऐवजी पिवळ्या मातीचा वापर केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता.त्यामुळे निकृष्ठ दर्जाचे डांबरीकरणाचे काम परिसरातील संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी अनेक वेळा काम बंद पाडले होते.त्यामुळे दोन वर्षापर्यंत काम रखडले होते.नंतर रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले,मात्र निकृष्ठ दर्जाचे काम केल्याने दोन वर्षातच रस्त्याची चाळणी झाल्याने डागडुजी करण्याची वेळ आली , नुकतेच चाळणी झालेल्या डांबरीकरण रस्त्याची डागडुजी दर्जेदार व्हावी अशी अपेक्षा ग्रामस्थांना होती.परंतु डागडुजी थातुरमातुर करून देयक हडपण्याचा प्रयत्न सुरु आहे.याकडे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन दर्जेदार डागडुजी करण्याची मागणी होत आहे.

शासनाच्या लाखो रुपयांची उधळपट्टी !

पातूर तालुक्यातील सुकळी ते पिंपळखुटा या रस्त्याच्या डांबरीकरण कामासाठी शासनाने सहा कोटी २४ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता. डांबरीकरण निकृष्ठ दर्जाचे केल्याने दोन वर्षातच रस्त्याची डागडुजी करण्याची वेळ आली असून,डागडुजी सुद्धा थातुरमातुर करून देयक हडपण्याचा प्रयत्न होत आहे.

अधिकारी व लोकप्रतिनिधी यांचे दुर्लक्ष

पातूर तालुक्यातील सुकळी पिंपळखुटा हे गाव जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर असल्याने संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधी फिरकत नसून, त्यांच्याकडून दुर्लक्ष होत आहे .त्यामुळे कंत्राटदार व संबंधित अभियंता यांची मिलीभगत असल्याने शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत आहे.

आपल्या हक्काच्या पिण्याच्या पाण्यासाठी उपोषण झाले यशस्वी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

दहीहांडा, दि. २३ : : परिसरातील गावांना योग्य प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याने शिवसेनेचे जिल्हा जिल्हा प्रमुख गोपाल दातकर व पंचायत समिती सदस्य गजानन वानखडे यांच्या नेतृत्वात दहीहांडा येथे आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते. शासनाने उपोषणाची दखल घेऊन पाणीपुरवठा तत्काळ व्यवस्थित करावा पाणीपुरवठा व्यवस्थित नसल्यामुळे जनतेमध्ये तिव्र नाराजी होती.

८४ खेडी योजनेतून पाणीपुरवठा असलेल्या दहीहांडा परिसरातील नागरिकांना तब्बल पंधरा दिवसातून एक वेळ पाणी मिळते. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी सातत्याने तारेवरची कसरत करावी लागते. नागरिकांना कोणाच्या घरी मरण असले लग्न असले अशा दिवशी पाण्याची सोय नसते अशा या भीषण पाणीटंचाईला शासन जबाबदार असल्याचा आरोप करीत प्रशासनाच्या विरोधात शिवसेनेचे नेते तथा शिवशेना जिल्हा प्रमुख गोपाल दातकर व पंचायत समिती सदस्य गजानन वानखडे यांच्या नेतृत्वात दहीहांडा या गावात आमरण उपोषण सुरू करण्यात आले होते.या उपोषणास आ. नितीन देशमूख यांनी भेट दिली तसेच उपोषणास दखल घेत जिल्हा अधिकारी गहाणकर यांच्या व कार्यकारी अभियंता म.जी. पा. विभाग अकोला यांच्या उपस्थितित उपोषणास मागणी लेखी स्वरूपात लिहून घेतले कि दहीहांडा गावला दररोज पाणीपुरवठा करण्यात येईल तसेच खानापूर, दहीहांडा येथील एक वार्ड २ गाव एका दिवशी पाणीपुरवठा करण्यात येईल आणि नागरिकांना पाचव्या ते सहाव्या दिवशी पाणी मिळेल असे लिहून घेऊन उपोषण सोडण्यात आले.

उपोषण कर्ते

जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, रामाभाऊ काकड, अनिल मोहरकर, विश्वास मापे रोहना, चंदू जामनेकर, गोपाल वावरे हिंगणी, चंदू शिंगाडे, श्रीकांत तिवारी रोहना, संतोष नेमाडे, अक्षय पांडे रोहना, अमित डवाले रोहना

शाळेचा पहिला दिवस उत्साहात

हिवरखेड : येथील जिल्हा परिषद महात्मा गांधी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात आज इयत्ता पाचवी ते आठवीच्या उर्दू व मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने नवीन विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन मनोभावे स्वागत करण्यात आले. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना शाळेच्या वतीने गणवेश, बूट, सॉक्स आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवला असून पालकांमध्येही समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

या प्रवेशोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून तेल्हारा पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अतहर परवेझ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सय्यद कमर अली होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष मोहम्मद शफाकत, शिक्षणप्रेमी किरण सेदानी, शाळेतील शिक्षकवृंद आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रवेशोत्सवानिमित्ताने गावातून काढण्यात आलेल्या प्रभात फेरीने सर्वांचे लक्ष वेधले. ''शाळेवर विश्वास ठेवा गुणवत्तेचे शिक्षण मिळवा'', ''शिक्षण हाच खरा वसा'' अशा घोषवाक्यांनी गावाचा प्रत्येक कोपरा निनादित झाला. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्ता, संस्कार, व पर्यावरणजागर अशा विविध विषयांवर प्रभावी घोषवाक्यांच्या माध्यमातून समाजात सकारात्मक संदेश दिला.या सोहळ्यात स्काऊट-गाईड चळवळीतील विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध सहभाग नोंदवून कार्यक्रमाच्या यशात मोलाची भर घातली. स्वागत समारंभाचे प्रभावी सूत्रसंचालन शिक्षक तुळशीदास खिरोडकार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. भालचंद्र विरघट यांनी केले.हा प्रवेशोत्सव केवळ स्वागताचा नव्हे तर विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी विद्यालयाने घेतलेला एक शैक्षणिक संकल्प आहे. ग्रामस्थांच्या सहभागामुळे शाळेतील सकारात्मक वातावरण अधिक बळकट झाले असून, ही शाळा केवळ शिक्षणाचे केंद्र न राहता समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन ठरत आहे.

वणी वारूळा : येथुन जवळच असलेल्या आलेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सन २०२५-२६या वर्षी साठी शाळा प्रवेशोत्सव म्हणून सर्व प्रथम विद्यार्थ्यांनी गावातुन प्रभात फेरी काढण्यात आली.व त्यानंतर शाळा प्रवेशोत्सवा निमित्त ग्रामपंचायत सदस्य पत्नी बबिता नितीन पळसपगार यांनी भेट दिली.भेटी प्रसंगी त्यांचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यास आले. तसेच जगदेव तेलगोटे, निलेश पागृत,आशा बाली पळसपगार, अंगणवाडी सेविका किरण धांडे , यांचे सुध्दा स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रिती मडावी ह्या होत्या. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती चे सर्व सदस्यांनी उपस्थिती दर्शवली.तसेच केंद्र प्रमुख बाबाराव बोरोकार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य म्हणून कंपास बॉक्स, डॉव्हिंग वही व कलर बॉक्स भेट देण्यात आले. तसेच शाळेच्या

पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांना मोफत पाठ्य पुस्तके ,मोफत गणवेश व बुट पायमोजे सुद्धा वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन मुख्याध्यापक अरुण फुलारी यांनी केले. तर आभार किरण तेलगोटे यांनी मानले यावेळी सर्व गावकरी उपस्थित राहून कार्यक्रम यस्वशीरित्या पार पाडला.

दहिगाव अवताडे: येथील जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा दहिगाव नविन वर्गाचे स्वागत कारण्यासाठी गावातून प्रवेश दिंडी काढून पहिल्या वर्गात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थीचे पुष्पगुच्य देऊन स्वागत करण्यात आले. तसेच पहिल्या वर्गात प्रवेश करणाऱ्या मुलांना गणवेश व पुस्तकांचे वाटप करण्यात आले त्या कार्यक्रमसाठी शाळेची रांगोळी, बलून,रेबिन लावून सजावट करण्यात आली होती त्या कार्यक्रमला शाळा वेवस्थापनसमिती अध्यक्ष गणेश सोलंके,पोलीस पाटील अरविंद अवताडे, सचिन तायडे,

मुख्याध्यापक ढोकने, अविनाश भारसाकडे, कोल्हे, भाकरे, म्हसाळ, वानखडे, घगाळ, भाकरे, संजय दाबेराव, मुगुटराव दाबेराव ,संजय चिकटे व पहिली वर्गातील विद्यार्थी उपस्थित होते.

कार्ला बु. शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही,शिक्षणाचे महत्त्व सर्वच महापुरुषांनी विषद केले आहे.कारण शिक्षणामुळेच समाजाला दिशा मिळू शकते आणि दशा बदलू शकते.

कार्ला बु येथील जि प व प्रा शाळा येथे शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे निमित्त सकाळी गावातून बोलकी प्रभात फेरी काढण्यात आली त्यानंतर इयत्ता पहिली

मध्ये दाखल विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले,माझे शाळेतील पहिले पाऊल म्हणून विद्यार्थ्यांच्या पायाचे ठसे घेण्यात आले, उपस्थित सर्वच मुलांना शालेय पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता पहिलीपासून महाराष्ट्र शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पॅटर्न सुरू केल्यामुळे पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसून आले कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष मच्छिंद्र अंभोरे, उपाध्यक्ष सुनिल मातोळे,, संतोष भराटे, मिलिंद सपकाळ, विनोद पोटे, राहुल बोदडे, ज्ञानेश्वर शेंगोकार पालक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभ्यासाचे ओझे न ठेवता प्रत्येक क्षेत्रात विद्यार्थ्यांनी निपूण राहावे : जिल्हाधिकारी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

बाळापूर, दि. २२ : २३ जुन २०२५ रोजी जिल्ह्यातील शाळा सुरू झाल्या असताना वाडेगाव येथील पि एम श्री आंतरराष्ट्रीय भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेमध्ये महाप्रवेशोत्सव या कार्यक्रमासाठी अकोला जिल्हाधिकारी अजित कुंभार. शिक्षण जिल्हा उपाधिकारी कैलास राठोड, राखी खोटरे, अकोला आगार क्र १ राज्य परिवहन मंडळ, सय्यद, नायब तहसीलदार बाळापुर, सरपंच मंगेश तायडे वाडेगाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

शाळा प्रवेश उत्सव मध्ये नव्याने पहिल्या वर्गातील विद्यार्थ्यांचे स्वागत केले व जिल्हा अधिकारी यांच्या गणवेश व पुस्तक वाटप हस्ते करण्यात आले शाळेची तपासणी करूण वर्ग २रा मधील विद्यार्थ्यासोबत हितगुज

केले यावेळी डिजिटल शाळेमधील संगणक कक्ष वाचनालय स्वच्छता पाहून जिल्हा अधिकारी साहेबांनी शाळेची व शिक्षक वृंदाची कौतुक केले प्रमुख पाहुण्याचे स्वागतासाठी ६ व्या वर्गातील मुलींनी गीत प्रदर्शन व लेझीम पथकाने मान्यवरांचे स्वागत केले. तद्वत पि एम श्री आंतरराष्ट्रीय जि प शाळे उन्हाळी प्रशिक्षणाच्या विद्यार्थ्यांनी मलखांब रोप मलखांब लाठीकाठी दंडपट्टा असे अनेक कलेचे प्रदर्शन जिल्हा अधिकारी व शाळेतील विद्यार्थ्यासमोर व नंतर प्रवेश उत्सव रॅलीला हिरवी झंडी दाखवून आणि ज्या रथामध्ये नव्याने प्रवेश केलेले विद्यार्थी बसलेले होते रथाची फित कापून गावामधून प्रभात फेरी काढण्यात आली या कार्यक्रमाला उपस्थित शिक्षण जिल्हा उप अधिकारी राठोड, सैयद साहेब नायब तहसिलदार बाळापूर तसेच महाराष्ट्र परिवाहन मंडळ अधिकारी राखी खोटरे यानी बाहेर गावच्या विद्यार्थिनींसाठी एसटी बसचे पास वाटप करुण मुलांमध्ये वस्तूचा निर्माण करून दिले व प्रमुख मार्गदर्शक म्हणून पीएमश्री आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद शाळेचे केंद्रप्रमुख माधव काळे तर उच्च श्रेणी मुख्याध्यापक समाधान सोर होते तर वाडेगावचे मंगेश तायडे उपस्थित होते . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळा समिती अध्यक्ष भाग्यश्री हिरळकर होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया सोळंके तर प्रास्ताविक डंबाळे यांनी केले तर सुरेंद्र कातखेडे यांनी आभार प्रदर्शन मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा समिती चे सर्व सदस्य व शाळेतील शिक्षक वृंदानी अथक परिसरात घेतले तसेच जि प उर्दू शाळा येथे प्रवेश उत्सव कार्यक्रम मोठ्या दिमाखाने साजरा करण्यात आला यावेळी भरपूर विद्यार्थ्यांनी शाळेमध्ये प्रवेश घेतला व सर्व नव्याने प्रवेश केलेल्याविद्यार्थ्यांचे बग्गी मध्ये बसून गावातून मिरवणूक काढण्यात आली यावेळी गावातून व परिसरातून जि प मराठीशाळेचा दर्जा वाढवण्याचे काम गावातिल नागरीक व शिक्षकाने केले.

जि. प. शाळेत प्रवेश घेतल्यास घरपट्टी पाणीपट्टी माफ

महागाव: ग्रामपंचायत कार्यालय कसुरा येथे जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतल्यास घरपट्टी पाणीपट्टी माफ करण्यात येणार असल्याचा ग्रामपंचायतने सर्वानुमते ठराव मंजूर केला.

सरपंच सीमा संतोष खंडारे, उपसरपंच जिजाबाई अविनाश ताथोड, निर्मलाबाई किसन ताथोड,,उषा उमेश कव्हर, चंद्रकलाबाई जगन्नाथ पहुरकर, दिलीप

गव्हाळे ,ऋषी ताथोड, आदींनी एकमताने ठराव मंजूर करण्यात आला जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा कसुरा येथे शाळेचा पहिला दिवस व प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी गावात प्रभात फेरी काढण्यात आली पालकांनी आपल्या पाल्याला जिल्हा परिषद मराठी शाळेत नाव दाखल केल्यास ग्रामपंचायत ने घेतलेल्या ठराव प्रमाणे त्या पालकास घरपट्टी व पाणीपट्टी माफ करण्यात येईल या ठरावाने गावात ग्रामपंचायतने सरपंच व उपसरपंच यांचे कौतुक केले जात आहे.

मंचनपूर जि. प.शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव सोहळा

अकोट : अकोट पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा मंचनपूर येथे नविन सत्रामध्ये आज सोमवार दि.२३ जुलै २०२५ रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

शाळेत प्रवेश करताना विद्यार्थ्यांचे मिठाई व पुष्पगुच्छ देऊन, संपूर्ण शाळेत व शाळेच्या परिसराची साफसफाई, रंगरंगोटी करून, मोठ्या हर्षउल्लासामध्ये शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा केला. गावातून रॅली काढण्यात आली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना गणवेश,पाठ्यपुस्तक व शूज व सॉक्सचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमाप्रसंगी

गावच्या सरपंच निर्मला चौधरी, उपसरपंच सुवर्णा चौधरी , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सौ.भारतीताई राहुल वानखडे, उपाध्यक्ष जयाताई निलेश वानखडे, तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक कळंबे , खडसे यांनी केले.

Classified
पाहिजेत
bigbasket शोधत आहे
पिकर्स आणि पॅकर्स
डिलेव्हरी एक्झिकेटीव्ह
स्थळ : अग्रसेन भवनासमोर, न्यू राधा कृष्ण प्लॉट, अकोला
संपर्क : अजीम खान - 7276424617
दरमहा रु. 30,000 पर्यंत कमवा
आकर्षक साप्ताहिक प्रोत्साहन
आता अर्ज करा आणि कमाई सुरु करा!
DN-673033

थोडक्यात

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या संदर्भात नियोजन बैठक

खामगाव : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मलकापुर शहर व तालुक्याचे वतीने होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकी च्या संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर यांच्या आदेशाने, जिल्हा सहसंपर्कप्रमुख दत्तात्रय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जिल्हाप्रमुख वसंतराव भोजने यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि. २५/०६/२५ रोजी सकाळी ११ वाजता मलकापूर येथील शासकीय विश्राम गृह येथे बैठक संपन्न होणार आहे. बुलडाणा जिल्हा परिषद, मलकापूर पंचायत समिती, तसेच मलकापूर नगर परिषद च्या ईच्छुक उमेदवारांनी, शिवसेना व सर्व अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी, शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवसेना तालुका विधानसभा संघटक राजेशसिंग राजपूत, तालुका प्रमुख दिपक चांभारे, शहरप्रमुख गजानन ठोसर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

शेगावात दोघांवर गुन्हा

शेगाव : इकबाल चौकात सुल्लक कारणावरुन दोघांनी आनंद व गजानन नटकुट या दोघांना मारहाण केल्याची घटना काल दुपारी घडली. शेगाव पोलिसांनी आनंद गोपाल नटकुट यांच्या फिर्यादवरुन तौक्कीरखान हमीदखान, शेख मुद्दसीर शेख गुलाम या दोघांविरुद्ध गुन्हा नोंदविला.

वैष्णवी चोपडेची एसबीआय क्लर्क परीक्षेत निवड

नांदुरा : येथील माळीपुरा भागात राहणाऱ्या कु. वैष्णवी प्रमिला नरेंद्र चोपडे हिची नुकत्याच झालेल्या एस. बी.आय. क्लर्क परीक्षेत निवड झाली आहे लहानपणापासून अभ्यासात हुशार असणाऱ्या वैष्णवीची सहाव्या वर्गात शेगाव येथील जवाहर नवोदय विद्यालयात निवड झाली होती तिथे सहावी ते बारावी पर्यंत तिचे शिक्षण झाले आणी बारावी नंतर बी एस सी ॲग्रीचे शिक्षण हे नांदेड़ला झाले आहे. कु. वैष्णवीच्या निवडीचे नांदुरा शहर व परिसरात सर्व स्तरातून कौतुक होत असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे प्रचंड मेहनत जिद्द आणि परिश्रमाच्या जोरावर तिने हे यश प्राप्त केले आहे तिच्या या यशासाठी तिचे हार्दीक अभिनंदन व पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा.

कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

वान	भाव
ज्वारी	१५४२ – २४००
गहू	२३०० – २४६०
तुर	५४०० – ६९००
हरभरा	५२०० – ५७००
सोयाबीन	३६५० – ४४५०
भुईमुग	३८७५ – ५८२५
उडीद	६३२५ – ६३२५
मक्का	१७५० – १७५०
मूंग	४५०० – ४९००
बाजरी	१८०० – १८००

अधिकाऱ्यांचे घोटाळ्यात ओले हात; भ्रष्टाचारात संचालकांना अनेकांची साथ !

आदर्श इंग्लिश स्कूलवर कारवाई होत नसल्याने शहरात चर्चा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि. २३

शहरातील बहुचर्चित आदर्श इंग्लिश स्कूलच्या संचालकांनी अनेक घोटाळे केले असल्याचे उघड होत आहे. दैनिक अजिंक्य भारत वृत्तपत्रातून अनेक घोटाळे उघडकीस आल्यानंतरही शिक्षणाधिकारी तसेच संबंधित अधिकारी आदर्श इंग्लिश स्कूलच्या अध्यक्ष, सचिव व मुख्याधापक यांचे विरोधात फौजदारी कारवाई करत नसल्याने अधिकाऱ्यांचेही हात तर ओले झाले नाहीत ना? अशा चर्चा शहरात जोरदार रंगत आहेत.

वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध होताच शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडवून दिदलेल्या आदर्श इंग्लिश स्कूलचा अध्यक्ष मागील सोमवारी म्हणजे दिनांक १६ जून रोजी बुलढाणा येथे जाऊन अनिल आकाळ शिक्षणाधिकारी माध्यमिक यांची भेट घेतल्याची माहिती मिळाली आहे. या भेटीची नेमके कारण काय याबाबत अनेक शंका उपस्थित करण्यास वाव मिळत आहे. आदर्श इंग्लिश स्कूलच्या घोटाळेबाज संचालकांनी जागा दाखवली एक आणि शाळा दुसऱ्या जागी यासह गट क्रमांक ५५/२ मध्ये शेती करून दुहेरी लाभ घेणे, पीक विमा, नुकसान भरपाई आदी शासकीय योजनांचा लाभ घेणे, प्रस्तावात खोटी माहिती सादर करणे असे अनेक घोटाळे केले आहेत. आणि हे

२१ डिसें. २०२३ अधिनियम नियम १२(ख) नुसार कारवाईचे आदेश देऊनही शाळेने कोणताही खुलासा गटशिक्षणाधिकारी यांना दिलेला नाही. शिक्षण विभागाने शाळेला नोटिस पाठवून आपली जबाबदारी टाळत आहे.

घोटाळे दैनिक अजिंक्य भारत वृत्तपत्रातून वारंवार उघडकिस आणले आहेत. विशेष म्हणजे शिक्षणाधिकारी यांनी चौकशी केली असता त्यांना पुरावे देण्यास तयार असल्याचे अजिंक्य भारतच्या माध्यमातून सांगण्यात येत आहे. तसेच तक्रारदार नरेश भारसाकळे यांनी सुद्धा तक्रारी सोबत सर्व पुरावे जोडले असल्याचे माहिती आहे. असे असताना शिक्षणाधिकारी माध्यमिक

संकटकाळी कोणाच्याही मदतीसाठी धावून जाणाऱ्या शहरातील काही प्रतिष्ठितांना शाळेच्या मान्यतेबाबत एका संचालकाने, अर्धवट माहिती देऊन शिक्षण अधिकाऱ्यांकडे शाळेबाबत शिफारस करण्यास सांगितले. परंतु, या अवैध शाळेबाबतची सत्यता समोर येताच, अध्यक्ष दिशाभूल करून त्या अवैध शाळेसाठी आपल्या नावांचा वापर करीत असल्याचे त्यांना समजले. त्यामुळे संतप्त प्रतिष्ठितांनी त्या संचालकांची चांगलीच कानउघाडणी केल्याचे समजते.

शाळेच्या परवानगी मिळालेल्या जागेवर शेती करणे, पिके घेणे, पीकविमा घेणे, नुकसान भरपाई घेणे. विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्कसुध्दा घेते. एव्हढी मोठी शासनाची फसवणूक होत असताना शिक्षणाधिकाऱ्याची अर्थपूर्ण चुप्पी का? अजूनही फसवणुकीचे गुन्हे का दाखल झाले नाहीत. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकारी, तसेच तहसीलदार यांनी वेगवेगळे गुन्हे दाखल करणे गरजेचे असल्याचे बोलल्या जात आहे.

यांनी या शाळेवर कारवाई करणे अपेक्षित होते. केवळ चौकशीच्या नावावर आरोपी आदर्श इंग्लिश स्कूलचे अध्यक्ष, सचिव व मुख्याध्यापकांसह इतर लोकांना कारवाई पासून दूर ठेवत असल्याचे दिसून येत आहे. सर्व पुरावे दिले असतानाही

गट नं ५५/२ मधील शाळा गेली चोरिला ?
* घाटपूरी रोडवरील आदर्श विद्यालयातील संचालकांचा प्रताप
* शाळेचा पत्ता दुसराच आणि शाळा भरविल्या जाते तिसऱ्याच ठिकाणी
* ५५/२ गटामधे शेती ; संचालक घेत आहेत दुहेरी लाभ,*शिक्षण विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष

ज्ञानपीठ स्कूलचा 'आदर्श' घोटाळा; पैसा केला गोळा..!
शिक्षण अधिकाऱ्याच्या चौकशी अहवालतही गट नं. ५५/२ मैदान म्हणून उल्लेख, अर्धवटराव म्हणे प्रश्नार्थक लावलेली बातमी खरी नाही

आदर्श ज्ञानपीठ व कॉलेज कागदोपत्री, भ्रष्टाचाराची चतुसूत्री..!
शाळा नुतनीकरण मान्यता आदेश पत्रातही घोळ
गटशिक्षण अधिकाऱ्यांचे शिफारस पत्र ५/०७/२०२३ तर त्यापुर्वीच २/०१/२०२३ ला मिळाली मान्यता
प्रस्ताव जाण्याआधिच तत्कालीन शिक्षण अधिकारी प्राथ.बी.आर.खरात यांनी दिली मान्यता

शिक्षणाधिकारी माध्यमिक अनिल आकाळ कारवाई का करत नाहीत? हे न उमगणारे कोडे बनले आहे. शिक्षणाधिकारी आकाळ यांना फोनवर विचारणा केली असता त्यांनी चौकशी सुरू असून चौकशी केल्यानंतर कारवाई करण्यात येईल असे सांगितले होते. मात्र आठवडा उलटुनही चौकशी करण्यास विलंब का लागतोय याबाबत त्यांनी उत्तर दिले नाही. उपशिक्षणाधिकारी वाघ चौकशीसाठी येणार असल्याचे माहिती मिळाली आहे परंतु शिक्षण विभाग कुठपर्यंत चौकशी करणार आणि कारवाई केव्हा करणार याबाबत मात्र संभ्रम कायम आहे.

जिल्हा परिषद, पंचायत समित्यांच्या प्रभाग रचनेबाबत प्रधान सचिवांकडून आढावा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२३

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्याा अधिनियम, १९६१ अंतर्गत व ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या आदेशानुसार बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा परिषदेसाठी ६१ निवडणूक विभाग व १२२ पंचायत समिती निर्वाचक गणांची प्रभाग रचना करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी शुक्रवारी २० जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात आढावा घेतला.

या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुहासिनी गोणेवार, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, प्रभारी तहसीलदार शशिकांत वाघ व निवडणूक विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

आढावा सभेत प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी ग्रामविकास विभागाच्या दि १२ जून २०२५ रोजीच्या आदेशानुसार प्रारूप प्रभाग रचना अधिसूचना दि. १४ जुलै २०२५ रोजी प्रसिद्ध करण्याचे व त्याावर दि. २१ जुलै २०२५ पर्यंत नागरिकांकडून हरकती व सूचना प्राप्त करण्याचे निर्देश दिले.यासंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी दि २८ जुलै २०२५ पर्यंत जिल्हाधिकारी यांनी प्राप्त हरकतींसह प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे सादर करावा. दि ११ ऑगस्ट २०२५ पर्यंत सुनावणी घेऊन अंतिम निर्णय द्यावा.दि १८ ऑगस्ट २०२५ पर्यंत अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्याचे निर्देश दिले.

या प्रक्रियेची अंमलबजावणी ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पारदर्शक व काटेकोरपणे करण्याबाबतही प्रधान सचिवांनी स्पष्ट निर्देश दिले.

छ.शिवाजी महाराज महाराजस्व शिबिरात विविध विभागांचे ४३४ लाभांचे वितरण

मंत्री आ. आकाश फुंडकर यांचे मार्गदर्शन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.२३

दि२३(उमाका)दि. २३ जून २०२५ रोजी तहसिल कार्यालय, खामगाव येथे स्थानिक राष्ट्रपिता महात्मा गांधी सभागृहात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. या शिबिराद्वारे एकाच छताखाली नागरिकांना विविध शासकीय योजनांचे लाभ प्रभावीपणे वितरित करण्यात आले. एकूण ४३४ लाभार्थ्यांना लाभ वितरण झाले असून, यामध्ये महसूल विभागाचे २४०, कृषी विभागाचे १७२, ग्रामविकास विभागाचे ४, महिला व बाल विकास विभागाचे ४, आरोग्य विभागाचे १०, वन विभागाचा १ आणि जिगाव सिंचन प्रकल्पाचे ३ लाभ समाविष्ट होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. ॲड. आकाश फुंडकर, कॅबिनेट

मंत्री (कामगार विभाग, महाराष्ट्र राज्य) यांनी भूषविले. आपल्या मनोगतात त्यांनी सांगितले की, ''प्रलंबित प्रकरणांवर कार्यवाही करून प्रशासकीय यंत्रणा गतीमान करणे हाच राज्य शासनाचा मानस आहे. शासकीय योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत, यासाठी अधिकाऱ्यांनी दक्षतेने काम करावे.''

व्यासपीठावर मार्गदर्शक उपविभागीय अधिकारी डॉ. रामेश्वर पुरी, अधीक्षक अभियंता जिगाव प्रकल्प श्रीराम हजारे, तहसिलदार सुनील पाटील, कार्यकारी अभियंते परमजीत सिंग जुनेजा, तुषार मेतकर व प्रवीण चावरे, उपविभागीय कृषी अधिकारी बाळासाहेब व्यवहारे, नायब तहसिलदार विजय पाटील, श्रीमती सोनाली भाजीभाकरे, अभिजीत जोशी व अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन नायब तहसिलदार निखिल पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन मंडळ अधिकारी देशमुख यांनी केले. या शिबिराच्या माध्यमातून 'शासन आपल्या दारी' ही संकल्पना साकारत, जनतेपर्यंत थेट सेवा पोहोचविण्याचे उत्कृष्ट उदाहरण खामगाव तहसिल प्रशासनाने उभे केले आहे.

माती परीक्षणाचे प्रात्यक्षिक पूर्ण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
जळगाव जा. दि.२३

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत ग्राम वडगांव (पाटण) येथे दि.१८ जून रोजी शेतकऱ्यांना माती परीक्षणाचे प्रात्याक्षीक करून दाखविले.

या मध्ये शेतकऱ्यांना माती परीक्षणा मुळे शेत जमिनीमधे कोणते घटक कमी आहेत व पुढे येणाऱ्या हंगामात त्या माती मध्ये कोणते पुरक असलेले घटक वापरने त्या नुसार खत शिफारस करने, अचूक खत निवडणे, माती परीक्षण अहवाला वरून जमिनीचा कस, सेंद्रिय कर्बाचे प्रमाण याच सोबत जमीन आम्लधर्मी, क्षारयुक्त किंवा चोपण आहे याचे निदान करता येते. एकंदरीत माती परीक्षणा वरून जमिनीची सुपीकता, उत्पादकता आणि आरोग्य समजते तसेच जमिनीमध्ये कोणते पीक चांगले व योग्य येऊ शकते हे मातीपरीक्षणा वरून कसे ओळखावे या बाबत प्रात्याक्षिका सह माहिती दिली. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य माननीय योगेश गवई सर, कार्यक्रम अधिकारी प्रा.प्रितेश वानखडे सर, विषयतज्ञ प्रा.समाधान काळे सर,प्रा.जिव्हेश साळी सर यांचे मार्गदर्शन लाभले, यांनी विदयार्थ्यांना माती परीक्षणा मध्ये योग्य पद्धतीने आणि माती नमुना गोळा करण्यासाठी विशेष मार्गदर्शन दिले. या मध्ये कृषीविद्यार्थिनी कोमल भोपळे, वैष्णवी राऊत, संजना बंड, निकीता ढोले, ज्ञानेश्वरी सपकाळ, शिवानी बोरोकार, आरती टापरे,प्राची तिजारे आदी विद्यार्थ्यीनींचा चा सहभाग होता.

चोरीच्या तीन दुचाक्या जप्त; दोघांना पकडले

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
खामगाव दि.२३

दुचाकी चोऱ्यांचे वाढते प्रमाण चिंताजनक बनले असून खामगाव शहर पोलिसांनी तीन गुन्ह्यांची उकल करत चोरीच्या तीन दुचाक्या जप्त केल्या आहेत. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे.

शहर पोलीस स्टेशनला दाखल दुचाकी चोरीच्या गुन्ह्याचा तपास करीत असतांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे डीबी पथकाने १९ जून २५ रोजी पवन भगवान बड़े (२६) रा. पातुर जि. अकोला व विश्वजीत प्रकाश सुरडकर (२४) रा. रीचोरा जहांगीर ता. मोताळा या दोघांना ताब्यात घेतले व त्यांच्याकडून दुचाकी क्र. एमएच -२८- बीई ४२१४ व एमएच-२८-व्ही- ३१९७ तसेच बुलढाणा शहर पोस्टेला दाखल गुन्ह्यातील दुचाकी क्र. एमएच २८-एएच ९२१४ अश्या एकुण ३ दुचाकी जप्त करून अटक केली. ही कारवाई शहर पोस्टे ठाणेदार रामकृष्ण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाचे एपीआय भागवत मळीक, पोहेकों प्रदीप मोठे, रविंद्र कन्नर, गणेश कोल्हे, अंकुश गुरुदेव, राहुल थास्कर, अमर ठाकुर या पथकाने केली.

पाहिजे तर मराठी : मनसेचे शाळांना पत्र!

हिंदी भाषा सक्तीच्या राजकारणाला बळी पडू नका – अमोल रिंढे पाटील

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी
बुलडाणा दि.२३

एकीकडे हिंदी भाषेची सक्ती केली जात असताना दुसरीकडे माय मराठीचा कैवार घेत मनसेने मराठीच्या संवर्धनासाठी शड्डू ठोकला आहे. राहील ती मराठीच... असा आक्रमक पवित्रा घेत मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मनसेने मुख्याध्यापकांना पत्र धाडले आहे. माय मराठीच संवर्धन ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. मुख्याध्यापकांनो, हिंदी भाषा सक्तीच्या राजकारणाला बळी पडू नका असे आवाहन अमोल रिंढे पाटील यांनी पत्रात केले असून त्यांचे मराठी

प्रेम व पत्र सध्या चर्चेत आहे.

महाराष्ट्रात हिंदी भाषा लादण्याच्या संदर्भात प्रचंड असंतोष आहे. मुलांवर भाषा लादण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, तो हाणून पाडला पाहिजे. यात मुलांचे नुकसान आहे. पण त्यासोबतच मराठी भाषेचे सर्वात जास्त नुकसान आहे म्हणून २३ जून रोजी तांदुळवाडी, कोलवड, नांद्राकोळी, सागवन येथील शाळांना भेटी देऊन त्यांनी पत्र दिले आहे. अमोल रिंढे पाटील यांनी मनसेच्या वतीने शाळांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, उद्या ती मुलं मोठी झाल्यावर त्यांच्या गरजेनुसार त्यांना हवी ती भाषा ते शिकू शकतात. पण आतापासून हे ओझे त्यांच्यावर कशाला? तुम्ही ठाम राहिलात आणि सरकारचे मनसुबे उधळून लावलात तर आम्ही तुमच्या मागे पहाडासारखे उभे राहू. पण तुम्ही स्वेच्छेने सरकारच्या छुप्या हेतूंना मदत करुन महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांवर असे ओझे लादणार असाल आणि अशी भाषा लादणार असाल, जी शिकली काय नाही शिकली काय फरक पडत नाही, तर मग माझे महाराष्ट्र सैनिक तुमच्याकडे चर्चेला येतील.

तालुक्यातील शाळा पिंजून काढणार

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मनसे पक्षाने कायमच आक्रमक भूमिका घेतली आहे. राज ठाकरे यांनी मुख्याध्यापकांना लिहिलेले पत्र घेऊन कार्यकर्ते शाळांमध्ये भेटी देत आहे. मुख्याध्यापकांशी चर्चा करून मराठी भाषेचे महत्व पटवून देत असल्याचे बुलढाणा मनसे तालुकाध्यक्ष अमोल रिंढे पाटील यांनी सांगितले. आगामी दहा दिवसांमध्ये तालुकातील सर्व शाळा पिंजून काढणार असून हिंदी सक्ती विरोधात मनसे जनजागृती करणार, ते मुलांचे नुकसान आहे. पण त्यासोबतच मराठी भाषेचे सर्वात जास्त नुकसान आहे. मग सक्ती कशासाठी? असा सवाल रिंढे यांनी केला आहे.

अजिंक्य भारत
आपलं अमरावती
मंगळवार, दि. २४ जून २०२५

थोडक्यात

अल्पवयीन युवती गर्भवती; युवकावर गुन्हा दाखल

धारणी : एका १७ वर्षीय युवतीला पळवून नेऊन तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवून तिला गर्भवती केल्याची घटना घडली. या प्रकरणी धारणी पोलीस ठाण्यात अनिल रतीलाल जांभेकर (२१) यांच्यावर विविध कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सविस्तर वृत्तानुसार पिडीत अल्पवयीन युवतीच्या नातेवाईकांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पीडिता व युवक हे एकमेकांचे परिचित आहेत. गेल्या वर्षी जुलै महिन्यात युवकाने पिडीत अल्पवयीन असल्याचे माहित असूनही तिला पळवून नेले. तेव्हापासून ते एकत्र राहत होते. तिच्यासोबत शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यामुळे ती गर्भवती राहिली. बाळंतपणासाठी तिला सरकारी दवाखान्यात नेले असता, ती केवळ १७वर्षांची असल्याचे निदर्शनास आले. याची माहिती आरोग्य सेविकेने धारणी पोलिसांना दिली. अधिक तपासात पीडितेस सिकलसेल आजार असल्याचेही स्पष्ट झाले असून पुढील उपचारासाठी तिला नागपूर येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे. पुढील तपास धारणी पोलीस करीत आहेत.

युवतीचा पाठलाग करीत विनयभंग

तिवसा : दोन वर्षांपूर्वी ओळख झालेल्या युवकाने युवतीला लग्नासाठी म्हटले असता, तिने नकार दिला, तेव्हापासून युवक तिला सतत त्रास देत असून पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तिवसा पोलीस ठाण्यात युवतीच्या तक्रारीवरून अनिरुद्ध सुभाष झटाले (२५) यांच्याविरुद्ध कलम ७४, ७८, ३५२, ३५१ (२) (३) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आली आहे.

दारू पिण्यास हटकणाऱ्या वडिलांना मुलाची मारहाण

चांदूर रेल्वे : रात्रीच्या वेळी दोन मुले मित्रासह घरी दारू पित होते. वडिलांनी त्यांना घरात दारू पिण्यास मनाई केली. त्यामुळे चिडलेल्या मुलाने शिविगाळ करीत लोखंडी सळाख वडिलांच्या डोक्यात घालून त्यांना जखमी केले. ही घटना चांदूर रेल्वे येथे घडली. याबबत वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी मुलाविरुद्ध गुन्हा दाखल केला

जळका जगताप येथे वृद्धाने केली एकाला मारहाण

कुऱ्हा : जळका जगताप येथे क्षुल्लक वादातून वृद्धाने सतीश मारोतराव बावणे (४०) याला काठीने मारहाण करीत जखमी केले. या प्रकरणी जखमी युवकाने कुऱ्हा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मारहाण करणारे साहेबराव उर्फ चाकुबुवा मेश्राम (६५) याच्याविरुद्ध ११८(२) कलमान्वये गुन्हा दाखल केला.

तरोडा येथे बकऱ्या चारण्यावरून वाद

मोर्शी : पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या तरोडा येथे शेतात बकऱ्या का सोडल्या या कारणावरून एकाने युवकासोबत वाद घालत त्याला काठीने मारहाण करीत जखमी केले. जखमी संतोष नामदेवराव कंठाळे (३५) यांनी दिलेल्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी पवन विश्वासराव भाकरे (४५) याच्याविरुद्ध ११८(१), ३५२ अंतर्गत गुन्हा नोंदवला.

घरगुती कारणावरून महिलेला मारहाण

शिरखेड : मुलाला दळण घेवून का पाठवले, असे विचारणे एका महिलेला महागात पडले. नातेवाईकांनी संगणमत करीत तिला थापडाबुक्क्यांनी व लोखंडी रॉडने मारहाण केली. ही घटना लाडकी येथे घडली. याबाबत महिलेने दिलेल्या तक्रारीवरून शिरखेड पोलिसांनी अस्लिम अलीमुराद शहा (३०) याच्यासह एका महिलेवर ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(३), ३(४) अंतर्गत गुन्हा दाखल केला.

■ राज्य अभ्यासक्रम आराखड्यात विद्यार्थ्यांचे चांगभले ■

अकरावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य!

अजिंक्य भारत | सुधीर केने

अमरावती, दि. २३ – नव्या शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणी भारतासह राज्यात सुरू झाली आहे. महाराष्ट्राने या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य अभ्यासक्रम आराखडा तयार केला आहे. त्यानुसार इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंर्त्य राहणार आहे. त्यामुळे जो विषय विद्यार्थ्यांना कठीण वाटेल तो सोडून त्यांना दुसरा विषय निवडता येणार आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने राज्य अभ्यासक्रमा आराखडा शालेय शिक्षण २०२४ चा मसुदा तयार केला आहे. हा मसुदा जाहीरही केला आहे हा मसुदा जनतेच्या प्रतिक्रियांसाठी खुला करण्यात आला होता तीन जून पर्यंत या मसुद्यावर समाजातील शिक्षक, पालक ,शिक्षण तज्ञ, शैक्षणिक प्रशासन यांनी आपले अभिप्राय नोंदवावे अशी आवाहन राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषदेने केले होते. त्यानुसार महाराष्ट्रात पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षणात अनेक बदल करण्यात येणार आहे. २०२८ – २९ पर्यंत बारावी पर्यंतचा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बदलणार आहे .इयत्ता अकरावी बारावी साठी दोन

भाषांचे शिक्षण अनिवार्य करण्यात आले आहे. व्यावसायिक शिक्षणांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता ,मशीन लर्निंग ,डाटा सायन्स ,कृषी इत्यादी नाविन्यपूर्ण विषय उपलब्ध होणार आहे. व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थी किमान कौशल्य तसेच व्यावसायिक ज्ञान संपादन करू शकेल अशा प्रकारचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे अकरावी बारावी मध्ये विद्यार्थी कला, वाणिज्य ,विज्ञान आणि व्यावसायिक शाखा निवडत असतात. जी शाखा निवडली त्याच शाखेचे विषय विद्यार्थ्यांना शिकणे अनिवार्य असते ,परंतु राज्य अभ्यासक्रम आराखड्यात यामध्ये सूट देण्यात आली आहे. कला, वाणिज्य, विज्ञान आणि व्यावसायिक या शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विषयाचे बंधन असणार नाही. विज्ञान शाखेचा विद्यार्थी वाणिज्य तसेच कला शाखेचे विषय निवडू शकेल .या नव्या बदलामुळे अनेक विद्यार्थ्यांना त्यांचा फायदा होणार आहे.

राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये शालेय शिक्षणात भारतीय ज्ञान प्रणाली, मूळ भारतीय प्राचीन ज्ञान, विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले जाणार आहे मूल्यांचे शिक्षण संविधानिक मूल्य ,मानवी मूल्य, नैतिक मूल्यांचे शिक्षण, स्वच्छता, सेवा ,अहिंसा , सहनशीलता या मूल्यांवर भर दिला जाणार आहे. शैक्षणिक तंत्रज्ञान, पर्यावरण शिक्षणावर नव्या आराखड्यामध्ये जास्तीत जास्त भर दिला जाणार आहे.

सांस्कृतिक परंपरा जोपासणार

राज्य अभ्यासक्रम आराखड्यामध्ये आनंददायी शिक्षणासाठी कलेचे महत्त्व अधोरेखित केले आहे .महाराष्ट्रातील पारंपारिक कलाप्रकार तसेच सांस्कृतिक वारसा असणाऱ्या कला यांचा कला शिक्षणात समावेश केला आहे. आपापल्या भागातील लोककलांचा समावेश करण्याची मुभा कला शिक्षणात दिली गेली आहे. कला निर्मितीत पर्यावरण पूरक साहित्य वापरणे व त्यातून पर्यावरण रक्षणाचा संदेश देणे असा प्रयत्न केला आहे.

जिल्ह्यातील सर्वच शाळा गजबजल्या

प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : उन्हाळी सुट्ट्या संपल्यानंतर आज सोमवार, २३ जूनपासून नवीन शैक्षणिक सत्र सुरू झाले आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या ६३ आणि जिल्हा परिषदेच्या दीड हजारावर शाळांसह शेकडो खासगी शाळांमध्ये किलबिल पहावयास मिळत आहे. शैक्षणिक सत्राच्या प्रार भाल शिक्षणाधिकाच्या सह शिक्षकांची शाळेत लगबग दिसून आली, हे विशेष. शाळेच्या पहिल्या दीप दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत साजरा करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. त्याअनुषंगाने सर्व शाळांनी विद्यार्थ्यांच्या स्वागताची शाळेत जोरदार तयारी केली होती.

शैक्षणिक सत्र २०२५-२६ ला आज सोमवारपासून प्रारंभकरण्यात आला आहे. शहरातील विविध शाळांना विविध उपक्रम राबविण्याच्या सूचना जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने दिल्या आहेत. शाळेच्या पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थ्यर्थ्यांचे स्वागत फुले देऊन करण्यात आले त्याचप्रमाणे गावांमध्ये प्रभाग फेरीदेखील काढण्यात आली. मुख्याध्यापकांनी शाळा व्यवस्थापन समितीच्या सभेचे आयोजन करणे, शाळा स्वच्छता करणे, पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे करावयाच्या आहेत. शैक्षणिक सत्राचा पहिला प्रथम दिवस म्हणून शालेय पोषण आहारात गोड पदार्थाचा ही समावेश करण्यात आला होता.

जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळा उत्साहात सुरू झाल्या आहेत. पहिल्यांदा पहिल्याच

उर्दू शाळेत जिल्हाधिकाऱ्यांची भेट

दिवशी विद्यार्थ्यांना शाळेतच गणवेश व पुस्तके वाटप करण्यात आले, वलगावच्या उर्दू जिल्हा परिषद शाळेत जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी भेट देत विद्यार्थ्यांचे स्वागत केले, यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दरवर्षी शाळा प्रवेशोत्सव हटके करण्यासाठी चर्चेत असलेल्या जिल्ह्यातील चांदूर रेल्वे गटसाधन केंद्र यांनी यावर्षी शाळेलाच गोकुलधाम बनविले असून विद्यार्थ्यांच्या स्वागताला चंपक चाचा, जेठालाल, पत्रकार पोपटलाल, दयाबेन, डॉ. हाथी, आत्माराम तुकाराम भिडे, रोशनसिंग

सोडी आदी कलाकारांनी हजेरी लावली यावेळी गटसाधन केंद्रातील कर्मचा?यांनी या सर्वच्या वेशभूषा साकारल्या त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एकच उत्साह संचारला असून सर्व गावच शाळेच्या प्रवेशोत्सवात रमले. विद्यार्थ्यर्थ्यांची सध्याची सर्वात आवडती मालिका असलेली तारक मेहताचा उलटा चष्मा याच मालिकेची थीम घेऊन तालुक्यातील पीएमश्री जीप प्राथमिक शाळा पळसखेड येथे शाळा प्रवेशोत्सव साजरा केला यावेळी या मालिकेतील विविध पात्र गटसाधन केंद्रातील साधन व्यक्ती, विशेष शिक्षक, समावेशित विशेष तज्ञ यांनी रंगविले. त्याच मालिकेतील सोडी यांच्या जीप्शीतून वर्ग पहिलीतील विद्यार्थ्यांना शाळेत आणले यावेळी संपूर्ण गावातून फेरी काटत विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

जिल्हाधिकाऱ्यांचे फेसबुक अकाऊंट हॅक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती दि.२३ : सोशल मीडिया वापरणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याचे पाहून सायबर भामटेही यावर सक्रीय झालेत. अनेकांचे फेसबुक प्रोफाईल हॅक करून त्यांच्या फ्रेंडलिस्टमधील मित्रांकडून पैस मागण्याचे प्रकार सर्रास घडताना दिसतात. अमरावतीचे नव्याने रुजू झालेले जिल्हाधिकारी आशिष येरेकर हॅकिंगपासून वाचू शकले नाहीत. अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे फेसबुक अकाऊंट हॅक झाल्याचा धक्कादायक प्रकार रविवारी (ता. २२) रात्रीच्या सुमारास समोर आला. नुकतेच आशिष येरेकर हे अमरावतीचे जिल्हाधिकारी म्हणून रुजू झाले. त्यांच्या नावाचे बनावट फेसबुक अकाउंटवरून फसवणूक करण्याचा प्रयत्न होत असल्याची बाब पुढे आली आहे.

काँग्रेसच्या अनुसूचित जाती

विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण मनोहर यांना जिल्हाधिकारी आशिष येरेकर नावाचे एक फेसबुक अकाउंट दिसले. ज्या अकाउंटवर जिहाधिकारी आशिष येरेकर यांचा त्यांच्या केबिनमधील फोटो होता. सोबतच आपल्या आई आणि लहानग्या बाळासह फोटो असल्याचे दिसले. तेव्हा त्यांना फ्रेंड रिवेस्ट पाठवण्यात आली. ती काही वेळाने स्वीकारण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी अमरावती जिल्ह्यात काम करीत असताना नवे मित्र करण्याच्या दृष्टीने हे अकाउंट तयार केले असावे, असे प्रवीण मनोहर यांना वाटले. जिल्हाधिकाऱ्यांनी आपली फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारल्याचा आनंदही झाला. त्यांना फेक फेसबुक अकाऊंट व हॅकरने केलेले मेसेज.

आशिष येरेकर यांच्या फेसबुक मेसेंजरवर एक मेसेज आला. ज्या मेसेजमध्ये जुजबी विचारपूस होती. नंतर मोबाईल नंबर मागितला आणि त्या अकाउंटवरून मेसेज आला की माझ्या संतोष कुमार नामक मित्राला मी आपला मोबाईल नंबर पाठविला आहे. तो एक माझा चांगला मित्र आहे, त्याचा आपल्या कॉल येईल, आपण त्यांच्याशी बोलून घ्या. हा मेसेज वाचून फसवणूक करण्याचा प्रकार असल्याचे प्रवीण मनोहर यांच्या लक्षात आले. त्यानंतर काही मिनिटातच संतोष कुमार यांचा प्रवीण मनोहर यांना कॉल आला. ज्या कॉलमध्ये संबंधित व्यक्तीने आपण संतोष कुमार असून मी सीआरपीएफ अधिकारी असून जिल्हाधिकारी आशिष येरेकर याचा खूप जवळचा मित्र असल्याचे सांगत माझी जम्मू काश्मीर येथे बदली झाली. माझे अत्यंत चांगल्या स्थितीत असलेले काही सामान विक्रीला असून ते तातडीने विकायचे आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी मला तुमचा नंबर दिला आहे, असे प्रवीण मनोहर यांना संतोष कुमार नावाच्या भामट्याने सांगितले. यामुळे जिल्हाधिकारी येरेकर यांचे फेसबुक अकाऊंट हॅक झाल्याचा संशय आला. कुणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून ही माहिती देत असल्याचे प्रवीण मनोहर यांनी नमस्कार अमरावतीशी बोलताना सांगितले. फेसबुक अकाउंट हॅक झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांचे सहाय्यक चेडे यांना माहिती दिली आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

खेड पिंपरी येथे ट्रॅक्टरची धडक

नांदगाव खंडेश्वर : तालुक्यातील मंगरूळ चव्हाळा पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या खेड पिंपरी येथील खरबी पुलाजवळ भरधाव ट्रॅक्टरने एकाजा धडक दिली. त्यात राजू खंडारे (५८, रा. पापड) हे जखमी झाले. याबाबत त्यांचा मुलगा आकाश राजू खंडारे याने मंगरूळ चव्हाळा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी ट्रॅक्टर चालक संजय रामकृष्ण सोळंके (३२, रा. पापड) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१, १२५ (ए) अन्वये गुन्हा दाखल केला.

शेतकरी, अपंग, विधवांच्या मागणीकरिता शिवसैनिक तहसील कार्यालयावर धडकले!

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

चांदुर बाजार, दि. २३ : तहसील कार्यालय येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने शिवसेना जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे, तालुका प्रमुख शैलेश पांडे, युवा सेना तालुका प्रमुख रोशन जयसिंगपूरे यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी, मे महिन्यात झालेल्या गारपीट व अवकाळी पावसामुळे संत्रा व कांदा पिकाची नुकसान भरपाई मिळण्याकरीता, संजय गांधी व श्रावण बाळ योजनेचे रखडलेले मानधन मिळण्याकरीता, दिव्यांग व विधवा लोकांना अन्तोदय (३५ किलो धाण्याचे) राशन कार्ड देण्याकरीता, यशवंतराव चव्हाण व शबरी आवास योजना मंजूर लाभार्थ्यांना घरकुल चा टप्पा वितरीत करण्याकरीता, लाडक्या बहिणीला २१०० रुपये कुठलेही निकष न लावता सरसगट देण्याकरीता या मागणी करीता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात

आले यावेळी तहसीलदार राम शेळके यांनी प्रत्येक मुद्यावर चर्चा करून आठ दिवसात तालुक्यातील प्रत्येक मंडळात कॅम्प लावणार असल्याचे यावेळी सांगितले व ज्या लोकांचे अगठे व डोळे स्कॅन होत नाही अशा लोकांची कागदपत्रे जिल्हाधिकारी यांना पाठवन्यात येईल, बाकी प्रश्न मिटिंग लावून निकाली काढू या आश्वासना नंतर शिवसेनेचे आंदोलन मागे घेण्यात आले यावेळी जिल्हा प्रमुख नरेंद्र पडोळे, उपजिल्हा प्रमुख आशिष वाटाने,महिला आघाडी उपजिल्हा प्रमुख निर्मलाताई कौढन्यपुरे, शिवसेना तालुका प्रमुख शैलेश पांडे, युवा सेना तालुका प्रमुख रोशन जयसिंगपूरे, शिवसेना शहर प्रमुख शुभम सपाटे, अनिल सायंदे, पवन राऊत, दादाराव तायडे, ऋषिकेश रडके, विक्रम फुकट,मंगेश सापधरे, देवेंद्र औतकर, मनीष राठी, शंकरराव भेटाळू,कुशल भेटाळू,सुरेश काकडे, संजय ठाकरे, आशिष शाह, पप्पू बावणे व मोठ्या प्रमाणात शिवसैनिक, महिला, शेतकरी, अपंग व विधवा महिला यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

नानोरी ग्रामपंचायतची नोटीस; मात्र देशी दारूचे दुकान सुरूच

अजिंक्य भारत | गजानन ढवळे

चांदुर बाजार, दि. २३ मोशी महामार्गांवर मौजा बोरज ग्रामपंचायत नानोरी अंतर्गत ग्रामपंचायत च्या विनपरवानगी देशी दारूचे दुकान थाटले या देशी दारूच्या दुकानामुळे स्थानिक प्लॉट धारक व नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली असून या संदर्भात तक्रारी वाढत होत आहे. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाने १९ जून रोजी देशी दारू दुकान संचलकाला दुकान बंद करण्याची नोटीस पाठवून येत्या ३दिवसात देशी दारू दुकान बंद करण्याबाबत सूचना देऊनही देशी दारू दुकान सुरूच आहे अन्यथा पाच दिवस

होऊनही या देशी दारू दुकानावर कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली नाही. नोटीस मध्ये नमूद केले आहे या संदर्भात नानोरी येथील ग्रामपंचायत मधील ग्रामविकास अधिकारी मिलिंद सोनार यांनी स्वतः स्पष्ट शब्दात सांगितले कि देशी दारू दुकानाला ग्रामपंचायत कडून कोणतीही ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही. तरी ही तातडीने चौकशी करून कठोर कार्यवाही करण्याचे आश्वसन त्यांनी दिले तरी स्थानिक प्लॉट धारक व ग्रामस्थ या देशी दुकानामुळे क्रीडा संकुल येथील येणारे जाणारे विद्यार्थी व आय टी आय कॉलेज व दौ. सी काळे विद्यालय येथील विद्यार्थी व ग्रामस्थ यांना व्यसन लागण्याची भीती व्यक्त केली आहे महिलांच्या सुरक्षेत धोका निर्माण कुटुंबात वाद तरूणामध्येव्यसनधिनाचे प्रमाण वाढण्याची भीती निर्माण होत आहे याची शक्यता नाकारता येत नाही या करिता ग्रामस्थ व विद्यार्थी या मध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

एजंटांना मोकळीक द्या, त्यांची कामे वाटून द्या!

कृषी विभागात बदली प्रक्रियेदरम्यान होतात अघोषित आदेश जारी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : कृषी विभागातील बदली प्रक्रिया म्हणजे एकप्रकारचा विवाह सोहळाच. नवीन सून घरी येणार म्हणून जसा वरपक्षकडील आनंदी आनंद त्याप्रमाणेच आपले खिसे भरणार म्हणून अधिकारी आनंदी. बदल्यांची लगीनघाईत प्रशासन अधिकारी वधू पित्याप्रमाणे वावरत असतात. अनेकांकडून गिफ्टचे पाकिटे मिळणार म्हणून ते सांभाळण्याची जबाबदारी आपल्या विश्वासू व्यक्तीवर निश्चित करण्यात येते. मिळणाऱ्या पाकिटात एक रुपयाचीही गडबड व्हायला नको. ज्याचा त्याचा हिस्सा त्यांच्या-त्यांच्यापर्यंत पोहोचायला पाहिजे. ही प्रक्रिया पूर्णत्वास जाईपर्यंत नेमलेल्या एजंटांना कामातून मोकळी द्या, त्यांची कामे वाटून घ्या. बदली प्रक्रियेदरम्यान विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयात निघत असलेले हे अघोषित आदेश. त्याची अंमलबजानीही तत्काळ करण्यात येते. तडकाफडकी असे काही टेबल बदलविले जातात की सर्वांनी तोंडात बोटेच घातली पाहिजे.

२०२२ मध्ये साधारण वर्षभरापासून विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील सहाय्यक प्रशासन अधिकाऱ्याचा टेबल एका महिला अधिकाऱ्याकडे देण्यात आला होता. तत्कालीन विभागीय कृषी सहसंचालक किसन मुळे यांनी त्या महिलेकडून सहाय्यक प्रशासन अधिकाऱ्यांचा चार्ज तडकाफडकी काढून आपल्या मर्जीतल्या एका तांत्रिक पदाचे काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्याकडे दिला आणि येथूनच कृषी विभागात एजंटची पदस्थापना सुरू झाल्याच्या चर्चेला पेव फुटले होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी एका महिला कर्मचाऱ्यांकडे दिल्यास लिमिटेशन येतात असा जावईशोध मुळे यांनी लावला होता. मात्र

शेतकऱ्यांचे मारेकरी : भाग ४

प्रा.हेमंत बुरंगे

तत्कालीन परिस्थितीत जिल्ह्याच्या पालकमंत्री यशोमती ठाकूर, जिल्हाधिकारी पदावर पवनीत कौर, अमरावती शहराच्या आमदार सुलभा खोडके, अमरावतीच्या खासदार नवनीत राणा, पोलीस आयुक्त आरती सिंह या प्रमुख पदावर महिलाच कार्यरत होत्या. मग सहाय्यक प्रशासन पदाचे काम एक महिला सांभाळत असतांना या अधिकाऱ्यांचे कोणते घोडे मारले होते. फारच फार तर त्यांना एखादा मदतनीस देता आला असता पूर्ण पदभार काढण्याची काहीच गरज नव्हती. बरं तो पदभार कार्यालयातील त्या पात्रतेच्या व्यक्तीकडे देणे अपेक्षित होते, पण तसे न करता एका कनिष्ठ कर्मचाऱ्याकडे देऊन मुळेंनी जेडीए कार्यालयाला आपली खाजगी कंपनीच करून टाकले होते. अपात्र व्यक्तीकडे नको तो पदभार दिल्यानंतर त्यात भाराभार चुका होनारच.

त्यामुळे त्यांना मदतनीस पुरविण्यात येत होते. तर काही एजंटचे काम हलके व्हावे म्हणून त्यांचा पूर्वीचा पदभारही इतर कर्मचाऱ्यांना वाटून देण्यात येत होता. शिपायाच्या पदोन्नतीने लिपिक झालेल्या एका कर्मचाऱ्याकडे भांडरपालाचा टेबल देण्यात आला. त्या कर्मचाऱ्याला संगणकीय ज्ञान नसल्यामुळे त्याला वरिष्ठ लिपिक महिला प्रतिनियुक्तीने मदतनीस म्हणून देण्यात आली. भांडारपालाचा टेबल जो १९९८ पासून एकच कर्मचारी सांभाळत असताना तो दोघात वाटून दिला. नेमलेल्या बनावट सहाय्यक प्रशासन अधिकाऱ्याकडेच विभागीय चौकशीचे काम देण्यात आले, मात्र जो हेतू डोळ्यासमोर ठेवून त्या कर्मचाऱ्याकडे सहाय्यक प्रशासनाचा कार्यभार देण्यात आला त्यात कुठेही बाधा पोहोचू नये यासाठी विभागीय चौकशीच्या टेबलाचे दोन तुकडे करून ते दोघांना वाटून दिले. जेडीए कार्यालयाला लागून असलेल्या अमरावती टीएओमधून काहीही कारण नसताना प्रतिनियुक्तीवर घेतलेल्या अनुरेखकास येथे बिनकामाचे टेबल देण्यात आले, त्यातही त्याचा भार हलका करण्यासाठी मदतनीस पुरविण्यात आला. एकीकडे कृषी विभागात कर्मचाऱ्यांचा वनवा असल्याचे सांगितल्या जात होते तर दुसरीकडे आपले मनसुबे पूर्ण करण्यासाठी एकाच टेबलवर दोन- दोन, तीन-तीन लोकं पेरण्यात अली होती. तत्कालीन प्रशासन अधिकारी हे वधू पित्याच्या आवेशतच वावरत होते.

प्रत्येकजण घेऊन येणाऱ्या गिफ्टवर त्यांची बारीक नजर होती. बाहेरून येणाऱ्या प्रत्यकाची जेडीएत आदर सत्कार होत होता. तोंडापाशी पाण्याचा ग्लास यायचा. आस्थेने विचारपूस व्हायची. तो बदली सोडून इतर कामासाठी आला असेल तर साहेब सुटीवर असल्याचे सांगितल्या जात होते.

आपण एका शासन व्यवस्थेत काम करतो आहे. मरणासन्न अवस्थेत आलेल्या कृषिविभागाची मोठी जबाबदारी आपल्यावर आहे. याचे भान विसरलेल्या आणि आपल्या अधिनिस्त कार्यालयाचा कारभार एका खाजगी कंपणीप्रमाणे चालवण्याची हिंम्मत तेव्हाच होते जेव्हा आपला कोणी गॉडफादर वर बसलेला असतो.

थोडक्यात

बांधकामावरून वाद; मारण्याची धमकी

अमरावती : यातील फिर्यादी व गुन्हा दाखल झालेली व्यक्ती एकमेकांचे शेजारी आहेत. फिर्यादीच्या घराच्या सुरू असलेल्या बांधकामावरून वाद घालत तिला अश्लिल शिविगाळ करीत मारण्याची धमकी दिली. ही घटना प्रबुद्ध नगर, वडाळी येथे घडली. याबाबत महिलेने फ्रेजरपुरा पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी शेजाऱ्याविरुद्ध २९६, ३५१ (२) कलमान्वये गुन्हा दाखल केला.

क्षुल्लक कारणावरून एकाला मारहाण

अमरावती : क्षुल्लक कारणावरून एकाने वाद घालत दुसऱ्याला मारहाण केली. शिविगाळ करीत दगड मारून फेकला. ही घटना सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयाच्या परिसरात घडली. याबाबत रशद अली शौकत अली (५६, रा. वडाळी) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी युवका विरुद्ध गाडगे नगर पोलिसांनी १२५, ११५ (२), २९६ अंतर्गत गुन्हा दाखल केला.

तडीपारावर मपोका अंतर्गत गुन्हा दाखल

अमरावती : खोलापुरी गेट पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीची शहानिशा करीत एका तडीपारावर आंनद नगर, गांधी आश्रम परिसरात फिरत असताना कारवाई केली. त्याच्यावर मपोका अंतर्गत गुन्हा दाखल केला. अभिजित उर्फ अरुण पार्टीकीर असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या तडीपाराचे नाव आहे.

साऊर येथे वरली मटक्यावर धाड

अमरावती : वलगाव पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या साऊर येथे पाण्याच्या टाकीजवळ सुरू असलेल्या वरली मटका जुगारावर पोलिसांनी धाड टाकली. त्यामध्ये राहुल मुकिंदराव रंगारी (३२) याला ताब्यात घेत त्याच्याजवळून रोख ८६० रुपये जप्त केले. या प्रकरणी जुगारन कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी जप्त केली २८० रुपयांची देशी दारू

अमरावती : वलगाव पोलिसांनी टाकरखेडा संभू येथे अवैध देशी दारू विक्रेत्यावर कारवाई करीत २८० रुपयांची दारू जप्त केक्रीत दारूबंदी कायद्यांतर्गत बाबुलाल गुंफाजी सोळंके (८०) याच्यावर गुन्हा दाखल केला.

युवकाची गळफास लावून आत्महत्या

अमरावती : शिरनाळा येथील मुस्लिम कब्रस्तानजवळ एकाने झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. जाकिरोद्दीन कमरोद्दीन (४५, रा. शिराळा) याने आत्महत्या केली. याबाबत वलगाव पोलिसांनी मर्ग दाखल केला.

विजेच्या धक्क्याने वृद्धाचा मृत्यू

अमरावती : सकाळी पाणी भरण्यासाठी मोटार लावण्यास गेलेल्या वृद्धाचा विजेचा धक्का लागल्याने मृत्यू झाला. ही घटना भातकुली पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या आसरा येथे घडली. अशोक अचिकराव धंदर (६०) असे प्रतकाचे नाव आहे. भातकुली पोलिसांनी मृतकाचा मुलगा मिलींद अशोकराव धंदर (३०) यांच्या तक्रारीवरून मर्ग दाखल केला. पुढील तपास भातकुली पोलीस करीत आहेत.

शहरातून दोन दुचाकी लंपास

अमरावती : शहरात दुचाकी चोरीचे सत्र सुरू आहे. फ्रेजरपुरा व नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून प्रत्येकी एकेक दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यांतर्गत संजीवनी कॉलनी येथे घरासमोर उभी केलेली दुचाकी (एमएच २७-एम ११४४) अज्ञाताने चोरून नेली.

अमरावतीसह ३० वैद्यकीय महाविद्यालयांना नोटीस

निकषांची पूर्तता न केल्याने कारवाईचा बडगा | प्रधान सचिव, डीएमईआर संचालकांना उपस्थित राहण्याचे आदेश

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) वैद्यकीय महाविद्यालयांमधील जागांच्या वार्षिक नूतनीकरणासाठी तपासणी केली असून त्यात राज्यातील ३० वैद्यकीय महाविद्यालयांनी निकषांची पूर्तता केली नसल्याच आढळल आहे. यामुळे या महाविद्यालयांना करणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. यामध्ये राज्यात नव्याने मान्यता मिळालेल्या अमरावतीसह १० महाविद्यालयांचा ही समावेश आहे. याबाबत महाविद्यालयांना पाठवलेल्या कारणे दाखवा नोटीसला समाधानकारक उत्तर न मिळाल्याने एनएमसीने थेट वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव आणि डीएमईआरच्या संचालकांना ही उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.

नव्यानेच सुरू झालेल्या १० पैकी ९ वैद्यकीय महाविद्यालयांचा समावेश. पुढे आलेल्या माहितीनुसार, एनएमसीचे पदवीपूर्व वैद्यकीय शिक्षण मंडळ (यूजीएमईबी) २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी एमएसएमईआर नियमन २०२३ नुसार वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या जागांचे वार्षिक नूतनीकरण करण्याची प्रक्रिया राबवित येते. या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये वैद्यकीय महाविद्यालयांनी सादर केलेले स्व-घोषणापत्र, आधार सक्षम बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीमधील प्राध्यापकांच्या

उपस्थितीचा डेटा, वैद्यकीय मापदंड आणि पायाभूत सुविधा यांची तपासणी करण्यात आली. या मूल्यांकनानंतर राज्यातील तब्बल ३० वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांची अपुरी संख्या, वैद्यकीय सोयी-सुविधा आणि पायाभूत सुविधांचा अभाव असल्याचे निर्दशनास आले. त्यामुळे वैद्यकीय महाविद्यालयांना कारणे दाखवा

या महाविद्यालयांना पाठविली नोटीस

गतवर्षी मान्यता मिळालेल्या १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांपैकी मुंबई, अंबरनाथ, अमरावती, हिगोली, वाशिम, गडचिरोली, जालना, बुलढाणा आणि भंडारा या नऊ संस्थांसह सोलापूरमधील डॉ. वैशंपायन मेमोरियल वैद्यकीय महाविद्यालय, बारामती, रत्नागिरी, अकोला, चंद्रपूर, गोंदिया, उस्मानाबाद, सातारा, अलिबाग, जळगाव, मिरज, नंदुरबार, परभणी, सिधुदुर्ग, नागपूरमधील इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळमधील श्री. वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूरमधील राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळ्यातील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुण्यातील आर्मड् फोर्स वैद्यकीय महाविद्यालय, नांदेडमधी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि मुंबई महानगरपालिकेचे शीव रुग्णालय यांचा समावेश आहे.

नोटीस पाठविण्यात आली.

प्रधान सचिव आणि संचालकांनाच थेट उपस्थित राहण्याचे आदेशनोटीसीवर वैद्यकीय महाविद्यालयांनी सादर केलेल्या अहवालाची तपासणी केल्यानंतर उत्तर असमाधानकार असल्याचे आढळून आले. तसेच सातत्याने या त्रुटी अढळत असून, त्या दूर करण्यासाठी संस्थांकडून कोणतेही प्रयत्न करण्यात आले नसल्याचेही निर्दशनास आले आहे. या वैद्यकीय महाविद्यालयांमधील सुविधांबाबत मूल्यांकनामध्ये प्रश्नचिन्ह निर्माण करण्यात आल्याने अखेर राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयागाने राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव आणि डीएमईआरच्या संचालकांनाच थेट उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.

एसआरपीएफ कॅम्प परिसरात बिबट शिरल्याने दहशत

आठ दिवसात दुसरी घटना, अधिकारी देतात केवळ सतर्क राहण्याचा इशारा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती, दि.२३ : एसआरपीएफ कॅम्प परिसरात शनिवारी मध्यरात्री बिबट शिरल्याने परिसरातील नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले असून रात्रीला गार्ड ड्युटी करणाऱ्या कर्मचाऱ्यात चांगलीच दहशत पसरली आहे. याबाबत वनविभागाच्या रेस्क्यू पथकाला माहिती मिळताच पथक घटनास्थळी पोहचले आणि रात्रीला एकटे फिरू नका, असा सल्ला देऊन निघून गेले.

येथील वडाळी वनपरिक्षेत्रालगतच एसआरपीएफचे कार्यालय व वसाहत आहे. ही बसाहत पाचशे क्वॉर्टर नावाने ते ओळखली जाते. तसेच एसआरपीएफ कॅम्पस मोर स्मशान भूमीलगत एसआरपीएफ कॅम्पची नवीन इमारत आहे. जिथे प्रशासकीय कार्यालये, हेड क्वॉर्टर, कवायती मैदान याच परिसरात आहे, कार्यालयामगे

वनपरिसर व त्यानंतर विद्यापीठ परिसर आहे. तसेच एसआरपीएफ कॅम्पच्या या परिसरात सकाळपासून तर रात्रीपर्यंत अधिकारी व कर्मचाऱ्यांची वर्दळ असते. हेड क्वॉर्टर असल्यामुळे २४ तास सशस्त्र कर्मचारी गार्ड ड्युटीवर तैनात राहतात. शनिवारी रात्री सुध्दा ई कंपनीच्या बाजूला असलेल्या प्रशासकीय इमारतीमध्ये एक चारची गार्ड ड्युटी तैनात होती. रात्री १२ नंतर ड्युटीवरील कर्मचारी रुममध्येअसताना भुंकण्याचा अचानक कुत्र्यांचा आवाज त्यांना आला. अचानक कुत्ये भुंकत असल्यामुळे एका कर्मचाऱ्याने खिडकीतून बाहेर पाहिले असता बिबट प्रशासकीय इमारतमध्ये येताना दिसला. बिबटला पाहताच त्यांनी सर्व कर्मचाऱ्यांना सांगितले. त्यामुळे कर्मचारी खिडकीतून पाहत होते. तेव्हा बिबट प्रशासकीय इमारतीमध्ये शिरला आणि पायऱ्याने वर चढला तसेच पूर्ण प्रशासकीय इमारातीमध्ये घिरट्या घालून रात्री १ वाजताच्या सुमारास तो निघून गेला.

त्यानंतर कर्मचाऱ्यांनी कार्यालयातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली. तेव्हा बिबट कार्यालय परिसरात फिरताना कॅमेऱ्यात टिपल्या गेला. तेव्हा लगेच संबंधित अधिकाऱ्याने वनविभागाच्या रेस्क्यू पथकाला ही माहिती दिली. माहिती मिळताच पथकातील कर्मचारी घटनास्थळी पोहचले आणि पूर्ण परिसराची पाहणी केली. रात्रीला एकटे फिरू नका, असा सल्ला देऊन निघून गेले. अशाच प्रकारची घटना आठ दिवसांपूर्वी तपोवन परिसरात राहणाऱ्या राठोड यांच्या घरी घडली होती.

जिल्हाधिकारी यांची मोर्शीत आढावा बैठक

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

मोर्शी, दि. २३ : गटविकास अधिकारी यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुल अद्यावत फोटोसह टॉपिंग याद्या तहसील कार्यालयात त्वरित सादर करून तहसीलदार यांनी घरकुल लाभार्थ्यांना तातडीने रॉयल्टी देऊन त्यांना एक ब्रास प्रमाणे वाळू उपलब्ध करून देण्यात यावी.घरकुल करिता रेती रॉयल्टी वाहतूक पास दिल्यानंतर त्यांच्या नोंदी घेणे व रेती उचल केल्यानंतर सदरच्या पास लाभार्थ्यांकडून परत घेण्याबाबत निर्देश देण्यात आले.घरकुल रॉयल्टीचा कोणत्याही परिस्थितीत गैरवापर होणार नाही याची ग्राम महसूल अधिकारी यांनी दक्षता घ्यावी.अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीबाबत सर्व ग्राम महसूल अधिकारी मंडळ अधिकारी यांनी पथक निहाय कार्यवाही करावी.गौण खनिज वाहतूक करणाऱ्या वाहनांची ॲप्सद्वारे

तपासणी करणे अवैध वाहतूक आढळून आल्यास तशा प्रकारचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

ग्रीस्टॅगचा गावनिहाय आढावा घेण्यात आला. गावनिहाय पी एम किसान लाभार्थी यांची नोंदणीबाबत आढावा घेण्यात आला. यामध्ये गावनिहाय नियोजन करून तीन कॅंडरमध्ये विभागणी करावी. तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांनी नियोजन करून कृषी सेवक,ग्रामसेवक व ग्राम महसूल अधिकारी यांनी शेतकऱ्यांपर्यंत पोहचून काम पूर्ण करून घेणे आवश्यक असल्याचे निर्देश देऊन सदर कामे ३० जून २०२५ पर्यत पूर्ण करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या.

संजय गांधी,श्रावण बाळ योजनेबाबत डीबीटी पोर्टल आढावा व प्रत्यक्ष पाहणी करून लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळण्याचे अनुषंगाने ३० जूनपर्यत पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले. नैसर्गिक आपत्ती विषयक घरपडझडचे अनुदान तातडीने वाटप करणे.तसेच शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामा करून यादी तयार करणे. सामायिक शेतीबाबत संमतीपत्र तिथेच घेणे याबाबत ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांना निर्देश देण्यात आले.

अनुदान वाटप करतांना पेंडिंग ई-केवायसी काम तातडीने पूर्ण करणे बाबत संवेदनशील होऊन काम करणे. त्याचप्रमाणे पुरवठा विभागामध्ये सुद्धा पेंडिंग इ केवायसी ३० जूनपर्यत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. मोर्शी येथील वननिसर्ग पर्यटन केंद्रास भेट देऊन पर्यटन केंद्राची माहिती जिल्हाधिकारी यांनी जाणून घेतली व त्यांच्या हस्ते त्या ठिकाणी वृक्षारोपण सुद्धा करण्यात आले. तदनंतर नगरपरिषद अंतर्गत डंपिंग डेपो येथील कचरा व्यवस्थापनबाबत भेट दिली.संपूर्ण कचरा व्यवस्थापन प्रक्रिया याबाबत माहिती घेण्यात आली व तेथे वृक्षारोपण करण्यात आले.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

नांदगांव पेठ, दि. २३ : शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या भांडे सर अकॅडमीचा अठरावा वर्धापन दिन संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन अमरावती येथे नुकताच पार पडला.यामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. 'गौरव गुणवंतांचा, सोहळा आनंदाचा' या संकल्पनेत पार पडलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. राजेश वानखडे होते तर प्रमुख अतिथी म्हणून राम मेघे अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बमनोटे आणि सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. खेरडे उपस्थित होते. यावेळी विचारपीठावर एकनाथ भांडे, महेंद्र वल्ली, शशांक वाट, विकी वगारे, अनुप मडगे आदी मान्यवर उपस्थित होते. या सोहळ्यात १७० पेक्षा अधिक गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे अकॅडमीच्या निकालात १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना ९० पर्सेटाइल पेक्षा अधिक गुण प्राप्त झाले आहेत.

यामध्ये सुजल बनसोडे या विद्यार्थ्याने केमिस्ट्री विषयात १०० टक्के गुण मिळवत राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. त्याचा एकूण पर्सेटाइल ९९.५२ आहे. आर्यन जयस्वाल याने सर्व विषयांत ९९% पेक्षा अधिक गुण मिळवून द्वितीय क्रमांक, शर्वरी साखरवडे हिने ९८.९०% गुणांसह तृतीय क्रमांक, तर संचित बलिंगे याने ९७.७८% गुण मिळवून चतुर्थ क्रमांक पटकावला. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल, श्रीफळ, प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संचालक आशिष भांडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली अकॅडमीच्या शिक्षक व कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

शहराला 'स्मार्ट सिटी' बनविण्यासाठी प्रयत्न करणार

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : शहराचे स्मार्ट सिटीमध्ये रूपांतर रूपां करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील. यासाठी प्रशासन आणि नागरिकांचा समन्वय साधून प्रमुख समस्यांचे निराकरण प्राधान्याने केले जाईल, अशी ग्वाही नवनियुक्त महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा (चांडक) यांनी शुक्रवारी (दि. २०) पत्रकारांशी संवाद साधताना दिली. गुरुवारी (दि. १९) उशिरा त्यांनी कार्यभार स्वीकारला. दुसऱ्या दिवशीच त्यांनी प्रशासनातील अधिकाऱ्यांसह शहरातील

मनपा आयुक्त सौम्या शर्मा; मुख्य समस्यांना प्राधान्य अडचणींवर चर्चा करून पुढील कार्यवाहीसाठी सज्ज असल्याचे स्पष्ट केले. मूळच्या दिल्लीच्या रहिवासी असलेल्या आयुक्त शर्मा यांनी स्पष्ट केले की,

शहरातील घाणीची समस्या, सफाई व्यवस्था आणि अतिक्रमण हे अतिशय गंभीर प्रश्न आहेत. यावर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने ठोस उपाययोजना करण्यात येतील, असे त्या म्हणाल्या. मनपा प्रशासन सध्या निष्क्रय असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. यावर आयुक्त सौम्या शर्मा म्हणाल्या, मी पदभार स्वीकारताच अधिकाऱ्यांशी शहराच्या समस्यांवर चर्चा केली असून, लवकरच सुधारणा होतील. 'जन्म-मृत्यू प्रमाणपत्रांसाठी दोन ते तीन महिने लागतात हे अतिशय

ठोस पावले उचलणार

स्वच्छता कंत्राटे राजकीय हस्तक्षेपामुळे कार्यक्षमपणे राबविली जात नसल्याचा आरोप वारंवार होत असतो. याबाबत त्यांनी सांगितले की, 'संपूर्ण माहिती घेतली जाईल आणि यामध्ये योग्य ती कारवाई करण्यात येईल. सामान्य नागरिक घरपट्टी भरत असले तरी मोठे मॉल, उद्योजक व उच्च करदाते कर चुकवतात, त्यांच्यावर ठोस वसुली मोहीम राबविली जाहला व असे सर्मा यांनी स्पष्ट केल.

त्रासदायक आहे. यावर उपाय म्हणून निश्चित 'टाईम लिमिट' ठरवली जाईल,' अशी ग्वाही त्यांनी दिली. सौम्या शर्मा यांचा अनुभव अमरावतीला फायदेशीर ठरणार असून, स्मार्ट सिटीची दिशा त्यांनी ठरवली आहे.

शहरातील दवा बाजारातील असुविधेमुळे विक्रेते त्रस्त

अमरावती - शहरातील रायली प्लॉट परिसरातील दवाबाजार हा संपूर्ण जिल्ह्यातील प्रमुख मेडिकल मार्केट म्हणून ओळखला जातो. येथे चार मजली इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणावर औषध विक्रीची थोक दुकाने आहेत. या मार्केटमध्ये अमरावती जिल्ह्यासह आजूबाजूच्या तालुक्यांतून अनेक किरकोळ विक्रेते दररोज खरेदीसाठी येत असतात. मात्र, येथे लिफ्ट सुरू नसल्यामुळे आणि पाऱ्यांवरून चढण्या उतरण्याच्या अडचणीमुळे किरकोळ विक्रेत्यांसह ग्राहकही हैराण झाले आहेत.

मतदान पर्यवेक्षक वसीम फरहत यांचा दिल्लीत सन्मान

अजिंक्य भारत |प्रतिनिधी

अमरावती, दि. २३ : बडनेरा ३७ विधानसभा मतदारसंघ भातकुली तहसील येथे कार्यरत मतदान पर्यवेक्षक अधिकारी श्री.वसीम फरहत यांचा राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षणात नवी दिल्लीतील भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था येथे सन्मान करण्यात आला.

भारत निवडणूक आयोगाच्या वतीने १२ व १३ जून रोजी महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ओडिशा या राज्यांतील निवडणूक अधिकाऱ्यांसाठी नवी दिल्लीत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.यात जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी,तहसीलदार, नायब तहसीलदार, पर्यवेक्षक आणि बीएलओ अधिकारी सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून एकूण १३२ अधिकारी या प्रशिक्षणात उपस्थित होते. या प्रशिक्षणात अमरावती जिल्ह्यातील बडनेरा ३७ विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना, वसीम फरहत यांनी मतदान प्रक्रिया अधिक सुलभ व प्रभावीपणे राबवण्याबाबत केंद्रस्तरीय मतदान अधिकारी यांना अद्यावत राहणे नितांत गरजेचे आहे, असे मनोगत

व्यक्त केले.

या प्रशिक्षणात अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री.सौरभ कटियार हे ही उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याचे सहायक मुख्य निवडणूक अधिकारी श्री.किरण शार्दुल यांच्या हस्ते वसीम फरहत यांचा गौरव करण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमात निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी मास्टर ट्रेनर म्हणून उपस्थित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विवेक जोशी, निवडणूक आयुक्त, भारत निवडणूक आयोग हे उपस्थित होते. वसीम फरहत यांनी आपले यशाचे श्रेय उपजिल्हाधिकारी जाधव साहेब, जिल्हा उप निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे साहेब, भातकुलीचे तहसीलदार डॉ.अजित कुमार येले, नायब तहसीलदार वाढोणकर व अशोककुमार कळीवकर यांना दिले.

दुर्गम भागातील अनेक गावांचा संपर्क तुटण्याचा धोका

मेळघाटात फिरत्या पथकाची चाकेच थांबली

देखभाल दुरूस्तीसाठी निधीची चणचण | गरोदर माता, कुपोषित बालकांच्या आरोग्याचा प्रश्न

अजिंक्य भारत | भारत वरठे

धारणी, दि. २३ : पावसाळ्यात मेळघाटातील दुर्गम भागातील अनेक गावांचा जिल्ह्याशी संपर्क तुटण्याचा धोका असतो. अशा परिस्थितीत त्या त्या गावांमध्ये आरोग्य यंत्रणा सक्षम असणे गरजेचे आहे. गावांचा संपर्क तुटला तर गावांमध्ये असलेल्या गरोदर माता, कुपोषणाच्या 'सॅम' श्रेणीत असलेल्या बालकांच्या आरोग्याची निगा राखण्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. मात्र, दुर्गम गावात आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक पुरेशी यंत्रणा उपलब्ध नसल्याचे वास्तव समोर आले आहे.

मेळघाटात ७ फिरती आरोग्य पथके आहेत. पण, त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेली वाहने ही एकाच ठिकाणी थांबून आहेत. या वाहनांचे टायर बदलण्यासाठी देखील आरोग्य विभागाकडे निधी नसल्याने आरोग्य कर्मचाऱ्यांवर ताण आहे. टायर बदलून घेण्यासाठी अकोला, मुंबई, पुणे येथील कार्यालयांवर विसंबून रहावे लागते.

देखभाल-दुरूस्तीसाठी निधी मिळत नसल्याने या फिरत्या

पथकांनी काम कसे करायचे, हा प्रश्न निर्माण झाला आहे. मेळघाटातील अनेक भागात अद्यापही रुग्णवाहिका, प्राथमिक आरोग्य केंद्रांचीउभारणी आणि पुरेशा प्रमाणात वैद्यकीय अधिकाऱ्यांची आणखी गरज आहे, असे राज्य सरकारला जिल्हा आरोग्य यंत्रणेने कळवले आहे, पण अजूनही पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ आणि साधन सुविधा उपलब्ध होऊ शकल्या नाहीत, असे सूत्रांनी सांगितले. गेल्या दहा वर्षांच्या आकडेवारीचा अभ्यास करून मेळघाटात 'मिशन-२८' राबविण्यात आले. यात भरारी पथकाने मोलाचे योगदान दिले.

त्यामुळे २०१३-१४ मध्ये ३३८ असणारा बालमृत्यू दर हा २०२४-२५ मध्ये १५६ वर आला आहे. तर दहा वर्षांपुवी असणारा माता मृत्यू दर हा ५ वर आणण्यात आरोग्य यंत्रणेला यश मिळाले आहे. महत्वाचे म्हणजे उपजत मृत्यू १३४ वरून ७९ वर आणण्यात आले आहे, असा दावा आरोग्य विभागाने केला आहे.

संस्थात्मक प्रसूतींची टक्केवारी वाढली आहे. नवसंजीवनी योजनेअंतर्गत धारणी तालुक्यात १२ आणि चिखलदरा तालुक्यात १० असे २२ भरारी पथके कार्यान्वित आहेत. मात्र फिरत्या पथकांकडे वाहनेच नसतील, तर कामे कशा पद्धतीने होतील, हा प्रश्न आता विचारला जात आहे.

पोलिस अधीक्षकांकडून कारवाईची अपेक्षा | **हप्तेखोरीमुळे अवैध धंद्याकडे होतेय जाणीवपूर्वक दुर्लक्ष** | **'एफडीए'चे गुटखा माफियांना पाठबळ**

बंदी असलेल्या गुटख्याची यवतमाळ शहरात विक्री

विशेष पथकांच्या कारवाईनंतर पुन्हा 'अर्थ'पूर्ण व्यवहार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

✦ गणेश खडसे

यवतमाळ, दि. २३ : राज्यात बंदी असलेला गुटखा यवतमाळशहरात खुलेआम विकला जात असून, यामागे पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाचेच (एफडीए) पाठबळ असल्याचा गंभीर आरोप होत आहे. नियमित हप्तेखोरीमुळेया अवैध धंद्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असून, आता जिल्ह्याचे नवनियुक्त पोलीस अधीक्षक कुमार चिंता यावर काय कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

गेल्या आठवड्यात काही कारवाया झाल्याने थांबलेला गुटख्याचा पुरवठा, गेल्या चार दिवसांपासून शहरात पुन्हा सुरू झाला आहे. शहरातील कोणत्याही पानटपरीवर सहजपणे गुटखा उपलब्ध होत आहे. पूर्वी कागदाच्या पुडीत लपवून विकला जाणारा गुटखा, आता खुलेआम विकला जात आहे, जणू काही त्यावर बंदीच नाही. यामागे अधिकारी आणि माफियांचे मोठे साटेलोटे असल्याची चर्चा आहे. 'तुम्ही पोलीस सांभाळा, आमची चिंता करू नका,' अशा सूचना 'एफडीए'चे काही अधिकारीच माफियांना देत असल्याचा धक्कादायक दावा केला जात आहे. या प्रकरणातील सर्वांत गंभीर बाब म्हणजे स्थानिक पोलिसांची भूमिका आहे. आतापर्यंत गुटख्यावर झालेल्या सर्व मोठ्या कारवाया या विशेष पथकांनी किंवा स्थानिक गुन्हे शाखेने केल्या आहेत. ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुटख्याची गोदामे सापडतात, त्या स्थानिक पोलिसांनी मात्र एकदाही कारवाई केल्याचे ऐकिवात नाही. यामुळे, स्थानिक पोलिसांना नियमित हप्ते मिळत असल्याच्या आरोपाला बळ मिळत आहे. वारंवार एकाच हद्दीत गुटखा सापडूनही संबंधित पोलिस अधिकाऱ्यांवर कोणतीही प्रशासकीय कारवाई होत नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. आता पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी या प्रकरणात लक्ष घालून हे रॅकेट उद्ध्वस्त करावे, अशी अपेक्षा जनतेकडून व्यक्त होत आहे.

'तुम्ही पोलीस सांभाळा, आम्ही बघतो'

या अवैध गुटखा व्यापारामागे एक नियोजनबद्ध साखळी कार्यरत असल्याचा आरोप आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासनातील काही अधिकाऱ्यांचे माफियांशी लागेबांधे आहेत. माफियाला स्थानिक पोलिसांना 'मॅनेज' करण्यास सांगितले जाते आणि 'एफडीए'च्या कारवाईची चिंता करू नका, असे आश्वासन दिले जाते. या नियमित 'अर्थ'पूर्ण व्यवहारामुळे आणि हप्तेखोरीमुळेच बंदी असूनही हा काळाबाजार बिनदिक्कतपणे सुरू असल्याचे म्हटले जात आहे.

स्थानिक पोलीस गप्प, विशेष पथकेच सक्रिय

गुटख्यावरील कारवाईत एक विचित्र प्रकार दिसून येतो. गुटख्याची मोठी गोदामे आणि साठा पकडण्याच्या सर्व मोठ्या कारवाया या नेहमीच विशेष पथके किंवा स्थानिक गुन्हे शाखेकडून केल्या जातात. मात्र, ज्या स्थानिक पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही गोदामे वर्षानुवर्षे चालतात, तेथील पोलीस यावर कधीच कारवाई करत नाहीत. यावरून, स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात हप्तेखोरी सुरू असल्याच्या आरोपाला पुष्टी मिळत आहे. तातडीने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

लोखंडी रॉडने युवकावर हल्ला

खंडाळा, दि. २३ : पैशाच्या वादातून एका १९ वर्षीय युवकावर लोखंडी रॉडने हल्ला करून त्याला जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी खंडाळा पोलिसांनी एकाच कुटुंबातील तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. अभिषेक नामदेव राठोड (वय १९) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बाळू श्रावण चव्हाण, अतुल बाळू चव्हाण आणि ज्ञानेश्वर बाळू चव्हाण यांनी पैशाच्या कारणावरून वाद घातला. आरोपींनी शिवीगाळ करत अभिषेकच्या डोक्यावर लोखंडी रॉडने मारून त्याला जखमी केले. तसेच, त्याला जीवे मारण्याची धमकीही दिली. या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू केला आहे. गेल्या काही दिवसांपासून पुसदसह, उमरखेड तालुक्यात शरीर दुखापतींच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

शाळांची किलबिल पुन्हा सुरू

विद्यार्थ्यांचा पहिला दिवस, कुठे रडणे, कुठे हसणे

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

आर्णी, दि. २३ : उन्हाळ्याच्या दीर्घ सुटीनंतर सोमवारी (दि. २३) राज्यभरातील शाळांची घंटा पुन्हा एकदा वाजली आणि शाळांचा परिसर मुलांच्या किलबिलाटाने गजबजून गेला. आर्णी येथील ईश्वर इंग्लिश मीडियम स्कूलमध्येही शाळेच्या पहिल्या दिवसाचा उत्साह दिसून आला. नवीन वर्गात जाताना काही चिमुकल्यांचे रडणे, तर जुन्या मित्रांना भेटल्याने काहींच्या चेहऱ्यावर हसू, असे संमिश्र वातावरण शाळेच्या आवारात होते.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला, अनेक पालक आपल्या पाल्यांना शाळेत सोडण्यासाठी आवर्जून आले होते. पहिल्यांदाच शाळेची पायरी चढणाऱ्या लहान मुलांच्या डोळ्यांत आई-बाबांना सोडताना पाणी तरळले होते, तर अनेक चिमुकले हमसून हमसून रडत होते. याउलट, सुटीनंतर आपल्या जुन्या मित्र-मैत्रिणींना भेटल्याने, मोठ्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर मात्र आनंद ओसंडून वाहत होता. नवीन पुस्तकांचा सुगंध, नवा गणवेश, नवे शिक्षक आणि नवा वर्ग या सगळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारला होता. शाळेच्या वतीनेही विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले आणि सर्वांनी मिळून शाळेचा पहिला दिवस मोठ्या आनंदात साजरा केला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढणार

वसंत घुईखेडकर यांचे प्रतिपादन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

नेर (परसोपंत), दि. २३ : येत्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगर परिषद निवडणुका नेर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्वबळावर लढवेल. आघाडीची शक्यता नसून, कार्यकर्त्यांना भावना लक्षात घेऊन हा निर्णय घेतल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्ता आढावा बैठकीत प्रदेश उपाध्यक्ष वसंत घुईखेडकर यांनी ही घोषणा केली. ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

तालुक्यात पक्षाची मोठी ताकद असून, सर्वांना सोबत घेऊन बेरजेचे राजकारण करावे लागेल. कार्यकर्त्यांनी 'गाव तिथे शाखा' यानुसार कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी माजी सभापती नाना भोकरे, विजयलाल जयस्वाल, प्राध्यापक मनोहर देशमुख, अरुण खडसे यांनीही आपले विचार मांडले. बैठकीला विवेक घुईखेडकर, बंडू सोळंके, सर्फराज खान, सय्यद इर्शाद यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सुनील खाडे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्राध्यापक अमोल घरडे यांनी आभार मानले.

घटना-घडामोडी

आशिष राजुरकर यांना राकाँमध्ये नवी जबाबदारी

मंगरुळ : नेर तालुक्यातील मांगलादेवी येथील सामाजिक कार्यकर्ते आशिष शरदराव राजुरकर यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे नवी जबाबदारी देण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या पक्षाच्या आढावा बैठकीत मान्यवरांच्याहस्ते त्यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचे पक्षात स्वागत करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नुकत्याच पार पडलेल्या आढावा बैठकीत ही निवड जाहीर करण्यात आली. डॉ. आनंदराव हजारे यांच्या शिफारशीने, वसंतराव घुईखेडकर यांच्याहस्ते आशिष राजुरकर यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुनील पाटील खाडे, कार्याध्यक्ष प्राध्यापक अमोल घरडे, राजू झिबलकार यांच्यासह पक्षाचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आशिष राजुरकर हे मांगलादेवी परिसरात सामाजिक कार्यात सक्रिय आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदा पक्षाला होईल आणि त्यांच्या नेतृत्वात या भागात पक्ष संघटना अधिक मजबूत होईल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला. या नियुक्तीबद्दल राजुरकर यांनी सर्वांचे आभार मानून, पक्ष वाढीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

श्रीराम टायपिंग इन्स्टिट्यूटतर्फे निरोप समारंभाचे आयोजन

यवतमाळ : येथील श्रीराम टायपिंग इन्स्टिट्यूटने आपल्या यशस्वी विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभ आणि गुणगौरव सोहळ्याचे आयोजन केले. रविवारी झालेल्या या कार्यक्रमात शासकीय नोकरीत निवड झालेल्या माजी विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांना सन्मानाने गौरविण्यात आले. शिवाजी नगरातील अभियंता भवनात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त लघुलेखक महेंद्र भागवत होते. यावेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेत सहाय्यक अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल नामाकृती पद्माकर घायवान हिचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच, जिल्हा टायपिंग असोसिएशनच्या कार्याध्यक्षपदी निवड झालेले नितीन वाघाडे व कोषाध्यक्षपदी निवड झालेले अनंत देशपांडे यांचाही गौरव झाला. कार्यक्रमात सुरेश देशकर, श्रीकांत आडे, किशोर जुननकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शासकीय नोकरीसोबतच व्यवसायाकडेही वळावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पद्माकर घायवान, तर आभार प्रदर्शन उत्कर्षा गुल्हाने यांनी केले. संस्थेचे प्राचार्य अनंत देशपांडे व नितीन वाघाडे यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

जागतिक योग दिन साजरा

नेर : येथील पाथ्रड (गोळे) येथील आयुष आरोग्यवर्धिनी आयुर्वेदिक

दवाखान्यात २१ जून रोजी जागतिक योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी प्रत्येकाने योग करावा, असे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले. 'जेथे योग वसे, तेथे रोग नसे', असे प्रतिपादन पोलिस पाटील प्रफुल नेरकर यांनी या कार्यक्रमात केले. कोरोना काळापासून वाढलेल्या आजारपणांवर मात करण्यासाठी योगाभ्यास आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहल भेंडे यांनी योगासनांचे महत्व आणि त्याचे फायदे उपस्थितांना समजावून सांगितले. यावेळी विविध आसने आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले, ज्यात नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमाला आशा वर्कर लता गजभिये, रोशन चोपडे, अतुल उडाखे यांच्यासह अनेक आरोग्य कर्मचारी, शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम राष्ट्रीय आयुष अभियानांतर्गत यशस्वीपणे राबविण्यात आला.

जिल्हा परिषद शाळेत योग दिन साजरा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

राळेगाव, दि. २३ : तालुक्यातील आपटी (रामपूर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी आणि शिक्षकांनी विविध योगासनांची प्रात्यक्षिके केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समिती अध्यक्ष सोनाली टोळे होत्या. प्रमुख अतिथी म्हणून पोलिस पाटील निलू पिंपरे, पत्रकार कविता धुर्वे उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका नगराळे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्व सांगितले, तर शिक्षिका चिकटे यांनी योगासने करून घेतली. या उपक्रमात गावातील पालक आणि महिलांनीही सहभाग नोंदविला. मुलांनी विविध आसने आणि प्राणायाम केले.

वाहनाच्या धडकेत युवक जखमी

पुसद, दि. २३ : पुसद येथे भरधाव वाहनाने धडक दिल्याने एक युवक जखमी झाला. याप्रकरणी निष्काळजीपणे वाहन चालविणाऱ्या अनोळखी चालकाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रोहिदास उत्तम गोदमले यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा भाचा गोपाल विठ्ठल माहुरे याला एम.एच. २९ बी.ई. ३४२५ क्रमांकाच्या वाहन चालकाने धडक दिली. चालकाने भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे वाहन चालवून हा अपघात घडविला, यात गोपाल जखमी झाला. या तक्रारीच्या आधारे पुसद पोलिसांनी अनोळखी वाहनचालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला असून, त्याचा शोध सुरू केला आहे.

'धरती आबा' अभियानातून आरोग्याविषयी जनजागृती

जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

महागाव, दि. २३ : जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील आदिवासीबहुल गावांमध्ये 'धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान' राबविले जात आहे. या अभियानांतर्गत शासकीय योजनांसोबतच आरोग्य तपासणी, जनजागृती आणि उपचारांवर विशेष भर दिला जात आहे.

१९ ते ३० जून दरम्यान चालणाऱ्या या अभियानात तालुका आरोग्य अधिकारी डॉ. निमिष धुळधुळे यांच्या नेतृत्वात आरोग्य पथके गावोगावी पोहोचत आहेत. कर्करोग, सिकलसेल, क्षयरोग, कुष्ठरोग आणि जलजन्य आजारांबाबत माहिती देऊन लसीकरणाचे महत्त्व पटवून दिले जात आहे. सध्या तालुक्यात अतिसार नियंत्रण पंधरवडाही राबवला जात असून, ० ते ५ वयोगटातील बालकांची विशेष तपासणी केली जात आहे. या संपूर्ण कार्यक्रमाचे संनियंत्रण विस्तार अधिकारी हरीश राठोड, आरोग्य निरीक्षक गोपाळ ठाकरे आणि वसंत जाधव हे करत आहेत. तालुक्याला नियमित आरोग्य अधिकारी मिळाल्याने आरोग्य सेवा सुरळीत झाल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

सरपंचांसह पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये प्रवेश

भाजपच्या कामगिरीने प्रभावित; दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

उमरखेड : भाजपमध्ये प्रवेश केलेल्या सरपंच आणि पदाधिकाऱ्यांसोबत आमदार किसनराव वानखेडे, जिल्हा समन्वयक नितीन भुतडा व इतर मान्यवर.

उमरखेड, दि.23: उमरखेड तालुक्यात भारतीय जनता पक्षाने मोठी राजकीय मुसंडी मारली आहे. तालुक्यातील विविध गावांमधील अनेक सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी नुकताच भाजपच्या दिग्गज नेत्यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला.

जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या निवासस्थानी झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्यात, भाजपच्या विकासकामांनी प्रभावित होऊन प्रवेश करत असल्याचे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी सांगितले. हा सोहळा आमदार किसन वानखेडे, जिल्हा समन्वयक नितीन भुतडा, माजी आमदार प्रकाश पाटील देवसरकर, विजय खडसे, नामदेव ससाणे आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्ष रमेश चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी बोथा गावचे सरपंच गणेश राठोड, चिल्लीचे सरपंच बळीराम राठोड, वरुडबिबीचे सरपंच तुकाराम राठोड, दिंडाळा येथील सरपंच कैलास राठोड, बोथाचे उपसरपंच सवाईराम आडे, चिल्लीचे उपसरपंच सुरेश राठोड, दिंडाळा तंटामुक्ती अध्यक्ष अमरसिंग जाधव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष रवी शेरे यांच्यासह फकिरा चव्हाण, आत्माराम राठोड, अंकुश पवार, बबन जाधव, संतोष आडे, सुनील जाधव, गणेश आडे, गोपीचंद जाधव आणि विठ्ठल जाधव या ग्रामपंचायत सदस्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. कार्यक्रमाला ग्रामीण तालुकाध्यक्ष विठ्ठल वानखेडे, विक्रम राठोड, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष सुदर्शन पाटील आरवते, जितू पवार, श्रीपाल आडे, माजी नगराध्यक्ष बालाजी उदावंत, सुरेश पाटील नवाडे, शिवाजी पाटील आरवते, गजानन देवसरकर, परमानंद पाटील कदम, विवेकानंद पाटील नलावडे, योगेश पाटील वानखेडे, विकास राठोड, धनराज पाटील आणि बबन जाधव यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

कळमजापूर येथे सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

बाभूळगाव, दि.23: येथील कळमजापूर येथील भवानी माता संस्थानात समता बहूद्देशीय संस्थेतर्फे 11 व्या सर्वधर्मीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात विविध जाती-धर्मांची 63 जोडपी मोठ्या थाटामाटात विवाहबंधनात अडकली.

या विवाह सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार मीरा पागोरे होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे विधानसभा प्रमुख सतीश मानलवार, तालुकाध्यक्ष नितीन परडखे, माजी समाजकल्याण सभापती प्रज्ञा भूमकाळे, प्रकाश भूमकाळे, नीलिमा अजमिरे, पूनम अजमिरे, नीता महाले, जितेंद्र मोहोड आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नवदाम्पत्यांना आशीर्वाद देण्यात आले. आयोजक दिलीप वाघमारे यांनी प्रास्ताविकातून सोहळ्यामागील भूमिका स्पष्ट केली. समाजातील अनावश्यक खर्चाला फाटा देऊन, एकत्रितपणे विवाह लावण्याचा हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जय वाघमारे, दीक्षा वाघमारे, शीला दातार, गजानन फाळे, गणेश जिरापुरे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

अजिंक्य भारत
आपलं यवतमाळ
मंगळवार, दि. २४ जून २०२५

थोडक्यात

सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

यवतमाळ : येथे नागरी व ग्रामीण सहकारी पतसंस्थांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यात सायबर सुरक्षा आणि कर्जवसुली यांसारख्या विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सहकार विकास महामंडळ आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयातर्फे झालेल्या या प्रशिक्षणात २४८ जणांनी सहभाग घेतला. यावेळी जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण राज्य समन्वयक धनंजय डोईफोडे उपस्थित होते. प्रकाश तायडे यांनी सायबर सुरक्षेवर, कवडु नगराळे यांनी कर्जवसुलीवर तर ॲड. राहुल शेंद्रे यांनी आर्थिक व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले.

पारवा येथे रेतीची अवैध वाहतूक

पारवा : पारवा येथे रेतीची अवैध वाहतूक करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान आरोपींनी रेती रस्त्यावर टाकून ट्रॅक्टरसह पलायन केले. प्रणिता मंगल मरसकोल्हे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, पारवा पेट्रोल पंपाजवळ एका ट्रॅक्टरमधून एक ब्रास रेतीची अवैध वाहतूक केली जात होती. पथकाने ट्रॅक्टर थांबवला असता, आरोपी गणेश रामकिसन आत्राम आणि रवि पांडे यांनी मालकाला फोन लावतो, असे सांगितले. मात्र, त्यांनी रस्त्यावर रेती खाली करून ट्रॅक्टरसह घटनास्थळावरून पळ काढला. या तक्रारीवरून पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पुढील तपास सुरू आहे.

निधन

शालिनी मालखेडे

बाभूळगाव : येथील

व्यावसायिका शालिनी दसरथ मालखेडे (वय ६५) यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, त्या भोजनालयाच्या व्यवसायाने परिचित होत्या. शालिनी मालखेडे यांचे बाभूळगाव येथे भोजनालय होते. आपल्या मनमिळाऊ स्वभावामुळे आणि व्यवसायाच्या माध्यमातून त्यांचा मोठा जनसंपर्क होता. शहरातील अनेक सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असायचा. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, दोन सुना, दोन नातू, एक पुतण्या असा आप्त परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे मालखेडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

सीईओ मंदार पत्की यांच्या उपस्थितीत 'शाळा प्रवेशोत्सव' उत्साहात साजरा
विद्यार्थ्यांचे पेढे भरवून स्वागत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि.२३: नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी यवतमाळ येथील १६० वर्षांचा इतिहास असलेल्या गव्हर्नमेंट शाळेत विद्यार्थ्यांचा 'शाळा प्रवेशोत्सव' मोठ्या उत्साहात साजरा झाला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांनी स्वतः उपस्थित राहून प्रत्येक विद्यार्थ्याला पेढा भरवून आणि गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत केले. तर जिल्हाधिकारी विकास मीना यांनी तिवसा येथील जिल्हापरिषद उच्च प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी सहाय्यक पोलिस अधीक्षक रजनिकांत चिलुमुला यांच्यासह शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सोमवारी, शाळांच्या पहिल्याच दिवशी, शासनाच्या सूचनेनुसार गव्हर्नमेंट शाळेत प्रवेशोत्सवाचे जय्यत आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की यांचे बंजारा समाजाच्या पारंपरिक वाद्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. त्यानंतर, मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. पत्की यांनी प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिकरीत्या गुलाबपुष्प आणि पेढा देऊन त्यांचे स्वागत केले आणि नवीन वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या कृतीने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला होता. यावेळी बोलताना पत्की यांनी शाळेच्या १६० वर्षांच्या गौरवशाली परंपरेचे कौतुक केले. ते म्हणाले, 'या शाळेने अनेक मोठे अधिकारी घडवले आहेत. नुकतीच येथील विद्यार्थिनी अदिबा अनम ही 'आयएएस' अधिकारी बनली आहे, ही अभिमानाची बाब आहे.' त्यांनी शाळेच्या रंगरंगोटी, आधुनिक प्रयोगशाळा आणि बॉटनिकल गार्डनसाठी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच, शाळेतील पोषक वातावरणासाठी त्यांनी मुख्याध्यापक साहेबराव पवार आणि सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाला प्राथमिक उपशिक्षणाधिकारी राजेश मडावी, विस्तार अधिकारी प्रणिता गाडवे, दीपिका गुल्हाणे आणि पालक अनिल राठोड, अंकुश चव्हाण, दिलीप तेलंगे उपस्थित होते.

मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रम समितीवर धनंजय तांबेकर
पदविकेचा अभ्यासक्रम करणार तयार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि.२३: गोदावरी अर्बन मल्टिस्टेटचे व्यवस्थापकीय संचालक, राज्य पतसंस्था फेडरेशनचे संचालक, तसेच सहकार क्षेत्रातील प्रख्यात तज्ज्ञ धनंजय तांबेकर यांची नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'पतसंस्था व्यवस्थापन पदविका' अभ्यासक्रम समितीवर निवड झाली आहे. एक विषयतज्ज्ञ म्हणून त्यांच्या अनुभवाचा फायदा आता राज्यभरातील हजारो विद्यार्थ्यांना होणार आहे.

धनंजय तांबेकर हे सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून सुपरिचीत आहेत. त्यांनी ज्या ज्या संस्थांमध्ये कार्य केले त्या संस्था नावारूपास आल्या आहेत. सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून त्यांनी देशविदेशातील अनेक सेमीनारमध्ये मार्गदर्शन केले आहे. नाशिक येथील मुक्त विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतर्फे 'डिप्लोमा इन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी मॅनेजमेंट'हा नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. याच अभ्यासक्रमाचा विषयनिहाय अभ्यासक्रम (ूश्रश्ररलीं) तयार करण्यासाठी एका तज्ज्ञ सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितीमध्ये 'सहकारी पतसंस्थांचे व्यवस्थापन' या विषयासाठी धनंजय तांबेकर यांची विषयतज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली. या विषयाच्या समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. रवींद्र भोसले काम पाहणार आहेत. सहकार क्षेत्रातील तांबेकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान आणि ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांना व्हावा, या उद्देशाने ही निवड केल्याचे विद्यापीठाने पत्रात नमूद केले आहे. यासंदर्भातील बैठक २७ मे रोजी विद्यापीठाच्या मुख्यालयात नाशिक येथे पार पडली.

CAPTION आर्द्रात दिलासा...

यवतमाळ : यंदा हवामान विभागाने मॉन्सून सक्रिय झाला असून मृगाच्या अखेरच्या चरणात दमदार पावसाची शक्यता वर्तविली होती. परंतु, संपूर्ण मृग नक्षत्रच कोरडे गेल्याने शेतकऱ्यांचा भ्रमनिराश झाला. पावसाने दडी मारल्याने दुबार पेरणीचे संकट ओढवले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या नजरा आर्द्रा नक्षत्रावर खिळल्या होत्या. आर्द्राच्या प्रारंभी चरणातच पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. (छायाचित्रसेवा : जयंत राठोड)

युवकाची आत्महत्या

यवतमाळ, दि. २३ : शहरातील एका लॉजमध्ये २५ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे. शहर पोलिसांनी याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. युवराज प्रदीप भाने (वय २५, रा. महातोली, ता. दारव्हा) असे मृत युवकाचे नाव आहे. शहरातील आश्रय लॉजमधील रूम क्रमांक १० मध्ये तो थांबला होता. सकाळी लॉजच्या कर्मचाऱ्याला तो गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसला. माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन खोलीचा दरवाजा तोडला. आधार कार्डवरून त्याची ओळख पटली. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, पोलिस पुढील तपास करत आहेत.

उमरखेडमध्ये विजेचा लपंडाव

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

उमरखेड, दि.२३: उमरखेड शहर आणि परिसरात गेल्या आठवडाभरापासून विजेचा लपंडाव सुरू असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. महावितरणच्या या नियोजनशून्य कारभारामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून, नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गेल्या काही दिवसांपासून, दिवसा आणि रात्रीही अनेक तास वीजपुरवठा खंडित राहत आहे.त यामुळे नागरिकांचे हाल होत आहे. उष्णतेमुळेलहान मुले आणि वयोवृद्ध व्यक्ती सर्वाधिक प्रभावित होत आहेत. या समस्येचा सर्वांत मोठा फटका लहान-मोठे व्यावसायिक आणि दुकानदारांना बसत आहे. विजेअभावी त्यांची कामे ठप्प होत आहेत. त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. रात्रीच्या वेळी वीज गायब होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात मोठे अडथळे निर्माण होत आहे. त्यांच्या शिक्षणावर नकारात्मक परिणाम होत आहे. अनेक भागांतील पाणीपुरवठा योजना विजेवर अवलंबून आहे. वीज नसल्यास पाणी उपसा करणे शक्य होत नाही. यामुळे, शहरात आणि ग्रामीण भागात पाणीटंचाईची समस्याही गंभीर बनली आहे.

गेल्या वर्षीची अतिवृष्टीची मदत तातडीने जमा करा
राष्ट्रीय किसान मोर्चाचा इशारा; दुहेरी संकटात सापडलेल्या बळीराजाचा एल्गार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

महागाव: अतिवृष्टीची मदत मिळण्यासाठी तहसीलदारांना निवेदन देताना राष्ट्रीय किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष प्रमोद जाधव आणि शेतकरी.

महागाव, दि.२३: गेल्या वर्षीच्या अतिवृष्टीची नुकसानभरपाई अद्यापही न मिळाल्याने, महागाव तालुक्यातील संतप्त शेतकऱ्यांनी राष्ट्रीय किसान मोर्चाच्या नेतृत्वात प्रशासनाला आंदोलनाचा इशारा दिला आहे. दोन दिवसांत मदत खात्यात जमा न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे निवेदनात म्हटले आहे.

मागील खरीप हंगामात (२०२४-२५) झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. शासनाने पंचनामे करून मदतही जाहीर केली, मात्र वर्ष उलटूनही महागाव तालुक्यातील गुंज सर्कलसह अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप एक रुपयाही जमा झालेला नाही. त्यातच, यावर्षी पावसाने दडी मारली. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला तातडीच्या आर्थिक मदतीची गरज असल्याचे, राष्ट्रीय किसान मोर्चाने निवेदनात म्हटले आहे. यावेळी निवेदन देताना राष्ट्रीय य किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष प्रमोद जाधव, देवदास पाटील, गोविंदराव शिंदे, अमृतराव देशमुख, समाधान बोबडे, गजानन कलाने, विलास गगभार, अभिजित गिराम, गजानन चव्हाण, विजय टेमकर, विनोद बनसोडे, विठ्ठल कांबळे, संजय डोंगरे, भगवान खंदारे, गजानन मेटकर, सुभाष बेले, बाबूभाई, कैलास झाडे, सुभाषराव पतंगे आणि संतोष मुळे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

यवतमाळच्या 'मराठी माणसा'चा सोशल मीडियावर धुमाकूळ
'चहा कॅन्टीन' ते 'इन्स्टा स्टार'; कुलदीप ठरतोय तरुणाईसाठी प्रेरणास्रोत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि.२३: यवतमाळच्या तहसील चौकातील एका चहाच्या टपरीपासून सुरू झालेला प्रवास, आज सोशल मीडिया स्टारपदापर्यंत पोहोचला आहे. राळेगाव तालुक्यातील वरद या छोट्याशा गावातील तरुण कुलदीप बोंदाडे याने केवळ तीन महिन्यांत एक लाख फॉलोअर्सचा टप्पा ओलांडला असून, त्याचे समाजभान जपणारे रील्स तरुणाईच्या मनात घर करत आहेत. त्याच्या प्रेमाच्या चहाला विचारांचे रिंगण असल्याचे तो अल्पावधीतच यवतमाळचा 'डॉली' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे.

कुलदीपचा प्रवास अत्यंत संघर्षमय आहे. २००६ मध्ये वडिलांचे निधन झाल्यानंतर, आई ताराबाई यांनी मजुरी करून कुटुंबाचा सांभाळ केला. बारावी आणि आयटीआयचे शिक्षण पूर्ण करूनही खासगी नोकरीत मन न रमल्याने, कुलदीपने २०२३ मध्ये यवतमाळच्या तहसील चौकात 'घ.इ.ढ. झजखछढ' नावाने स्वतःचे चहाचे दुकान सुरू केले. याच दुकानात काम करत असताना त्याला सोशल मीडियावर आपले विचार मांडण्याची प्रेरणा मिळाली आणि त्याने 'मराठी माणूस' या नावाने इन्स्टाग्राम पेज सुरू केले. त्याचे नातेसंबंध, सामाजिक वास्तव आणि संघर्षावर आधारित रील्स प्रचंड व्हायरल झाले. केवळ मनोरंजन न करता, तो आपल्या व्हिडिओमधून शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा आणि स्वाभिमानाचा संदेश देतो. विशेष म्हणजे, त्याने अनेक मोठ्या प्रमोशनल ऑफर्स नाकारुन आपल्या पेजला सामान्य माणसाच्या विचारांचे व्यासपीठ म्हणून जपले आहे. व्यवसायासोबतच तो समाजसेवाही करतो. तो गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि रुग्णालयात बिस्किटे वाटप करतो. त्याचा हा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

लाखो व्ह्यूज, हजारो लाईक्स आणि शेअर्स

कुलदीपच्या रील्सना प्रचंड लोकप्रियता मिळत आहे. त्याच्या 'प्रत्येक माणसाला मनात जागा दिली...' या रीलला ८४ लाख, तर 'लोकांच्या गोष्टी मनावर नाही घ्यायच्या...' या रीलला ५६ लाख व्ह्यूज मिळाले आहेत. त्याच्या 'रात्र नाही स्वप्न बदलते...' या व्हिडिओला तब्बल १.८६ लाख लाईक्स आणि ३१,९०० शेअर्स मिळाले आहेत. हे आकडे त्याची तरुणाईमधील लोकप्रियता आणि त्याच्या विचारांची ताकद स्पष्टपणे दाखवतात.

'मराठी माणूस'- एक मूल्य, ब्रँड नाही

कुलदीप बोंदाडे आपल्या 'मराठी माणूस' या इन्स्टाग्राम पेजला एक ब्रँड म्हणून वापरत नाही. त्याने अनेक मोठ्या प्रमोशनल ऑफर्स नाकारल्या आहेत, कारण त्याला हे पेज सामान्य माणसाच्या विचारांचे व्यासपीठ म्हणून जपायचे आहे. याच भावनेतून, तो इतर सामाजिक उपक्रमही राबवतो.

यवतमाळ नगरपरिषदेच्या सर्व ५८ जागा लढवणार
जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगणवार यांची माहिती; नवी कार्यकारिणी जाहीर

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

यवतमाळ, दि.२३: आगामी यवतमाळ नगरपरिषद निवडणूक सर्व ५८ जागांवर लढवण्याची महत्त्वपूर्ण घोषणा शिवसेना (शिंदे गट) जिल्हा संपर्कप्रमुख हरिहर लिंगणवार यांनी आज (दि. २३) एका पत्रकार परिषदेत केली. निवडणुकीच्या तोंडावर पक्षात मोठे फेरबदल करण्यात आले असून, नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्याही यावेळी जाहीर करण्यात आल्या. या घोषणेमुळे यवतमाळच्या राजकीय वर्तुळात वातावरण तापले आहे.

येत्या काही महिन्यांत होणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, शिंदे गटाने आपली तयारी सुरू केली आहे. याचाच एक भाग म्हणून, पक्षाची ताकद दाखवून देत सर्व ५८ जागांवर उमेदवार उभे करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. 'आम्ही यवतमाळच्या विकासासाठी कटिबद्ध आहोत. शहरातील प्रत्येक प्रभागातून आम्हाला चांगला प्रतिसाद मिळत असून, याच विश्वासाच्या जोरावर आम्ही स्व:बळावर निवडणूक लढवणार आहोत,' असे हरिहर लिंगणवार यांनी सांगितले. या निर्णयामुळे, ही निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीच्या तयारीसाठी पक्षात मोठे संघटनात्मक बदल करण्यात आले असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नव्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. या नव्या टीमच्या माध्यमातून पक्षाची बांधणी मजबूत करन निवडणुकीला सामोरे जाण्याची रणनीती आखण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेला श्रीधर मोहोड, गजानन डोमाळे, राजूदास जाधव आणि यशवंत पवार हे नवनियुक्त पदाधिकारीही उपस्थित होते. शिंदे गटाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे, आता भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि उद्धव ठाकरे गट काय भूमिका घेणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

शिंदे गटात मोठे फेरबदल

आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, पक्षात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. हरिहर लिंगणवार यांची यवतमाळ, आर्णी, राळेगाव, वणी विधानसभा मतदारसंघासाठी संपर्कप्रमुख म्हणून नियुक्ती झाली आहे. तर, श्रीधर मोहोड जिल्हा संपर्कप्रमुख असतील. माजी आमदार विश्वास नांदेकर यांच्याकडे वणीचे समन्वयकपद, तर गजानन डोमाळे (यवतमाळ, राळेगाव), राजूदास जाधव (आर्णी, वणी) आणि यशवंत पवार (दिग्रस, पुसद, उमरखेड) यांची जिल्हा प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.